
पुणे, रविवार, १ जून २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 183 • वर्ष ४ थे, अंक १८३ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



गुलजार द ग्रेट! P५



मुंबई क्वालिफायर २ साठी पात्र १२

## At a Glance

### युपीआय, पीएफ बाबत नवे नियम

**दिल्ली :** युपीआय, पीएफ, एलपीजी सिलेंडरबाबतचे नियम हे रविवार १ जूनपासून बदलणार आहेत. आज पासून आठ मोठे नियम लागू होणार आहेत. या नियम बदलामुळे ग्राहकांच्या खिशावर परिणाम होणार आहे. सरकार ईपीएफओची नवीन आवृत्ती ईपीएफओ ३.० लाँच करणार आहे. तर पीएफ क्लेम खूप सोपा होणार असून एटीएम आणि युपीआय मधून सुद्धा पैसे काढता येणार आहेत. यासह मोफत आधार अपडेट सुविधा संपली असून आता आधार अपडेटसाठी ५० रुपये निश्चित करण्यात आला आहे. कोटक बँकेच्या क्रेडिट कार्ड वापरकर्त्यांचा ऑटो डेबिट व्यवहार अयशस्वी झाल्यास २ टक्के बाउन्स शुल्क आकारण्यात येईल. सीएनजी पीएनजी आणि एटीएफच्या किमतीमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. १९ किलो व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमती प्रति सिलेंडर १७ रुपयांपर्यंत कमी करण्यात आल्या आहेत. रिझर्व्ह बँकेने रेपो दरामध्ये कपात केलेली आहे आणि

» पान ४ वर


# मंत्र्यांची वादग्रस्त वक्तव्ये!

## माळरानावरची पाटीलकी : कोकाटे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** कृषी खात म्हणजे उजाड माळराणाचे पाटील की आहे असं वादग्रस्त वक्तव्य कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केला आहे. राज्यात अवकाळी पावसामुळे शेतमालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी आता मदतीच्या आशेने सरकारकडे पाहत आहेत. त्यातच कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी नुकतेच वादग्रस्त विधान केले होते. नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुका दौऱ्यात नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करताना त्यांनी "ढेकळांचे पंचनामे करायचे का?" असे वक्तव्य करून शेतकऱ्यांच्या भावना दुखावल्या. माणिकराव कोकाटे यांच्या वक्तव्यावरून विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता. आता माणिकराव कोकाटे यांनी पुन्हा एकदा वाद निर्माण करणारे वक्तव्य करून टीकेला आमंत्रण दिल्याचे दिसत आहे.

कृषिमंत्रिपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकीच आहे आणि मला हे खाते दिले आहे', असे विधान माणिकराव कोकाटे यांनी शुक्रवारी छत्रपती संभाजीनगरमध्ये केले. अ.



"जेवढं नुकसान झालं आहे, त्यानुसार पंचनामे करण्यास सांगितलं असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई दिली जाणार आहे. काही शेतकऱ्यांनी शेतीची मशागत करण्यासाठी नांगरणी केली आहे. हे नैसर्गिकच आहे. सध्या सोयाबीन आणि कापसाचं फारसं पीक उरलेलं नाही. मात्र, उभ्या असलेल्या फळबागा महत्त्वाच्या आहेत आणि त्यांचे पंचनामे करणं गरजेचं आहे,"
-माणिकराव कोकाटे

भा. बळीराजा संघटना भारततर्फे एमजीएमच्या आर्यभट्ट सभागृहात शेतकऱ्यांच्या गुणवंत पाल्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी

» पान ४ वर

## हिंदीच बोलीभाषा : सरनाईक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांनी काही दिवसांपूर्वी मुंबईत राहायचे म्हणून मराठी शिकणे गरजेचे नसल्याचा जावई शोध लावला होता. त्या पाठोपाठ राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांनी तर आता हिंदीला डोक्यावरच घेतले आहे. "हिंदी ही आता मुंबईची बोलीभाषा बनली आहे. हिंदी ही आमची लाडकी बहीण आहे," असं वक्तव्य सरनाईकांनी केले आहे. त्यांच्या या वक्तव्याने मराठी भाषिक नाराज झाले आहेत. तर त्यामुळे वादाची ठिणगी पडली आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि मनसेने त्यांच्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला आहे.

मुंबईमध्ये एका कार्यक्रमादरम्यान प्रताप सरनाईक यांनी हे वक्तव्य केले. ते म्हणाले की, हिंदी आता मुंबईची बोलीभाषा झाली आहे. हिंदी ही आमची लाडकी बहीण आहे. हिंदी तर आता मुंबईची बोलीभाषा बनली आहे.

आम्ही मराठीला मातृभाषा म्हणतो पण आमच्या तोंडी कधी हिंदी येते, कधी इंग्रजी येते. त्यामुळं हिंदी आता बोलीभाषा झाली आहे.



"ठाणे व मिरा भाईंदर हा माझा मतदारसंघ आहे. जनतेशी बोलताना शुद्ध मराठीत बोलतो. जेंव्हा मिरा भाईंदरकडे जातो तेंव्हा आपोआप तोंडातून हिंदी बाहेर पडते. आजकाल आपण मराठी आमची मातृभाषा आहे, आमची माय आहे असं म्हणतो. पण हिंदी आपली लाडकी बहीण आहे. कारण लाडक्या बहिणींमुळं आम्ही आज २३७ च्याही पुढे गेलो आहोत, अशी पुश्ती सरनाईक यांनी यावेळी जोडली.
-प्रताप सरनाईक

# भावे हायस्कूलजवळ १२ विद्यार्थ्यांना कारने उडवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुण्यामध्ये अपघाताचे सत्र सुरू असतानाच आज सदाशिव पेठ मधील भावे हायस्कूल जवळ तब्बल 12 तरुणांना एका भरधाव कार ने उडविल्याची धक्कादायक घटना घडली .

या मुलांना संचेती हॉस्पिटल आणि मोडक हॉस्पिटल या दोन्ही ठिकाणी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान कार चालकाला पोलिसांनी अटक केली आहे. हे सर्व विद्यार्थी एमपीएससी परीक्षार्थी असल्याचे सांगण्यात येते. हे 12 जण शनिवारी सायंकाळी ५.३० वाजता चहा पिण्यासाठी भावे हायस्कूल जवळील वाघजाई अमृततुल्य या चहा टपरीवर आले होते . रस्त्याच्या एका बाजूला बारा जण घोळका करून चहा घेत असताना विरुद्ध बाजूने येणाऱ्या ओला ची सेवा देणाऱ्या एका भरधाव कारने या घोळक्याला जोरदार धडक मारली. त्यामध्ये हे बाराही जण अक्षरशः उडून बाजूला फेकले गेले.

सदाशिव पेठे मधील हा भाग नेहमीच गजबजलेला असतो परंतु काल शनिवार असल्यामुळे थोडीशी गर्दी कमी होती. येथे अनेक चहाच्या आणि खाद्यपदार्थांच्या लहान मोठ्या टपऱ्या आहेत. तेथे विद्यार्थी चहा पिण्यासाठी जमत असतात. या भागामध्ये एमपीएससीचे अनेक अभ्यास केंद्र असल्यामुळे इथे विद्यार्थ्यांचा राबता मोठा असतो. एमपीएससीच्या लायब्ररी जवळ असल्यामुळे अनेक विद्यार्थी येथेच भाडेकरू म्हणून अनेक घरांमध्ये राहत असतात. संध्याकाळच्या वेळेला हे विद्यार्थी चहा पिण्यासाठी खाली उतरतात. हे सर्व 12 जण मित्र असून सर्व एकत्रित चहा पिण्यासाठी खाली आले होते , परंतु त्या कारच्या धडकेने सर्वजण रस्त्यावरती फेकले गेले .तातडीने तेथील काही जमावाने विद्यार्थ्यांना उचलून हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यासाठी धावाधाव केली. विश्रामबाग पोलीस ठाण्यात याची खबर मिळतात पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तपास केला आता सर्व जखमेंवर उपचार सुरू आहेत.

## अहिल्यामातांच्या जीवनावर लवकरच बहुभाषिक चित्रपट

**अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे चरित्र, काम, आणि कतृत्व वरचे माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांच्या जीवनावर बहुभाषिक चित्रपट तयार करणार, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. शनिवार, ३१ मे रोजी चौंडी येथे आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर » पान ४ वर

"छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याकरिता छावा चित्रपटाची निर्मिती झाली. त्या चित्रपटानंतर छत्रपती संभाजी महाराजांचा दैदीप्यमान इतिहास आजच्या पिढीपर्यंत पोहोचला. त्याचप्रमाणे आता अहिल्यामातांच्या जीवनावर बहुभाषिक व्यावसायिक चित्रपट तयार करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. जेणेकरून संपूर्ण भारतात अहिल्यामातांचे चरित्र, काम, कतृत्व आणि देशावरचे त्यांचे उपकार शेवटच्या माणसापर्यंत पोहोचतील."
-देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री



# पूर्वोत्तर भारतात मुसळधार, भूस्खलनात १९ जणांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गुवाहाटी :** पूर्वोत्तर भारतात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या मुसळधार पावसामुळे आणि त्यातून झालेल्या भूस्खलनामुळे भीषण स्थिती निर्माण झाली आहे. मणिपुर, मिझोराम, आसाम, अरुणाचल प्रदेश आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये पावसाचा प्रकोप आणि भूस्खलनामुळे आतापर्यंत १९ जणांचा मृत्यू झाला असून १२,००० हून अधिक कुटुंबांना बाधा पोहोचली आहे. अनेक घरांची पडझड झाली असून, नद्या धोक्याच्या पातळीवर वाहत आहेत. हवामान विभागाने या राज्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.

मिझोराममध्ये भूस्खलनाचा जबरदस्त फटका बसला आहे. लॉन्गतलाई शहरात एका डोंगर



### हजारो कुटुंब बाधित

उतारावरून मातीच्या प्रचंड ढिगाऱ्याने पाच घरे आणि एक हॉटेल जमीनदोस्त केली. ढिगाऱ्याखाली अनेकजण अडकले असून, बचावकार्य सुरू आहे. यंग लाई असोसिएशन, आपत्ती व्यवस्थापन दल आणि तिसऱ्या भारतीय राखीव बटालियनचे जवान घटनास्थळी तातडीने दाखल झाले आहेत. या भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग-५४ बंद झाला असून, लॉन्गतलाई आणि सियाहा या दोन भागांमधील संपर्क पूर्णतः तुटला आहे.

आसाममध्ये कामरूप मेट्रो जिल्ह्यातील भूस्खलनात ५ जणांचा मृत्यू झाला आहे. गुवाहाटी, सिलचरसह पाच जिल्ह्यांतील १२,००० लोकांना पुराचा फटका बसला आहे. लखीमपूरमध्ये रिंगबांध फुटल्यामुळे पूरस्थिती गंभीर बनली आहे. गेल्या २४ तासांत गुवाहाटीत ९० ते १३४ मिमी पाऊस पडला असून, पुढील काही दिवसातही पावसाची तीव्रता कायम राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अरुणाचल प्रदेशात भूस्खलनाने सर्वाधिक ९ जणांचे प्राण घेतले. पूर्व कामेंग जिल्ह्यातील बाना-सेप्पा मार्गावर

» पान ४ वर

## पुण्यातील विद्यार्थिनीला कोलकत्यात अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गुरुग्राम :** कोलकाता पोलिसांनी पुण्याच्या लॉ कॉलेजची विद्यार्थिनी असलेल्या सोशल मीडिया इन्फ्लुएंसर शर्मिष्ठा पनोलीला गुरुग्राममधून अटक केली. शर्मिष्ठाने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ पोस्ट केला होता. आता हा व्हिडीओ दिसत नाही. या व्हिडीओत 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भात बोलताना शर्मिष्ठाने बॉलिवूड सेलिब्रेटी आणि विशिष्ट धर्माच्या नागरिकांवर टीका केली होती. या व्हिडीओ प्रकरणी कोलकाता येथे एक तक्रार दाखल झाली. यानंतर कोलकाता पोलिसांनी कारवाई केली आणि शर्मिष्ठाला अटक केली. शर्मिष्ठाच्या व्हिडीओवर ऑनलाईन पद्धतीने अनेकांनी आक्षेप नोंदवल्यामुळे आता हा व्हिडीओ



» पान ४ वर

एक लॅपटॉपही हस्तगत

# निलेश चव्हाणच्या घरातून मोबाईल जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी पिंपरी चिंचवड पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणातील एक आरोपी निलेश चव्हाणच्या घरी पोलिसांनी दीड तासाहून अधिक काळ झाडाझडती केली. त्यामध्ये निलेशच्या घरातून शशांक, लता आणि करिश्मा हगवणेचे मोबाईल जप्त करण्यात आले. तर निलेशचा एक लॅपटॉपही पोलिसांच्या हाती लागला आहे. तसेच निलेशचा पासपोर्ट आणि पिस्तुलीचा परवानाही पोलिसानी जप्त केला आहे. या लॅपटॉपमध्ये त्याचे अनेक व्हिडीओ लपवल्याचा संशय पोलिसांना आहे. वैष्णवी हगवणेच्या बाळाची हेळसांड करणाऱ्या निलेश चव्हाणच्या घरी पोलिसांनी तपास केला.




यामध्ये निलेशने त्याच्या तिजोरीत ठेवलेले शशांक, लता आणि करिश्मा हगवणेचे मोबाईल पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. या मोबाईलच्या माध्यमातून वैष्णवी हगवणेच्या संबंधित काही चॅट पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता आहे. तसेच निलेशन कस्पटे कुटुंबीयांना धमकावण्यासाठी वापरलेलं पिस्तुल पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती आहे.

निलेश चव्हाण हा वैष्णवीची नणंद करिश्माचा खास मित्र आहे. हगवणेंच्या घरच्या भांडणातही निलेश चव्हाण हजर राहायचा. वैष्णवीच्या बाळाला लपवून ठेवत निलेश चव्हाणनंच कस्पटे कुंटुंबीयांना बंदुकाचा धाक दाखवला होता. नेपाळच्या सीमेवरून मुसक्या आवळल्यानंतर निलेश चव्हाणला न्यायालयात हजर केलं. त्याला 3 जून पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## भारताचा 'टायगर मॅन' थापर कालवश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** प्रख्यात वन्यजीव संरक्षक, लेखक आणि भारतातील वाघ संवर्धनाचे अग्रणी व्यक्तिमत्त्व वाल्मीक थापर यांचे शनिवारी ३१ मे २०२५ रोजी सकाळी दिल्लीत त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. त्यांचे वय ७३ होते आणि गेल्या वर्षभरापासून ते कर्करोगाशी झुंज देत होते .

१९७० च्या दशकाच्या मध्यापासून वाल्मीक थापर यांनी वाघांच्या संवर्धनासाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी राजस्थानमधील रणथंभोर व्याघ्र प्रकल्पात फतेह सिंग राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य सुरू केले. १९८८ मध्ये त्यांनी रणथंभोर फाउंडेशनची » पान ४ वर

# पाकिस्तानला धक्का; तर कोलंबिया हादरला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिल्ली :** भारताने पुन्हा एकदा आपली राजनैतिक शक्ती दाखवली. शशी थरूर यांच्या कडक शब्दांत सांगितल्यानंतर कोलंबियाला पाकिस्तानबद्दलची भूमिका बदलावी लागली. आणि भारताला दहशतवादावर थेट पाठिंबा मिळाला.

काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखाली कोलंबियाला पोहोचलेल्या भारतीय बहुपक्षीय शिष्टमंडळाने मोठा राजनैतिक विजय मिळवला आहे. थरूर यांनी 'ऑपरेशन सिंदूर' आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्याला कोलंबियाने दिलेल्या प्रतिसादावर नाराजी व्यक्त केली तेव्हा तेथील सरकारला निवेदन मागे घ्यावे लागले!


कोलंबियाच्या उपपरराष्ट्रमंत्री रोझा योलांडा म्हणाल्या की भारताकडून मिळालेल्या स्पष्ट माहितीनंतर आता दोन्ही देशांमध्ये रचनात्मक संवाद » पान ४ वर



"आम्ही आमच्या कोलंबियन मित्रांना सांगू इच्छितो की, जे दहशतवाद पसरवतात आणि जे त्याचा प्रतिकार करतात त्यांच्यात कोणतीही तुलना होऊ शकत नाही. जे हल्ला करतात आणि जे संरक्षण करतात, त्यांच्यात फरक असतो. आम्ही केवळ आत्मसंरक्षणाच्या अधिकाराचा वापर करत आहोत आणि जर याबाबत कोणतीही गैरसमजूत असेल, तर ती स्पष्ट करण्यासाठी आम्ही तयार आहोत.
— शशी थरुर

# पालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले सेवानिवृत्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्यासह महापालिकेतील १७७ अधिकारी आणि कर्मचारी ३१ मे रोजी निवृत्त झाले. त्यांना शुक्रवारी महापालिका प्रशासनाच्या वतीने निरोप देण्यात आला. महापालिका आयुक्त भोसले हे गेल्यावर्षी पुणे महापालिकेत पदोन्नतीने आयुक्त पदावर रुजू झाले होते. आयुक्त कार्यालयात नागरीकांना थेट प्रवेश देणारे ते आयुक्त ठरले. प्रत्येक नागरीकाची अडचण आणि तक्रार समजुन घेत पुढील कार्यवाही करण्याचे आदेश देत होते. महापालिका प्रशासनाच्यावतीने त्यांना निरोप देण्यात आला. या निमित्त छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी आयुक्त भोसले यांचे कुटुंबिय देखील उपस्थित होते.

आयुक्त भोसले यांच्या सामाज विकास विभागाचे उपायुक्त नितीन उदास, पथ विभागाचे अधिक्षक अभियंता साहेबराव दांडगे, दिलीप पावरा, कार्यकारी अभियंता राजेंद्र तांबे, भवन रचना विभागाचे उपअभियंता नामदेव बजबळकर, निवृत्ती उतळे,बांधकाम विभागाचे उपअभियंता हबीब सय्यद वैद्यकीय अधिकारी एक, » पान ४ वर

# खिशाला कात्री लावणारी पीएमपीएलची दरवाढ आजपासून

### आदेश

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड ने दहा वर्षांनंतर बस प्रवासाच्या भाड्यांमध्ये मोठी वाढ जाहीर केली आहे. ही नवीन दरवाढ १ जून २०२५ पासून अंमलात येईल, ज्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच पीएमआरडीए क्षेत्रातील लाखो प्रवाशांचा प्रवास खर्च वाढेल.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दैनंदिन आणि मासिक पासचे दरही वाढवण्यात आले आहेत. पुणे व पिंपरी-चिंचवड भागासाठी दैनंदिन पास ₹७० वरून वाढवून ठेवण्यात आला आहे, तर पीएमआरडीए हद्दीतील दैनंदिन पास ₹१५० करण्यात आला आहे. मासिक पासचा दर ₹९०० वरून ₹१५०० करण्यात आला आहे.

पीएमपीएल ने स्पष्ट केले आहे की या भाडे वाढीमागचे मुख्य कारण वाढलेले इंधन दर, बसच्या देखभालीचा खर्च आणि कर्मचारी वेतनातील वाढ ही आहेत. मात्र, विद्यार्थ्यांना, ज्येष्ठ नागरिकांना व दिव्यांग प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सवलती यामध्ये कोणताही बदल केला गेलेला नाही.

ही नवीन दरवाढ महाराष्ट्र शासनाच्या ३१ मार्च २०१८ रोजी जाहीर केलेल्या नियमांनुसार तयार केलेल्या ११ टप्प्यांच्या स्टेज रचनेनुसार करण्यात आली आहे. या निर्णयाला पीएमपीएल च्या संचालक मंडळासह प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांचीही मान्यता मिळालेली आहे. हा बदल प्रवाशांसाठी काहीशी जड ठरू शकतो, पण वाढत्या खर्चाचा सामना करण्यासाठी आवश्यक असल्याचे महामंडळाचे म्हणणे आहे.



### नवीन भाडे दरवाढ :

- १ ते ५ किमी पर्यंत ₹१०
- ५.१ ते १० किमी पर्यंत ₹२०
- १०.१ ते १५ किमी पर्यंत ₹३०
- १५.१ ते २० किमी पर्यंत ₹४०
- ३० किमी नंतर प्रत्येक १० किमी अंतरासाठी नवीन टप्प्यांवर भाडे वाढवले असून, ८० किमीपर्यंत भाडे दरवाढ लागू आहे.

#रा

## अवैध उत्खननप्रकरणी गुन्हे दाखल करा : बावनकुळे

**पुणे :** शहरातील कात्रज, कोंढवा, येवलेवाडी येथील अनधिकृत प्लॉटिंग करून ते विकणे, तसेच अवैध उत्खननप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. याबाबत त्या विभागातील अधिकारी, तहसीलदार आणि महानगरपालिका आयुक्त यांना जबाबदार धरण्यात येईल. त्यामुळे पुढील तीन दिवसांत कारवाई करून याबाबतचा अहवाल सादर करण्यात यावा, असे आदेशही महसूलमंत्री यांनी दिले आहेत.

मंत्रालयात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीवेळी हे आदेश देण्यात आले. कात्रज, कोंढवा, येवलेवाडी येथील अनधिकृत अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. मात्र, ती पूर्णपणे काढण्यात आलेली नाहीत. विधान परिषदेत आश्वासन दिल्यानंतर त्याची कार्यवाही करण्यात अधिकाऱ्यांनी चालढकल करू नये. अतिक्रमण करणाऱ्यांना केवळ नोटीस देऊन चालणार नाही. दंड भरून घेतला म्हणजे सर्व काही झाले असे नाही. त्यांच्यावर गुन्हे दाखल करावे लागतील, तसेच या ठिकाणी अवैध उत्खनन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे आदेशही त्यांनी दिले.

## विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कुशल प्रशासक व पराक्रमी राज्यकर्ती म्हणून परिचित असलेल्या आणि इतिहासाच्या कालपटावर स्त्री व्यक्तिमत्वाचा ठसा उमठविणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची तीनशेवी जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात प्र-कुलगुरू प्रा. (डॉ) पराग काळकर, प्रभारी कुलसचिव सीएमए (डॉ) चारुशीला गायके, अधिष्ठाता प्रा. डॉ. विजय खरे, प्रा. डॉ. सुप्रिया पाटील,परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. डॉ. प्रभाकर देसाई, अधिसभा सदस्य डॉ.राजेंद्र घोडे, मुकुंद पांडे यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. विलास आढाव, अधिसभा सदस्य राहुल पाखरे, रासेयोचे संचालक प्रा. डॉ. सदानंद भोसले आदी मान्यवर तसेच शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## शिंदे गटाच्या कार्यकर्त्याच्या मुलाचा  हवेत गोळीबार

**पुणे :** हडपसर येथील कॅनल रोड परिसरात शिंदे गटाच्या कार्यकर्त्याच्या मुलाने मस्तीखोरपणे हवेत गोळीबार केला. मात्र, ही मस्ती जीवावर बेतली, कारण गोळीबाराच्या वेळी गोळी त्याच्या मावस भावाच्या खांद्यातून आरपार गेली.२९ मे  रोजी रात्री सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास हडपसरमधील सातववाडी कॅनल रोड येथे ही घटना घडली. वाढदिवसाच्या निमित्ताने काही तरुण दुचाकीवरून निघाले होते. यावेळी सुमित खवळे नावाच्या तरुणाने आपल्या जवळील गावठी पिस्तुलातून हवेत गोळीबार केला. मात्र, गोळी चुकून गाडीवर बसलेल्या त्याच्या मावस भाऊ वैभव गवळी (वय २०) याच्या डाव्या खांद्यात लागली.

गोळी लागल्यानंतर वैभव गवळी याला तात्काळ एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. नंतर परिस्थिती लक्षात घेऊन त्याला ससून रुग्णालयात हलवण्यात आले.

## वाघोलीत साडेआठ किलो गांजा जप्त

**पुणे :** पुण्याच्या वाघोली येथील लोहगाव चौकातील अभिषेक लॉन्सजवळ वाघोली पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ८ किलो ४०२ ग्रॅम गांजासह एकाला अटक केली आहे.

आरोपीकडून एकूण १ लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्याच्याविरोधात वाघोली पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी सुरेश साहेबराव पाटील (वय ४४, रा. शिरपूर, जि. धुळे) असे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर आरोपीकडून गांजासह मोबाईल फोन असा एकूण १ लाख ६९ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.तो हा गांजा विक्रीसाठी बाळगत असल्याची गोपनीय माहिती माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

ही धडक कारवाई वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक विनायक आहिरे, तपास पथक अधिकारी पोलीस उपनिरीक्षक मनोज वागल,  रामचंद्र पवार,  संदीप तिकोणे, प्रदीप मोटे, बाबासाहेब मोराळे, विशाल गायकवाड, समीर भोरडे, नामदेव गडदरे, मंगेश जाधव, पांडुरंग माने, साई रोकडे,  शिवाजी सालके, राजाराम आसवले,  दिपक कोकरे,  प्रितम वाघ,  प्रशांत धुमाळ,  शिवाजी चव्हाण यांनी केली आहे.

## सिडीएस चे जनरल अनिल चौहान यांचे विशेष व्याख्यान

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिकशास्त्र विभागामार्फत भारतीय लष्कर सेवेतील सिडीएस चे जनरल अनिल चौहान यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

भविष्यातील युद्ध आणि  युद्ध पद्धती या विषयावर मंगळवार दिनांक ३ जून, रोजी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या इरावती कर्वे संकुलातील सभागृहात दुपारी १.३० वाजता सदरचे व्याख्यान होणार आहे.

सदर व्याख्यानासाठी प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव सीएमए चारुशीला गायके यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्यापरिषद सदस्य, अधिसभा सदस्य, शैक्षणिक व प्रशासकिय विभागांचे विभागप्रमुख उपस्थित राहणार असून या विशेष व्याख्यानासाठी सर्व पुणेकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन  संरक्षण व सामरिकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. विजय खरे यांनी केले.

## सलाम 'कार्यक्षम राज्यकर्ती' ला...!



**पुणे** एकता मित्र मंडळामध्ये तत्त्वज्ञानी महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती व त्रिशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून सहकारनगर भागातील व्याख्यात्या उत्तराताई सुमंत यांनी त्यांच्या मधुर व ज्ञानपूर्ण वाणीतून अहिल्यादेवींचे जीवनचरित्र व इतिहासाचा उलगडा करत विस्तृतरित्या माहिती सांगितली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष सुधीर ढमाले यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एकता मित्र मंडळामध्ये तत्त्वज्ञानी महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती व त्रिशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून सहकारनगर भागातील व्याख्यात्या  उत्तराताई सुमंत यांनी त्यांच्या मधुर व ज्ञानपूर्ण वाणीतून अहिल्यादेवींचे जीवनचरित्र व इतिहासाचा उलगडला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नगर वस्ती संयोजक  शिरीषजी आफळे व नियोजन मंडळाचे अध्यक्ष सुधीर ढमाले, सल्लागार अविनाश खंडागळे, जयेश ढमाले, शुभम बाणखेले, गणेश खाडे, अथर्व तिवाटणे, संकेत मिरघे, हर्षद खंडागळे, साई भोसले यांनी केले. यावेळी पद्मावती नगराचे अश्विनी देऊस्कर, वर्षा आपटे, उत्तरा सुमंत, अमृता धोमकर, मकरंद पारखी उपस्थित होते. कार्यक्रम सुरू करण्यापूर्वी श्रींची आरती करून उपस्थित सर्व मान्यवरांचा मंडळातर्फे आभार व्यक्त करत यथोचित सन्मान करण्यात आला. एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे.

# जलसंपदावरच टीकेचे 'फवारे'...!

### प्राधीकरणाने थेट फटकारले: दंडाबाबत पुन्हा सुनावणीचे आदेश

पुणेकरांच्या पाणीवापराची चर्चा देशभर नव्हे तर जगभरात खमंगपणे चर्चिली जाते, विशेष म्हणजे राजकीय वर्तुळात तर नेत्यांच्या दृष्टीने हा चेष्टेचा विषय बनला आहे. विद्यमान जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही यासंदर्भात जाहीर वक्तव्य करुन पुणेकरांची नाराजी ओढवून घेतली होती; विशेष म्हणजे जवळपास सर्वच नेत्यांनी पुणेकरांच्या पाणीवापरावर तोंडसुख घेतले आहे. त्यामुळेच सर्वच पक्षाचे नेते पुणेकरांच्या 'निशाण्यावर' आले आहेत; त्यातच जलसंपदा विभागाने प्रक्रिया केलेले पाणी वापरले जात नाही असे कारण पुढे करत पालिकेवर दंडात्मक कारवाई केली होती.मात्र; हा दंडच चुकीचा असल्याचे निदर्शनास आणत प्राधीकरणाने जलसंपदा विभागाला फटकारले आहे.

**अधिक पाण्याची शक्यता**

**महापालिकेने शहरात नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांसाठी १.७७ टीएमसी पाण्याची अतिरिक्त मागणी केली होती. पाटबंधारे विभागाने या गावांना आपणच पाणी पुरवतो, असा दावा करत ही मागणी फेटाळली होती. मात्र, प्राधिकरणाच्या सुनावणीत पाटबंधारे विभाग कोणतेही अधिकृत कागदपत्र सादर करू शकले नाहीत. त्यामुळे महापालिकेला या गावांसाठी अतिरिक्त पाणी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

**या निर्णयामुळे पुणे महापालिकेवर लादलेला ₹७२६ कोटींचा भार तात्पुरता तरी दूर झाला असून, नव्या सुनावणीत योग्य निर्णय होण्याची आशा आहे. "प्राधिकरणाच्या निर्णयामुळे महापालिकेला मोठा दिलासा मिळाला आहे. आता जलसंपदा विभागाला नव्याने बिले करावी लागणार आहेत.**

**-नंदकिशोर जगताप,** पाणीपुरवठा विभाग प्रमुख

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेला जलसंपदा विभागाकडून आकारण्यात आलेल्या ₹७२६ कोटींच्या पाणी वापर दंडावर जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. महापालिकेला प्रक्रिया उद्योगांसाठी पाणी वापरल्याचा आरोप करत लावण्यात आलेला दंड चुकीचा असल्याचे मान्य करत प्राधिकरणाने याबाबत पुन्हा सुनावणी घेण्याचे आणि तीन महिन्यांत निर्णय देण्याचे आदेश दिले आहेत.



गेल्या काही वर्षांपासून पुणे महापालिका आणि जलसंपदा विभागामध्ये पाण्याच्या वापरावरून वाद सुरू आहे. महापालिकेला दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या १५% पाणी प्रक्रिया उद्योगांसाठी वापरले जात असल्याचा दावा करून, जलसंपदा विभागाने व्यावसायिक दराने बिले आकारली आणि त्यावर दीडपट दंड लावून एकूण ₹७२६.१२ कोटींची थकबाकी वसूल करण्याची कारवाई सुरू केली.

मात्र, पुणे शहरात कोणताही प्रक्रिया उद्योग नसल्याचे महापालिकेचे म्हणणे आहे. तसेच, सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडल्याच्या मुद्द्यावरूनही अतिरिक्त दंड लावण्यात आला आहे. यावर महापालिकेने हरकत घेत जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाकडे याचिका दाखल केली होती.

महापालिकेने पाटबंधारे विभागाच्या प्राथमिक तक्रार निवारण अधिकाऱ्यांकडे (जे खुद्द मुख्य अभियंता होते) तक्रार केली होती. मात्र, त्यांनी बिले योग्य असल्याचे ठरवून पालिकेला पैसे भरण्याचे आदेश दिले. प्राधिकरणाने हा निकाल रद्द करत, महापालिकेला पुन्हा तक्रार दाखल करावी आणि त्यावर तीन महिन्यांत निर्णय घ्यावा, असे स्पष्ट आदेश दिले.

## लीना देवस्थळीची १९ वर्षानंतर सुटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील बहुचर्चित डॉ. दीपक महाजन हत्याकांड प्रकरणात लीना देवस्थळी व तिची मुलगी दीप्ती यांना पुणे सत्र न्यायालयाने ठोठावलेली फाशीची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाने रद्द करून, जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. आता या जन्मठेप झालेल्या लीना अनिल देवस्थळी (वय ६५) हिची १९ वर्षे तुरुंगवास भोगल्यानंतर नुकतीच सुटका करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.



पुण्यातील प्रभात रस्त्यावर राहणारे डॉ. दीपक महाजन यांचे जुलै २००६ मध्ये अपहरण करून,२५ लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. त्यानंतर त्यांचा निर्घृण खून करून त्यांच्या शरीराचे आठ तुकडे करून, कात्रजच्या घाटात व लोणावळ्यात फेकून देण्यात आल्याचे उघडकीस आले होते. पुणे पोलिसांच्या तपासात लीना देवस्थळी व दीप्ती देवस्थळी या मायलेकींनी हा खून केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर या मायलेकींना दोषी ठरवून पुणे सत्र न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली होती.त्याविरोधात या मायलेकींनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.मात्र या प्रकरणात लीना व दीप्ती यांना डॉ. महाजनांचे खंडणीसाठी अपहरण करणे व कट रचल्याप्रकरणी दोषी ठरविण्यात आले. मात्र, त्यांनी खून केल्याचे सिद्ध करण्यासाठी पुरेसे पुरावे नसल्याचे कारण देऊन, उच्च न्यायालयाने सप्टेंबर २००९ मध्ये देवस्थळी मायलेकींना ठोठावलेली फाशीची शिक्षा रद्द करून, जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर आता तब्बल १९ वर्षानंतर लीना देवस्थळींची तुरुंगातून सुटका करण्यात आली आहे.

राज्याच्या गृह विभागाने ६५ वर्षांवरील वयस्कर व अशक्त पुरुष बंदी आणि साठ वर्षांवरील अशक्त महिला बंद्यांना मुक्त करण्याबाबत १० जानेवारी २००६ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. या शासन निर्णयाचा आधार घेऊन, येरवडा मध्यवर्ती कारागृहात असलेल्या लीना देवस्थळीने पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून सुटकेसाठी अर्ज केला होता.

## बालसाहित्य हे संवेदनशील पिढी घडवणारे असावे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** समाजात सभोवताली कौटुंबिक हिंसाचार, पहेलगामसारखे दहशतवादी हल्ले अशा सांस्कृतिक ऱ्हासाच्या घडामोडी घडत असताना केवळ शब्दांचे फुलोरे फुलवणारे लेखन पुरेसे ठरणारे नसून बालवयातच संवेदनशील मने घडतील, असे बालसाहित्य आवश्यक आहे, असे मत ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ आणि बालसाहित्यिक डॉ. न. म. जोशी यांनी व्यक्त केले.

अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे आज २०२४ या वर्षातील बाल वाङ्मय पुरस्कारांचे वितरण करण्यात आले, त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.न.म. जोशी बोलत होते.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर प्रसिद्ध व्यंगचित्रकार चारुहास पंडित, ज्येष्ठ लेखिका आणि अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या विश्वस्त डॉ मंदा खांडगे, अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष राजन लाखे, अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या सल्लागार डॉ. संगीता बर्वे, अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे विश्वस्त शिरीष चिटणीस आदी मान्यवर उपस्थित होते.




**पुणे** अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे आज २०२४ या वर्षातील बाल वाङ्मय पुरस्कारांचे वितरण आज ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ आणि बालसाहित्यिक डॉ. न. म. जोशी यांच्या अध्यक्षतेखालील कार्यक्रमात करण्यात आले. (डावीकडून बसलेले) शिरीष चिटणीस, डॉ.न.म. जोशी, चारूहास पंडित, राजन लाखे आणि डॉ. संगीता बर्वे.

## श्रीमंत 'दगडूशेठ' मंदिराबाहेर कापडी पिशवी मशीनचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त पुढाकारातून एकल वापर प्लास्टिकवर बंदी घालण्याची मोहिम देशभर राबवली जात आहे. या उपक्रमाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून आज पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराच्या परिसरात कापडी पिशवी वेंडिंग मशीन बसविण्यात आले. याचे उद्घाटन राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री  पंकजा मुंडे यांच्या हस्ते संपन्न झाले.



या प्रसंगी राज्यमंत्री  माधुरी मिसाळ, आमदार हेमंत रासने यांची देखील प्रमुख उपस्थिती लाभली. हा उपक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त हाती घेतलेल्या एकल प्लास्टिक बंदीच्या मोहिमेचा भाग आहे. देशभर प्लास्टिकमुक्त समाजनिर्मितीसाठी विविध उपाययोजना आणि जनजागृती कार्यक्रम राबवले जात आहेत.

या कार्यक्रमात बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, "जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे नागरिकांमध्ये प्लास्टिकमुक्त पर्यायांबाबत जागृती निर्माण करणे. मंदिर परिसरात उपलब्ध करण्यात आलेल्या वेंडिंग मशीनमधून फक्त १० रुपयांत पर्यावरणपूरक कापडी पिशवी सहज मिळू शकते. धार्मिक स्थळांवर प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. त्याऐवजी अशा पर्यायांचा स्वीकार केल्यास पर्यावरण रक्षणास मोठा हातभार लागू शकतो. आम्ही दगडूशेठ ट्रस्टला या उपक्रमात सहभागी होण्याची विनंती केली होती आणि त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष  सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, तसेच ट्रस्टचे इतर पदाधिकारी, कसबा मतदारसंघातील कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

> "पर्यावरण रक्षणासाठी मंदिर परिसरातून सुरू झालेला हा उपक्रम संपूर्ण पुणेकरांसाठी प्रेरणादायी आहे. कापडी पिशव्यांचा वापर ही काळाची गरज आहे आणि अशा उपक्रमांना सर्वांचा सक्रिय पाठिंबा असला पाहिजे.या उपक्रमाच्या माध्यमातून धार्मिक स्थळांवरून सुरू झालेली पर्यावरणपूरक चळवळ ही संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे."
>
> **— आमदार हेमंत रासने**
> मुख्य अभियंता, महावितरण पुणे परिमंडल

# बॉक्स ऑफिसवर ‘रेट्रो’ चा रेटा

दक्षिण भारतीय चित्रपटांमध्ये काहीतरी वेगळे आहे हे नक्की. कोणतीही भव्य दृश्य नसतानाही हे चित्रपट प्रेक्षकांना आकर्षित करण्यात यशस्वी होतात. सूर्याचा ‘रेट्रो’ त्यातीलच एक. तो थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. सुरुवातीचा कलेक्शन खूपच कमी होते. स्वाभाविकच लवकरच चित्रपट बंद पडेल, असा अंदाज वर्तवला जात होता. पण नंतरच्या १८ दिवसांमध्ये त्याने केलेली जादू कौतुकास्पद म्हणावी लागेल. नुकताच त्याच्या जगभरातील कमाईने २०० कोटी रुपयांचा आकडा ओलांडला आहे.

कार्तिक सुब्बाराज दिग्दर्शित ‘रेट्रो’मध्ये सूर्याने महत्त्वाची भूमिका साकारली आहे. १९.२५ कोटी रुपयांची ओपनिंग असणाऱ्या या चित्रपटाने पहिल्या आठवड्यात ५२.९५ कोटी रुपये कमावले, तर दुसऱ्या आठवड्यात ६.९४ कोटी रुपयांचा व्यवसाय केला. पण त्याहूनही आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे प्रदर्शित झाल्यानंतर १८ दिवसांतच परदेशी बाजारपेठेत त्याची कमाई २३५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली.

हे यश पाहून सूर्याने ‘आगराम फाउंडेशन’ला मोठी रक्कम दान केली आहे. हे फाउंडेशन मुलांना अभ्यासासाठी मदत करते. अलिकडेच एका कार्यक्रमादरम्यान अभिनेत्याने याची घोषणा केली. कार्यक्रमात बोलताना सूर्या म्हणाला, ‘मुलांच्या शिक्षणात योगदान वाढवण्यासाठी आपल्या सगळ्यांनाच एकत्र येण्याची गरज आहे. त्या ध्येयाकडे पहिले पाऊल मी टाकत असल्याचा आनंद आहे. ‘रेट्रो’ ला तुम्ही दिलेल्या प्रेम आणि पाठिंब्याच्या बदल्यात मी या शैक्षणिक वर्षात ‘आगराम फाउंडेशन’ला १० कोटी रुपये देत आहे.



‘रेट्रो’ ही १९६० ते १९९० च्या दशकातील कथा असून ती परिवेल परी कन्नन (सूरिया) च्या जीवनावर आधारित आहे. तो अनाथ असून गँगस्टर थिलकन (जोजू जॉर्ज) ची पत्नी संध्या (स्वस्थिका) हिने त्याला दत्तक घेतले आहे. मात्र संध्याच्या मृत्यूनंतर परी गुन्हेगारीच्या जगात ओढला जात. पुढे रुक्मिणी (पूजा हेगडे) च्या प्रेमात पडल्यावर तो हिंसाचार सोडण्याचा दृढनिश्चय करतो. सूर्या, पूजा हेगडे, जोजू जॉर्ज, जयराम, नास्सर आणि प्रकाश राज यांसारख्या कलाकारांनी चित्रपटाच्या वैभवात भर घातली आहे. तो प्रेक्षकांच्या पसंतीत उतरत असल्याचे चित्र दिसते आहे.

# असा सजला ‘झी सिने’ सोहळा




बॉलीवूडमधील सर्वात प्रतिष्ठित चित्रपट पुरस्कारांपैकी एक असणारा झी सिने अवॉर्ड्स २०२५ चे आयोजन अलिकडेच मुंबईत मोठ्या थाटामाटात पार पडले. या पुरस्कार सोहळ्याला बॉलिवूडमधील अनेक प्रसिद्ध व्यक्ती उपस्थित होत्या. त्यांनी  खास शैलीने सोहळ्याची संध्याकाळ संस्मरणीय केली. या कार्यक्रमात कार्तिक आर्यन, श्रद्धा कपूर, रश्मिका मंदान्ना, विक्रांत मॅसी, क्रिती सेनॉन, तमन्ना भाटिया, अनन्या पांडे, नितांशी गोयल, विवेक ओबेरॉय आणि रशा थडानी यासारखे अनेक तारे-तारका उपस्थित होते. रेड कार्पेटवर त्या सर्वांचा ग्लॅमरस अंदाज पाहण्यासारखा होता.

सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपट ‘स्त्री २’ (दिग्दर्शक: अमर कौशिक) ठरला तर सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून कार्तिक आर्यन  (‘भूल भुलैया ३’) ची निवड करण्यात आली. सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून श्रद्धा कपूर (स्त्री २) ला गौरवण्यात आले. ‘स्त्री २’ मध्ये राजकुमार राव, श्रद्धा कपूर, पंकज त्रिपाठी, अभिषेक बॅनर्जी आणि अपारशक्ती खुराणा यांच्यासारख्या दिग्गज कलाकारांचा समावेश होता. हाच वर्षातील सर्वोत्तम चित्रपटांपैकी एक बनला.

याखेरीज सर्वोत्कृष्ट पोशाख डिझाइन: दर्शन झल्लन – ‘मिसिंग लेडीज’, सर्वोत्कृष्ट व्हीएफएक्स ‘मुंझ्या’, सर्वोत्कृष्ट प्रॉडक्शन डिझाईन ‘अमर सिंग चमकीला’, सर्वोत्कृष्ट गीत ‘इर्शाद कामिल’  मैनु विदा करो,  सर्वोत्कृष्ट छायांकन ‘मिसिंग लेडीज’, सर्वोत्कृष्ट साउंड डिझाइन: किंगशुक मोरन ‘स्त्री २’, सर्वोत्कृष्ट संपादन आरती बजाज  ‘अमर सिंग चमकीला’, सर्वोत्कृष्ट पार्श्वभूमी स्कोअर संदीप शिरोडकर ‘भूल भुलैया ३’, सर्वोत्कृष्ट संगीत सचिन-जिगर ‘स्त्री २’ असे पुरस्कार वितरणाचे स्वरुप राहिले. झी सिने अवॉर्ड्स २०२५ चा मंच बॉलिवूडच्या ग्लॅमर आणि प्रतिभेचा एक अद्भुत संगम बनला. बॉलिवूड स्टार्सनी इथे जबरदस्त परफॉर्मन्स दिला. कार्तिक आर्यनने ‘भूल भुलैया ३’ च्या गाण्यावर डान्स केला तर रश्मिका मंधानाने ‘पुष्पा’ चित्रपटातील सामी सामी या सुपरहिट गाण्यावर दमदार परफॉर्मन्स दिला. अनन्या पांडे आणि चंकी पांडे यांच्या नृत्याने सर्वांचे मन जिंकले. विक्रांत मॅसी आणि अपारशक्ती खुराना यांनी प्रेक्षकांना खूप हसवले. तमन्ना भाटियानेही‘आज की रात’ गाण्यावर नृत्य केले.

# जुनी जोडी, नवीन राज्य



सिद्धार्थ आनंदच्या ‘किंग’ मधून राणी मुखर्जी तब्बल १९ वर्षांनंतर शाहरुख खानसोबत स्क्रीन शेअर करणार आहे. या चित्रपटात आधीच सुहाना खान, दीपिका पदुकोण आणि अनिल कपूर यांच्या भूमिका निश्चित झाल्या आहेत. आता राणी मुखर्जीही त्यांच्यात सामील झाल्यामुळे चर्चेला तोंड फुटले आहे. चाहत्यांचा उत्साह वाढला आहे.

यात राणी मुखर्जी सुहानाच्या आईच्या भूमिकेत दिसणार असून ती फक्त पाच दिवसांचे शूटिंग करणार आहे. पण तिचा ट्रॅक सर्वात म हत्त्वाचा असेल.  तिने हे पात्र ऐकले आणि लगेचच काम करण्यास होकार दिला. यावरुनच भूमिका किती प्रभावी आहे, हे लक्षात येऊ शकेल.

आत्तापर्यंत राणी मुखर्जी आणि शाहरुख खान यांनी ‘कुछ कुछ होता है’, ‘चलते चलते’, ‘पहेली’, ‘कभी खुशी कभी गम’, ‘वीर-जारा’ आणि ‘कभी अलविदा ना कहना’ यासारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. राणीने ‘रब ने बना दी जोडी’ आणि ‘झिरो’मध्येही कॅमिओ केला होता. पण ‘कभी अलविदा ना कहना’ हा त्यांचा शेवटचा चित्रपट होता ज्यामध्ये ते सुरुवातीपासून शेवटपर्यंत एकत्र दिसले. आता १९ वर्षांनी पुन्हा एकत्र काम करण्यास सज्ज झाल्याने चाहते आनंदी झाले आहेत.

राणी मुखर्जीच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, ‘किंग’ व्यतिरिक्त ‘मर्दानी ३’ देखील तिच्या आगामी चित्रपटाच्या यादीत आहे. शाहरुख खान स्टारर चित्रपटाची रिलीज डेट अद्याप कळलेली नाही. पण अभिनेत्रीचा हा सिक्वेल चित्रपट २७ फेब्रुवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये दाखल होईल. तिने पहिला लूक आधीच शेअर केला होता. आता रिलीजची तारीखही जाहीर झाली आहे. गेल्या दोन भागात शिवानी शिवाजी रॉयच्या भूमिकेत या अभिनेत्रीने खूप मनोरंजन केले होते. आता नवे काय बघायला मिळेल, हे लवकरच कळेल.

# शनाया शनाया...

बॉलिवूड सुपरस्टार संजय कपूर यांची मुलगी शनाया कपूरने ‘वाइब’ या म्युझिक व्हिडिओद्वारे अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली आहे. मोठ्या पडद्यावर पाऊल ठेवण्यापूर्वी शनायाने छोट्या पडद्याला आपले पहिले व्यासपीठ बनवले. या म्युझिक व्हिडिओमध्ये ती गुरु रंधावा आणि आंतरराष्ट्रीय रॅपर फ्रेंच मोंटानासोबत दिसली. हे गाणे रिलीज होताच सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनला आणि शनायाच्या अभिनयावर विविध प्रतिक्रिया येऊ लागल्या.

काही प्रेक्षकांनी शनायाच्या ग्लॅमरस लूक आणि पडद्यावरच्या उपस्थितीचे कौतुक केले, तर अनेकांनी तिच्या अभिनयाबद्दल प्रश्न उपस्थित केले. विशेषतः अभिव्यक्तीच्या अभावामुळे तिला बरेच ट्रोलही करण्यात आले. त्याचबरोबर या निमित्ताने सोशल मीडियावर पुन्हा एकदा परिवारवादाची चर्चाही सुरू झाली. अनेकांनी तिला फक्त स्टार किड म्हणत  नाकारण्याचा प्रयत्न केला. मात्र शनाया ट्रोलिंगचा सामना करत असताना, तिचा कथित प्रियकर करण कोठारीने त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीवर पॅरिसमधील एक फोटो शेअर केला ज्यामध्ये ‘वाइब’ चे पोस्टर एका बिलबोर्डवर दिसले. या पोस्टद्वारे त्याने शनायाच्या मेहनतीचे कौतुक केले आपण कायम तिच्याबरोबर राहणार असल्याचे स्पष्ट केले. चाहत्यांना त्याची ही पोस्ट खूप खास वाटली. आता त्यांच्या नात्याबद्दल चर्चा वाढली आहे.

तसे पाहिले तर शनाया आणि करण यांच्या जवळीकतेच्या बातम्या २०२३ पासून चर्चेत आहेत. दोघेही एकाच कॉलेजमध्ये शिकले असून एकमेकांना बऱ्याच काळापासून ओळखतात. करणच्या कुटुंबाचा दागिन्यांचा व्यवसाय असून तो ‘कोठारी फाइन ज्वेल्स’चा मालक आहे. शनाया एकेकाळी या ब्रँडची प्रेरणा होती. मात्र, दोघांनीही अद्याप त्यांचे नाते सार्वजनिकरित्या स्वीकारलेले नाही. या म्युझिक व्हिडिओनंतर शनाया चित्रपट कारकिर्दीची तयारी करत आहे. ती लवकरच अभिनेता आदर्श गौरवसोबत ‘तू या मैं’ मध्ये दिसणार आहे. हा चित्रपट तिच्यासाठी एक मोठी संधी ठरू शकतो.





# घाणेरडा व्यवसाय...?


९० च्या दशकात, अंडरवर्ल्डचे बॉलिवूडशी संबंध असल्याच्या बातम्या नेहमीच चर्चेत असतात. अलीकडेच अनु अग्रवालनेही याविषयी एक मोठा खुलासा केला आहे. या ‘आशिकी’ फेम अभिनेत्रीने अंडरवर्ल्ड डॉनचा बॉलिवूडशी कसा संबंध होता, हे सांगितले आहे. तिने एका मुलाखतीत खुलासा केला आहे की, बॉलिवूडला अंडरवर्ल्डकडून निधी मिळत असे. डॉन चित्रपटांमध्ये मोठी गुंतवणूक करायचा. अर्थात हे सगळे गुप्तपणे केले जात असे.

या मुलाखतीत अनु अग्रवालने चित्रपट उद्योगाला एक ‘घाणेरडा व्यवसाय’ म्हटले आहे. मुलाखतीत ती म्हणाली, ‘हा एक घाणेरडा व्यवसाय होता. आज तो किती घाणेरडा आहे हे मला माहीत नाही. पण तेव्हा सर्व टेबलाखालील व्यवहार होते. त्यावर दाऊद इब्राहिम सारख्या लोकांचे राज्य होते. चित्रपट उद्योगात येणारा सर्व पैसा अंडरवर्ल्डमधून येत असे . तो पूर्णपणे वेगळाच प्रकार होता...’ त्याच मुलाखतीत अनु अग्रवालने सांगितले की, ‘आशिकी’च्या यशानंतर अचानक तिला शाहरुख खानसारखे स्टारडम मिळाले. लोक परदेशामधून केवळ तिचे वास्तव असणारी इमारत पाहण्यासाठी येत असत. त्या वेळी तिला एकटे राहणे आणि फिरणेदेखील खूप कठीण असायचे. चाहते सतत इमारतीखाली उभे असायचे. सुदैवाने, ती आमदार-खासदारांची इमारत होती, त्यामुळे पोलिस संरक्षण होते. ते सगळे दिवस आजही आठवतात... अर्थात अनु अग्रवाल गेल्या २६ वर्षांपासून चित्रपट जगतापासून दूर आहे. ‘रिटर्न ऑफ द ज्वेल थीफ’ मध्ये ती शेवटची दिसली होती.

# जुने ते सोने

जुने ते सोने ओटीटीला सिनेमाचा ‘तिसरा पडदा’ म्हणतात. आज  प्रेक्षकांच्या आयुष्यात त्याचे  महत्त्वाचे स्थान आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर ओटीटी प्लॅटफॉर्म आता प्रेक्षकांसाठी मोबाईल सिनेमा हॉल बनले आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. त्यावर आपण आवडीचे चित्रपट आणि मालिका कधीही, कुठेही पाहू शकतो.

थोडक्यात मोबाईल, टीव्ही किंवा लॅपटॉप आदी कोणताही स्क्रीन आता सिनेम गृहासमान आहे. त्यावर ‘मिर्झापूर’, ‘गुल्लक’, ‘पंचायत’, ‘द फॅमिली मॅन’ वा ‘सेक्रेड गेम्स’ सारख्या वेब सिरीज मोठ्या प्रमाणात पाहिल्या गेल्या असून प्रेक्षकांमध्ये खूप लोकप्रिय झाल्या आहेत. या मालिकांना प्रेक्षक आणि समीक्षकांकडून प्रचंड रेटिंग मिळाले आहे. पण या सर्व सुपरहिट मालिकांमध्ये  सर्वाधिक रेटिंग मिळवणारा शो ८० च्या दशकातील असून त्याने ‘पंचायत’ आणि ‘मिर्झापूर’ लाही मागे टाकले आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हा शो ओटीटी युग आणि ट्रेंडचा भाग नाही तर ८० च्या दशकात टीव्हीवर प्रसारित होत असे.



शो पहिल्यांदा १९८६ मध्ये टेलिव्हिजनवर प्रसारित झाला. त्या काळातही त्याने लोकांच्या मनावर राज्य केले होते. या मालिकेच्या कथा भारताच्या मातीत रुजलेल्या होत्या, भावनांनी भरलेल्या होत्या आणि इतक्या साधेपणाने सांगितल्या गेल्या की सर्व वयोगटातील प्रेक्षकांशी सहजतेने जोडल्या गेल्या. तो मर्यादित संसाधनांसह बनवण्यात आला असला तरी त्यातील आशयाने चमत्कार घडवून आणला. होय, या शोचे नाव ‘मालगुडी डेज’ असून तो आर. के.  नारायण यांच्या कथांवर आधारित होता. शंकर नाग यांनी त्याचे दिग्दर्शन केले होते. या शोचे पहिले तीन सीझन आणि कविता लंकेश दिग्दर्शित चौथ्या सीझनमध्ये मिळून ५० हून अधिक एपिसोड तयार झाले.

# नुसरतच्या अडचणी वाढल्या



बांगलादेशी अभिनेत्री नुसरत फारियाला ढाका विमानतळावरून अटक करण्यात आल्याच्या बातमीनंतर तिच्या चाहत्यांना धक्का बसला आहे. एका विद्यार्थ्याच्या हत्येच्या प्रयत्नाच्या प्रकरणात या अभिनेत्रीचे नाव समोर आले असल्यामुळे प्रेक्षक व्यथित आहेत.

नुसरत फारियाने कारकिर्दीची सुरुवात रेडिओ जॉकी आणि टेलिव्हिजन प्रेझेंटर म्हणून केली. त्यानंतर २०१५ मध्ये तिने ‘आशिकी’ या बांगलादेशी रोमँटिक चित्रपटातून मोठ्या पडद्यावर पदार्पण केले. तिचा हा पहिला चित्रपटच हिट ठरला. पाठोपाठ ‘हिरो ४२०’, ‘बॉस २’, ‘प्रेमी ओ प्रेमी’ आणि ‘ऑपरेशन सुंदरबन’ सारख्या अनेक हिट चित्रपटांमध्ये तिने काम केले.

ग्लॅमर जगात नाव कमावण्यासोबतच फारियाने अभ्यासातही स्वतःला सिद्ध केले. तिने लंडन विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली आहे. फारियाच्या कारकिर्दीतील सर्वात मोठी कामगिरी म्हणजे २०२३ मध्ये प्रदर्शित झालेला ‘मुजीब: द मेकिंग ऑफ अ नेशन’ हा बायोपिक, ज्यामध्ये तिने शेख हसीनाची भूमिका साकारली होती. श्याम बेनेगल दिग्दर्शित या भारत-बांगलादेश सहनिर्मिती चित्रपटाने तिला घराघरात ओळख मिळवून दिली. तिच्या अभिनयाचे प्रेक्षक आणि समीक्षकांनी खूप कौतुक केले.

मात्र आता ही अभिनेत्री हत्येच्या प्रयत्नाच्या आरोपाखाली ढाक्यातून अटकेत आहे. ती कायदेशीर अडचणीत अडकली आहे.  ढाका विमानतळावरून अटक करण्यात आली जेव्हा ती थायलंडला जाणाऱ्या विमानात चढणार होती. वातारा परिसरात एका विद्यार्थ्याच्या हत्येच्या प्रयत्नाप्रकरणी तिच्याविरुद्ध अटक वॉरंट जारी करण्यात आले होते. हे प्रकरण २०२४ च्या सरकारविरोधी निदर्शनांशी संबंधित असून तेव्हा देशभरात हिंसाचार उसळला होता. या प्रकरणात फारियासह १७ जणांना आरोपी करण्यात आले आहे. सध्या या अभिनेत्रीकडे सहा आगामी प्रोजेक्ट असून ते लवकरच प्रदर्शित होण्याच्या स्थितीत होते. मात्र आता अटकेमुळे तिच्या कारकिर्दीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या पोलीस तिची चौकशी करत असून हे प्रकरण न्यायालयीन प्रक्रियेत आहे.

# सुनावले खडे बोल




मनोरंजन विश्वात रवी किशन हे नाव चांगलेच परिचित आहे. नुकतेच त्यांनी पाकिस्तानला उघड इशारा दिला असून या देशाने दहशतवाद्यांना चिथावणी दिली तर भारताकडून योग्य उत्तर मिळेल असे स्पष्ट केले आहे. अभिनेते आणि भाजप खासदार रवी किशन हे केवळ अभिनयासाठीच नव्हे तर त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखले जातात. रवी किशन अनेकदा देशाशी संबंधित मुद्यांवर उघडपणे मत व्यक्त करतात. यातच त्यांनी भारतीय सैन्याच्या ‘ऑपरेशन सिंदूर’चे कौतुक केले असून दहशतवादाविरुद्ध भारताच्या भूमिकेबद्दलही वक्तव्य केले आहे. भारत हा शांतताप्रिय देश आहे. पण पाकिस्तानने कोणतीही दहशतवादी कारवाया केली किंवा भारताला चिथावणी दिली तर भारत युद्धापासून मागे हटणार नाही. त्याला योग्य उत्तर मिळेल. भारतीय सशस्त्र दलांना योग्य उत्तर कसे द्यायचे हे माहीत आहे... असे ते यावेळी म्हणाले.

कामाच्या बाबतीत बोलायचे झाले तर लवकरच रवी किशन अजय देवगणसोबत ‘धमाल ४’ चित्रपटात दिसणार आहेत. ‘धमाल’ फ्रँचायझीचा हा चौथा भाग आहे. या चित्रपटात एक मोठी स्टारकास्ट बघायला मिळेल. त्यात अजय देवगण व्यतिरिक्त, रितेश देशमुख, अर्शद वारसी, संजय मिश्रा, जावेद जाफरी, संजीदा शेख यांच्यासह अनेक स्टार्स दिसतील. याशिवाय हा लोकप्रिय कलाकार अजय देवगणसोबत ‘सन ऑफ सरदार २’ मध्येही एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.

भोजपुरी आणि बॉलिवूड व्यतिरिक्त रवी किशन दक्षिण चित्रपटांमध्येही काम करत आहेत.

## At a Glance

### बीएसएफच्या लेकींचा असामान्य पराक्रम



**नवी दिल्ली:** 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सीमा सुरक्षा दलात (बीएसएफ) कार्यरत भारताच्या शूर लेकींनी असामान्य पराक्रम दाखवला, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी त्यांचे कौतुक केले. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमध्य आयोजित 'लोकमाता देवी अहिल्याबाई महिला सशक्तीकरण महासंमेलना'स संबोधित करताना ते बोलत होते. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केवळ भारतीयांचे रक्त सांडले नाही तर आपल्या संस्कृतीवरही हल्ला केला. त्यांनी आपल्या समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. या दहशतवाद्यांनी भारताच्या नारीशक्तीला आव्हान दिले आहे, जे आता दहशतवाद्यांसाठी आणि त्यांच्या सूत्रधारांसाठी एक दुःस्वप्न बनले आहे. 'ऑपरेशन सिंदूर' ही भारताची सर्वात मोठी आणि सर्वात यशस्वी दहशतवादविरोधी कारवाई आहे. भारताच्या सैन्याने अशा ठिकाणी दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट केले, ज्याची पाकिस्तानच्या सैन्यानेही कल्पना केली नव्हती. या कारवाईने हे स्पष्ट केले की दहशतवादाद्वारे प्रॉक्सी युद्धे आता सहन केली जाणार नाहीत. आता भारत शत्रूच्या हद्दीतही हल्ला करू आणि दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्यांनाही मोठी किंमत मोजावी लागेल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

# उद्योग मंत्री व शरद पवारांचा दौरा फेल

## निमगाव भोगीच्या ओढ्यात पुन्हा दूषित पाणी

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**रांजणगाव गणपती :** राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत आणि देशाचे माजी कृषिमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचा दौरा होऊन पंधरा दिवस होत नाही तेच रांजणगाव औद्योगिक वसाहती मधील एम ई पी एल या कंपनीने दूषित पाणी पुन्हा निमगाव भोगीच्या ओढ्यात सोडल्याने उद्योग मंत्री व शरद पवारांचा दौरा फेल झाला असे म्हणायची वेळ आमच्यावरती आले असल्याची प्रतिक्रिया सरपंच ज्योती सांबारे व माजी सरपंच अंकुश इचके यांनी दिली आहे.

पंधरा मे रोजी शरद पवार व उद्योग मंत्री उदय सामंत यांनी रांजणगाव औद्योगिक वसाहतीमध्ये निमगाव भोगी ग्रामस्थांच्या विनंतीला मान देऊन औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषण करणाऱ्या महाराष्ट्र एनव्हायरो लिमिटेड या कंपनीच्या दूषित पाण्यासंदर्भात पाहणी दौरा केला होता. याप्रसंगी समस्येवर लवकरात लवकर तोडगा काढण्यात येईल असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले होते.



**पुणे** महाराष्ट्र एनव्हायरो पावर लिमिटेड या कंपनीने सोडलेल्या दूषित पाण्याची पाहणी करताना अधिकारी व ग्रामस्थ

माजी केंद्रीय मंत्री शरद पवार व उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या दौऱ्यामुळे संबंधित कंपनीने गेल्या अनेक दिवसापासून ओढ्यात केमिकल सोडायचे बंद केले होते. मात्र मागील आठवड्यामध्ये झालेला दमदार पाऊसा मुळे कंपनीच्या ज्या ठिकाणी कचरा गाडते त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने कंपनीने मागील दोन दिवसांपासून दिवसाढवळ्या या ओढ्या नाल्यांमध्ये पुन्हा पाणी सोडले. यामुळे निमगाव भोगी ग्रामस्थांचा भ्रमनिरास झाला आहे. हे दूषित पाणी लवकरात लवकर बंद करावे अशी मागणी करणारे निवेदन ग्रामपंचायतच्या वतीने देण्यात आले असल्याचे सरपंच ज्योती लक्ष्मण सांबारे यांनी सांगितले.

या प्रसंगी उपसरपंच विकास रासकर, तंटामुक्ती अध्यक्ष रामदास सांबारे, उपाध्यक्ष बाळासाहेब राऊत, विकास रासकर,निळू व्यवहारे, चंद्रकांत रासकर, काळुराम व्यवहारे, एमआयडीसीचे अधिकारी भूषण ठाणगे आदी उपस्थित होते.

> याबाबत रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन, उप अभियंता एमआयडीसी ऑफिस रांजणगाव, उपप्रादेशिक अधिकारी जोग सेंटर वाकडेवाडी पुणे, प्रदूषण नियंत्रण महामंडळ पुणे यांना निवेदन देण्यात आले आहे.
> **— सरपंच ज्योती लक्ष्मण सांबारे**

# सीएसआर उपक्रमांना मिळणार चालना

### मलाबार समूहाकडून १५० कोटी रुपयांची तरतूद



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** भारतातील आघाडीचा व्यावसायिक समूह आणि मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची पितृकंपनी असलेल्या मलाबार समूहाने २०२५-२६ मध्ये आरोग्यसेवा, शिक्षण, भूक आणि गरिबी निर्मूलन, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संरक्षण आणि वंचितांसाठी घरे यावर लक्ष केंद्रित करून त्यांच्या सामाजिक दायीत्व अर्थात सीएसआर उपक्रमांना चालना देण्यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**सामाजिक**

'द हंगर फ्री वर्ल्ड' या त्यांच्या प्रमुख सीएसआर उपक्रमांतर्गत, समूहाने भारत आणि झांबियामध्ये दररोज ७०,००० अन्न पाकिटे वंचितांना वितरित करण्याचे वचन दिले आहे, ज्याचे प्रमाण २०२५-२६ मध्ये एकूण २.५० कोटी अन्न पाकिटांवर जाणार आहे. मागील ३ वर्षात २.५ कोटी अन्न पाकिटे वितरित करण्यात आल्याच्या समूहाच्या एकत्रित कामगिरीच्या तुलनेत ही एक महत्त्वपूर्ण झेप दर्शविते आणि वंचित समुदायांसाठी अन्न सुरक्षेच्या उद्दिष्टाप्रती समूहाच्या अधिक दृढ वचनबद्धतेला अधोरेखित करते. हा उपक्रम संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येय २ - शून्य भूक याच्याशी सुसंगत आहे.

जागतिक भूक दिनानिमित्त, नुकतेच नवी दिल्लीतील जनपथ येथील डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात आयोजित एका कार्यक्रमात, निती आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जी-२० शेर्पा डॉ. अमिताभ कांत यांनी समूहाच्या सीएसआर कार्यक्रमांच्या पुढील टप्प्याची विधिवत सुरुवात केली. याप्रसंगी उपस्थित इतर मान्यवरांमध्ये मलाबार समूहाचे अध्यक्ष एम.पी. अहमद; मलबार समूहाचे उपाध्यक्ष के.पी. अब्दुल सलाम आणि मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या भारतातील कारभाराचे व्यवस्थापकीय संचालक ओ. आशर यांचा समावेश होता.

> "सीएसआर हा मलाबार समूहामध्ये आमच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग बनला आहे आणि आम्ही समाजाला परतफेड करण्यावर विश्वास ठेवतो. आमचे सीएसआर उपक्रम त्या चिरस्थायी वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहेत.
> **-एम.पी. अहमद**, मलाबार समूहाचे अध्यक्ष

# अहिल्याबाई होळकर यांना भाजपाच्या वतीने अभिवादन

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्य तिनशेव्या जन्मशताब्दीनिम्मित भारतीय जनता पार्टीच्या वतीने अभिवादन करणयात आले



सारसबागे समोरील अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष धीरज घाटे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, खासदार डॉ मेधा कुलकर्णी, आमदार हेमंत रासने, सरचिटणीस रवींद्र साळेगावकर, राजेंद्र शिळीमकर, सुभाष जंगले ,वर्षा तापकीर ,प्रमोद कोंढरे, हर्षदा फरांदे विकास लवटे यांच्या सह नगरसेवक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी महिला पदाधिकारी मोठ्या प्रमाणात पारंपारिक वेष परिधान करून उपस्थित होत्या.

# अवकाळीमुळे मे अखेरिस नदी पात्रे तुडूंब

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सलग पंधरा दिवस अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने यंदा प्रथमच मे महिन्याच्या अखेरीलाच घोड, मीना नद्यांची पात्रे तुडुंब पाण्याने भरून वाहताना दिसत आहेत. हे सुखदायी चित्र गेल्या अनेक वर्षातून नागरिकांना पाहायला मिळत आहे . त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्व नागरिकांमधून समाधानाचे, आनंदाचे वातावरण सध्या दिसत आहे.



९ मे रोजी आंबेगाव तालुक्यात अवकाळी पावसाला सुरुवात झाली.सलग पंधरा दिवस दररोज मुसळधार पाऊस पडत होता.या अवकाळी पावसामुळे अनेक गावां मधिल ओढे, नाले भरभरून वाहीले. सलग पडलेल्या पावसाचे पाणी शेती पिकांमध्ये साचून राहिल्याने शेती पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले.परंतू पावसाळ्याच्या अगोदरच पाणी टंचाई संपली असल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण दिसत आहे सध्या तालुक्याच्या पूर्व भागात वरदान ठरलेल्या घोड ,मीना नद्यांची पात्री तुडुंब पाण्याने भरून वाहताना दिसत आहेत.तसेच अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी देखील तुडुंब पाण्याने भरल्या आहेत. दरवर्षी पावसाळ्यातील पहिले दोन महिने नद्या, विहिरी, तलाव भरण्याची प्रतीक्षा शेतकऱ्यांना असते.परंतु यंदा मे महिन्याच्या अखेरीलाच जोरदार पाऊस पडल्याने पाण्याचे संकट दूर झाले आहे.

### महिलांना अर्ध्या भाड्यात बस प्रवास

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** या महिन्यापासून महिलांना आर्थिक लाभ होणार आहे. वसई-विरार महानगरपालिकेने महिलांना आनंदाची बातमी दिलीय. येत्या १ जूनपासून महिलांना बस भाड्यात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय वसई-विरार महानगरपालिकेने घेतलाय. ही योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रशासकीय मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आल्याची माहिती वसई-विरार महापालिकेचे आयुक्त अनिल कुमार पवार यांनी दिली आहे.

महिलांना बसमध्ये ५० टक्के सवलत देण्याच्या राज्य सरकारच्या धोरणानुसार आज १ जूनपासून महिलांना अर्ध्या दराने तिकिटे देण्याचा निर्णय घेतलाय, असे अनिल कुमार पवार म्हणाले.

# शिवसेनाच्यावतीने अंमली पदार्थांची होळी

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**वडगाव शेरी :** शिवसेनेच्या वतीने वडगाव शेरी चंदन नगर भाजी मंडई छत्रपती शिवाजी महाराज स्मारका समोर डॉक्टर कल्याणजी गंगवाल यांच्या उपस्थितीमध्ये गुटखा ,सिगारेट ,तंबाखू इतर व्यसनी वस्तूंची छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासमोर होळी करण्यात आली.

यावेळी डॉक्टर कल्याण गंगावल तसेच महानगर शिवसेना प्रमुख पुणे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या उपस्थितीत हेमंत बत्ते यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

डॉ. कल्याण गंगवाल म्हणाले की भारतामध्ये मोठ्या प्रमाणात तरुणांचा वर्ग हा व्यसना कडे ओढत चालला आहे आणि याकडे दुर्लक्ष होत आहे. सरकारने जे जे लोक तंबाखू, गांजा, अमली पदार्थ पीक घेतात त्यांच्यावर कडक कारवाई करून त्यांची शेती जप्त करावी. तसेच छोटे छोटे विक्रेत्या वर कारवाई करण्यापेक्षा उत्पादन मोठ्या प्रमाणात होतं अशा कारखानदारांना कडक शासन देऊन त्यांची सर्व मालमत्ता जप्त करावी!



आज अमली पदार्थ गुटखा तंबाखूमुळे मोठ मोठे रोग झालेले आहेत. त्यामुळे लोकांना जनजागृती करणे आवश्यक आहे.

पान १ वरून

## मंत्र्यांची वादग्रस्त वक्तव्य !

यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान हे शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करत आहेत. दोन दिवसांपूर्वी केंद्र सरकारने १७ पिकांसाठी सुमारे दीडपट हमीभाव जाहीर केला आहे. मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार हे शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रयत्नशील आहेत. अजित पवार यांनी मला हे कृषी खाते जाणीवपूर्वक दिले आहे. शेतकऱ्यांच्या मुलांनी शेतीविषयक शिक्षण घेऊन, शेती आधारित व्यवसायात करिअर करावे, असा सल्ला देखील त्यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिला आहे. आता माणिकराव कोकाटे यांच्या वक्तव्यानंतर नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### 'त्या' विधानावर माणिकराव कोकाटेंचे स्पष्टीकरण

● "हार्वेस्टिंग झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय करणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का?" असं वक्तव्य माणिकराव कोकाटे यांनी केलं होतं. यानंतर माणिकराव कोकाटे यांनी आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण दिले आहे. "मी असं काही बोललोच नाही," त्यांनी सांगितलं की, "राज्यात बऱ्याच ठिकाणी पेरणी पूर्ण झाली आहे. फळबागांचे नुकसान झाले असल्याने त्याचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. काही भागांत कांद्याची लागवड झाल्यामुळे कांद्याचेही नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतीमध्ये उत्पादन कमी आहे.

## पुण्यातील विद्यार्थिनीला....

दिसत नसल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

बॉलिवूड सेलिब्रेटी चित्रपटात देशासाठी बलिदान देण्याची भाषा करतात. पण ऑपरेशन सिंदूर सुरू होते त्यावेळी सरकारच्या बाजूने आणि पाकिस्तान विरोधात बोलण्याची हिंमत अनेक कलाकारांनी दाखवली नव्हती. हे निरीक्षण नोंदवत शर्मिष्ठाने व्हिडीओद्वारे बॉलिवूड सेलिब्रेटी आणि विशिष्ट धर्माच्या नागरिकांवर टीका केली होती. ऑनलाईन आक्षेप वाढल्यावर शर्मिष्ठाने एक नवा व्हिडीओ केला आणि ज्यांची मनं दुखावली अशा सर्वांची माफ मागितली होती. पण या माफीनाम्याने वाद शमला नाही. प्रकरण आणखी चिघळले आणि कोलकाता पोलिसांनी शर्मिष्ठाला अटक केली.

## युपीआय, पीएफ बाबत नवे नियम

आणखी कपात अपेक्षित आहे. सेबीने ओव्हरनाईट म्युच्युअल फंड योजनेसाठी लागू केलेला नवीन कट ऑफ वेळ लागू होणार आहे. युपीआय पेमेंट करताना वापरकर्त्याला फक्त बँकिंग नाव दिसेल क्यू आर कोड संपादित दिसणार नाही.

## अहिल्यामातांच्या जीवनावर....

यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सवात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, दत्ता भरणे, अतुल सावे, गोपीचंद पडळकर यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

## पाकिस्तानला धक्का..

शक्य आहे."

थरूर म्हणाले की, २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यामागे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांचा हात असल्याचे भारताकडे ठोस पुरावे आहेत. २६ निष्पाप लोक मारले गेले आणि भारताने केवळ स्वसंरक्षणार्थ प्रतिसाद दिला. भारताची दहशतवादावरील कठोर भूमिका जागतिक व्यासपीठांवर पोहोचवण्यासाठी हे शिष्टमंडळ ३३ देशांच्या दौऱ्यावर आहे. कोलंबियानंतर, हे शिष्टमंडळ ब्राझील आणि नंतर अमेरिकेला जाईल."

यामुळे येत्या काही दिवसांत शशी थरूर यांची राजनैतिकता पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी एकाकी पाडेल असे दिसून येत आहे. तसेच भारताची रणनीती आता अधिक देशांवर प्रभाव पाडेल. या राजनैतिक विजयाला मोठे यश म्हटले जाऊ शकते.

## भारताचा 'टायगर मॅन' थापर कालवश

स्थापना केली, याद्वारे त्यांनी स्थानिक समुदायांना वाघ संवर्धनात सहभागी करून घेतले.

वाल्मीक थापर यांनी ३० हून अधिक पुस्तके लिहिली, ज्यात 'लँड ऑफ द टायगर' आणि 'टायगर फायर' यांचा समावेश आहे. त्यांनी बीबीसी, ॲनिमल प्लॅनेट आणि नॅशनल जियोग्राफिक साठी अनेक माहितीपट तयार केले. त्यांनी १५० हून अधिक सरकारी समित्यांमध्ये सेवा दिली, ज्यात राष्ट्रीय वन्यजीव मंडळ आणि टायगर टास्क फोर्सचा समावेश आहे .

## पूर्वोत्तर भारतात....

७ जणांचा मृत्यू झाला, तर लोअर सुबनसिरी जिल्ह्यात २ मजुरांचा मृत्यू झाला. सिगिन नदी धोक्याच्या पातळीवर आहे. हवामान खात्याने १ ते ५ जूनदरम्यान जोरदार पावसाचा इशारा दिला आहे.

त्रिपुरात देखील पावसाचा जबरदस्त परिणाम दिसून आला. येथे पाण्यात बुडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. १०६ घरे उद्ध्वस्त झाली असून, २०० हून अधिक लोक बेघर झाले आहेत. हावडा नदीचा पाण्याचा स्तर १०.०१ मीटर वर गेला आहे.

## हैद्राबाद आणि ...

"फ्लाय 91" कंपनीची सिंधुदुर्ग हैद्राबाद आणि बंगलोर विमान फेरी सेवा ११ जून पासून सुरू होणार आहे. कंपनी तर्फे विमानसेवे ची प्रवाशांना बुकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लवकरच या दोन सेवा सुरू होतील त्यामुळे प्रवाशांना त्यांचा फायदा होणार आले. तरी प्रवाशांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन कंपनीतर्फे करण्यात आले आहे. वेंगुर्ले तालुक्यातील चिपी येथील सिंधुदुर्ग विमानतळावर सध्या या कंपनीची सिंधुदुर्ग पुणे विमान फेरी आठवड्यातून पाच दिवस सुरू आहे. त्यातच कंपनी तर्फे हैद्राबाद आणि बंगलोर सेवा सुरू करण्यात येणार आहे.



# गुलजार द ग्रेट!



**भावनांना अस्खलित शब्दरुप देणारा गीतकार म्हणजे गुलजार. त्यांना अलिकडेच राहत्या घरी 'ज्ञानपीठ' पुरस्कार प्रदान केला गेला. सामान्यांच्या भावनांची नेमकी नस गवसलेला हा कवी अनेक चित्रपटांमधील गीतांमधून आपल्याला भेटतो आणि आशयघन मांडणीने भारुन टाकतो. मराठी मातीशी, मुंबईशी जुळलेला त्याचा स्नेहही अनोखा आहे. कुसुमाग्रजांच्या कवितांचे भाषांतर करुन त्याने तो दाखवून दिला आहे.**



देशातच नव्हे तर जगात आपली ओळख निर्माण करणाऱ्या प्रख्यात कवी गुलजार यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान होणे ही त्याच्याबरोबरच प्रत्येक चाहत्यासाठी, संगीतप्रेमीसाठी आनंदाची बाब आहे, असे मला वाटते. 'गुलजार' असे एकेरी संबोधनच त्याच्यावरील अतीव आणि आंतरिक प्रेमाची साक्ष देण्यास पुरेसे आहे. हदी आणि उर्दूमध्ये कविता, गीते लिहिली असली तरी त्याची मराठीशी घट्ट नाळ जोडलेली असणे, हीदेखील आपल्याला त्याच्याशी जोडणारी एक मोठी बाब म्हणता येईल. गुलजार स्वत:देखील आपण महाराष्ट्राचे असल्याचे मानतो. त्याने सध प्रांत सोडला, रावी पार केले आणि मुंबईमध्ये संघर्षाचे सगळे दिवस काढले. इथेच त्याची कारकिर्द घडली, बहरली. या सगळ्यातून तो इथलाच होऊन गेला. त्यामुळेच त्याला मिळालेला हा सर्वोच्च सन्मान अधिक आपलासा वाटतो. वस्तुत: मोजकीच नावे अशी आपलीशी, आपल्यात मिसळून गेलेली वाटतात. त्यातील एक नाव म्हणजे निदा फाजली. जावेद अख्तर याचे नावही यात घ्यावे लागेल. पण याव्यतिरिक्त फारशी नावे पटकन आठवत नाहीत. असे असताना मराठी संस्कृती, भाषा, इथली माती या सगळ्याशी एकरुप, समरस झालेले हे नाव अधिक जवळचे वाटते.

असे सुरेख मिसळले गेल्यामुळेच गुलजार कुसुमाग्रजांच्या कवितांचे भाषांतर करु शकला तर, दुसरीकडे शांताबाईंनी त्याच्या 'त्रिवेणी'चे मराठीत भाषांतर केले. याचे त्याने तोंड भरुन कौतुकही केले. एकमेकांबरोबर असणारे असे नाते फार देखणे असते. तो मराठी वाचतो. आपल्याला उर्दू ऐकवतो. या अर्थाने तो कायमच खूप मराठीमय वाटतो. या संदर्भात बोलायचे तर आपण सत्यदेव दुबे यांच्या पंक्तीत त्याचे नाव घेऊ शकतो. दुबे हदी असले तरी आयुष्य संपूर्ण मराठी नाट्यसृष्टीला वाहून घेतले होते, तसेच गुलजारचेही आहे. तो उर्दू वा हदीला मानतो तेवढेच मराठीलाही मानतो. अन्यथा, कुसुमाग्रजांच्या कवितांचे भाषांतर करुन त्याच्यावर आधारित प्रयोग करण्याचे काम त्याच्या हातून झाले नसते. किशोर कदम आणि गुलजार एकत्रितपणे हा सुंदर प्रयोग करतात. त्यात सौमित्र मराठीत कविता वाचतो तर त्याचे हिंदी भाषांतर गुलजार वाचतो. यातून त्याचे मराठीप्रमाणेच कुसुमाग्रजांविषयीचे प्रेमही बघायला मिळते.

माझ्याप्रमाणेच आपल्यापैकी प्रत्येकाचा त्याच्या गाण्यांशी अगदी जवळचा, जिव्हाळ्याचा संबंध आहे. चित्रपटांमधील त्याची गाणी अनेकांच्या हृदयाचा ठाव घेणारी, त्याच्याशी जोडून ठेवणारी आहेत. काही कार्यक्रमांच्या निमित्ताने मंचावर एकत्र आलो असता त्यांच्याशी संवाद साधण्याचे प्रसंगही मला लाभले. अर्थातच वैयक्तिकदृष्ट्या ती माझ्यासाठी फार मोठी बाब आहे. त्याच्या गाण्यांविषयी काय आणि किती बोलणार...! 'बंदिनी'मधील त्याचे पहिले गाणे कोण विसरु शकेल? 'मोरा गोरा अंग लैलै...'पासून त्याच्या गाण्यांनी रसिकांच्या मनाचा ठाव घेतला, तो सिलसिला अजूनही संपलेला नाही. 'इजाजत', 'मौसम', 'आंधी'... किती यादी देणार? अनेक गाणी आपल्या ओठांवर असून ती त्याची आहेत तितकीच आपल्या प्रत्येकाची आहेत. ती सहज ओठांवर येतात. हलकेच गुणगुणावीशी वाटतात. कवी म्हणून मला नेहमी वाटते की गाणी लिहिणे ही एक कला आहे. यमके जुळवत काहींना ती जमते. बरेच गीतकार या पद्धतीने गाणी लिहितात. मात्र गुलजार असे कधीच करत नाही. त्याचे गाणे आशयाच्या अंगाने येते. त्याच्या कवितेत कृत्रीम गोष्टीदेखील जिवंत रुप घेऊन येतात. त्याच्या कवितेत रात्र ढळत नाही तर हातून निसटते. एखादा क्षण हातून हलकेच ओघळतो. त्याची कविता वाट बघणारी तिन्हीसांज दाखवते. काव्यशास्त्रामध्ये याला आम्ही 'व्यक्तिकरण' म्हणतो. ही बाब गुलजारला फार छान जमली आहे. म्हणूनच त्याच्या कवितेतील पाऊस आपल्याला जवळचा मित्र भेटावा तसा भेटतो. तो 'मेरा कोई सामान लौटा दो...' म्हणतो तेव्हा ते सामान आठवणी, भूतकाळातील घटना, सहवास या सगळ्यांचे गाठोडे असते. वस्तू, सामान, निसर्ग, आठवणी या सगळ्यांना व्यक्तिरुप देणारी, आपलेसे करणारी, अधिक जवळ आणणारी त्याची ही शैली फार देखणी आहे. म्हणूनच ती तुम्हा-आम्हा प्रत्येकाला आवडणारी आहे. याच हक्काने आपण त्याला एकेरी नावाने बोलवतो. शैलेंद्र, नीदा फाजली, साहिर यांच्या श्रेणीत बसणारे हे एक जवळचे नाव आहे. खरे सांगायचे तर, कवितेच्या प्रांतातील आम्ही सगळेच साहिरनंतर आदराने पाहतो ते नाव म्हणजे गुलजार.

'मेरे अपने' नावाचा चित्रपट आता मला आठवतो. यात हाती काम नसणाऱ्या युवकांच्या प्रश्नाला हात घातला होता. त्या काळात भारतभर बेरोजगार युवकांच्या चळवळी सुरू झाल्या होत्या. नोकरीसाठी तरुण वाट मिळेल तिथे पळत होते. या सगळ्याचे चित्रिकरण या चित्रपटात अगदी नेमकेपणाने दिसते. ही शिकलेली, तरुण मुले हाती काम नसल्यामुळे गुंडगिरीकडे कशी वळतात, त्यांचे गट कसे होतात, ते कसे गुन्हेगारी करु लागतात हे प्रभावीपणे सांगण्याचा प्रयत्न यामध्ये झालेला दिसतो. गुलजारची ग्रेट गोष्ट म्हणजे त्याने हे सगळे प्रत्यक्ष सुरू होते, त्याच काळात एका कथानकातून विषय रुपेरी पडद्यावर आणला. आपल्याकडे 'अधांतर' नावाचे नाटक जवळपास याच विषयावर बेतलेले आहे. पण ते रंगमंचावर यायला जवळपास 20 वर्षे लागली. जयंत पवार यांनी ते लिहिले आणि गिरणी कामगारांचा प्रश्न मंचावर आणला. पण 'मेरे अपने' हा चित्रपट त्याच्या किती तरी आधी गुलजारने पडद्यावर आणला होता. यातील एक वृद्धा या तरुणांना सांभाळते आणि सन्मार्गी आणण्याचा प्रयत्न करते. पुढे 'अंकुश' मध्ये याच प्रश्नाला हात घालण्यात आला, पण गुलजारने त्याआधीच हाताला काम नसणाऱ्या युवकांच्या समस्येला तोंड फोडले. कोणी तरी आपल्याला आपले म्हणावे, ही या तरुणांच्या मनातील भावना त्याने शब्दांवाटे मांडली. गुलजारने अशा अनेक मानवी भावनांना वाट मोकळी करुन दिली.

'सब कुछ ठीक ठाक है...' हे त्याचे गाणेही असेच लक्षात राहिले आहे. खरे तर परिस्थिती अगदीच विपरित असते. काहीच नीट नसते. आयुष्य भरकटलेले असते. पण तरीही चित्रपटातील तरुण 'सब कुछ ठीकठाक है' म्हणतात तेव्हा एक प्रकारे परिस्थितीवर प्रहार होतो, नैराश्य व्यक्त होते आणि हे सगळे उपहासात्मक शैलीत होते. म्हणजेच कधी गुलजार पराकोटीच्या तरल शैलीत लिहिताना दिसतो तर दुसरीकडे तो असेही काही लिहून जातो. तो 'आंधी' मधील गाणी लिहितो आणि तोच नंतर 'बीडी जलै ले..' लिहितो. ही रेंज अफलातून आहे. खरेचच तो अस्सल मुंबईकर झाला आहे. मुंबईचे सगळे वातावरण त्याच्या रक्तात मिसळून घेतल्यामुळे तो करतो ते सगळे वर्णन सामान्य माणसाला जवळचे वाटते.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे गुलजारने एस.डी.बर्मन, सलिल चौधरी, लक्ष्मिकांत- प्यारेलाल, आर. डी. बर्मन, मदनमोहन पासून अगदी ए. आर. रेहमान यांच्याबरोबर काम केले आहे. ही रेंजदेखील असामान्य म्हणावी लागेल. कवी म्हणून गुलजारचा हा गुण मला अत्यंत मोलाचा वाटतो. गाणी लिहिताना संगीतकारांशी संबंध येतो तेव्हा प्रत्येकाची निकड वेगळी असते. प्रत्येक संगीतकार गाण्याचे वेगळे मीटर सांगत असतो. त्याला कसे गाणे हवे आहे, ते स्पष्ट करत असतो. सगळ्याच कवींना प्रत्येकाला हवे तसे गाणे देणे शक्य होत नाही. आपण 'तेथे पाहिजे जातीचे...' म्हणतो; तसे येथे असते. या धर्तीवर पाहता गुलजार सांगाल ते सगळे देणारा माणूस आहे, असे मला वाटतो. तो कोणत्याही मीटरमध्ये लिहू शकतो. कॅब्रे, प्रेमाचे गाणे, विरहाचे गाणे असे काहीही तो तेवढ्याच सहजतेने लिहू शकतो. आजही मी 'मिली' वा 'घर' मधील गाणी ऐकतो तेव्हा तो किती आपल्या मानसिकतेशी जोडलेला आहे, हे समजते. त्याची प्रत्येक ओळ आपल्या मनाने कधी ना कधी अनुभवलेली असते. म्हणूनच त्याची गाणी जाणकारांबरोबर सर्वसामान्यांनाही आवडतात. अभिजात, समिक्षक वर्गाला त्याचे काव्य आवडते, तसेच सामान्यातील सामान्यही त्याचा आस्वाद घेऊ शकतो. या कसोटीवर उतरत असल्यामुळेच गुलजार ग्रेट ठरतो.

**गौरव**
**अरुण म्हात्रे, कवी**
**राष्ट्रसंचार**

# भरारी एलआयसीची आणि अर्थव्यवस्थेचीही

**चोवीस तासांमध्ये सर्वाधिक विमा पॉलिसी विकण्याचा 'एलआयसी'चा विश्वविक्रम अलिकडेच चर्चेचा विषय ठरला. त्याच वेळी चौथी मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या भारताच्या वाटेत अडचणी निर्माण करण्याबाबत अमेरिका, पाकिस्तान अपयशी ठरले. दरम्यान, कामगारांचे पगारापेक्षा सुविधांना प्राधान्य असल्याचे चित्र एका सर्वेक्षणातून पुढे आले. तसेच रिझर्व्ह बँकेच्या लाभांशाने संरक्षणक्षेत्राला बळ मिळणार असल्याचेही स्पष्ट झाले.**

२४ तासात सर्वाधिक विमा पॉलिसी विकण्याचा 'एलआयसी' चा नवा विश्वविक्रम अलिकडेच चर्चेचा विषय ठरला. त्याच वेळी चौथी ताकदवान अर्थव्यवस्था बनण्याच्या भारताच्या वाटेत अडचणी निर्माण करु पाहणाऱ्या अमेरिका, पाकिस्तानच्या मनसुब्यावर भारताने पाणी फेरले. दरम्यान, पगारापेक्षा अन्य सुविधांना कामगारांचे प्राधान्य असल्याचे चित्र एका सर्वेक्षणातून पुढे आले. या व्यतिरिक्त रिझर्व्ह बँकेच्या लाभांशाने संरक्षणक्षेत्राला बळ मिळणार असल्याचे स्पष्ट झाले.

भारतीय जीवन विमा महामंडळ (एलआयसी) ने अलिकडेच एक मोठा विक्रम केला. 'एलआयसी' ने २४ तासात सर्वाधिक विमा पॉलिसी विकून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. 'एलआयसी' च्या या विक्रमाची नोंद 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' ने घेतली आहे. 'एलआयसी' च्या एकूण चार लाख ५२ हजार ८३९ एजंट्सनी संपूर्ण भारतात ५ लाख ८८ हजार १०७ जीवन विमा पॉलिसी विकून एक नवा विक्रम प्रस्थापित केला. या ऐतिहासिक कामगिरीची पुष्टी 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने' केली आहे. यासोबतच २० जानेवारी २०२५ रोजी 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्डस' ने 'एलआयसी' च्या नेटवर्कच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले आहे. देशभरातील एकूण ४५२८३९ एलआयसी एजंट्सनी ५८८१०७ जीवन विमा पॉलिसी विकून हा विक्रम साध्य केला आहे.

'एलआयसी' ने म्हटले आहे की २४ तासांच्या आत जीवन विमा उद्योगात एजंट उत्पादकतेसाठी एक नवीन जागतिक बेंचमार्क स्थापित झाला आहे. हे संस्थेच्या एजंट्सच्या समर्पणाचे, कौशल्याचे आणि अथक परिश्रमाच्या नीतिमत्तेचे एक शक्तिशाली प्रमाण असल्याची माहिती 'एलआयसी' च्या निवेदनात दिली आहे. ही कामगिरी आपल्या ग्राहकांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना महत्त्वाची आर्थिक सुरक्षा प्रदान करण्याच्या ध्येयाप्रती आपली खोल वचनबद्धता दर्शवते, असे 'एलआयसी' ने म्हटले आहे. त्यांनी प्रत्येक एजंटला २० जानेवारी २०२५ रोजी 'मॅड मिलियन डे' योजनेखाली किमान एक पॉलिसी पूर्ण करण्याचे आवाहन केले होते. 'एलआयसी' म्हणजे भारतीय जीवन विमा महामंडळ. जून १९५६ मध्ये भारतीय जीवन विमा कायदा मंजूर झाल्यानंतर सप्टेंबर १९५६ मध्ये ती कॉर्पोरेट फर्म झाली. जुलै १९५६ पासून 'एलआयसी' कायदा लागू झाला. त्यामुळे भारतातील खासगी विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण होण्यास मदत झाली. १५४ जीवन विमा कंपन्या, १६ परदेशी कंपन्या आणि ७५ भविष्य निर्वाह कंपन्यांचे विलीनीकरण करून 'एलआयसी ऑफ इंडिया' ची स्थापना करण्यात आली. ही भारतातील सर्वात मोठ्या वित्तीय संस्थांपैकी एक आहे.

**तिसरा टप्पा भारताच्या दृष्टिक्षेपात**

● याच सुमारास भारताने अनेक संकटांवर मात करत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनून दाखवले. अमेरिकेने भारताची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न केला, तरी भारतीय अर्थव्यवस्थेने अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे डोळे पांढरे केले. जपानला मागे सारत भारताने चौथ्या क्रमांकावर झेप घेतली. आता जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याकडे भारताची आगेकूच सुरू आहे. विशेष म्हणजे तिसरा टप्पा भारताच्या दृष्टिक्षेपात आला आहे.

जागतिक नाणेनिधीनुसार, भारताची अर्थव्यवस्था जपानपेक्षा मोठी झाली आहे.

आता अमेरिका, चीन आणि जर्मनी हे भारताच्या पुढे आहेत. भारत नियोजनाप्रमाणे घौडदौड करत राहिला, तर येत्या अडीच-तीन वर्षांमध्ये जर्मनीला मागे टाकत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल. सत्तेवर आल्यापासून ट्रम्प यांनी चीन आणि भारतासह युरोपच्या मुसक्या आवळण्याचा एकहाती कार्यक्रम सुरू केला आहे. चीन आणि भारतावर त्यांचा विशेष रोष दिसून येत आहे. 'मी म्हणेल तसे वागा, तरच कर आणि व्यापार सवलत मिळतील,' असा दम ते भरत आहेत. त्यांनी आता 'ॲपल कंपनी' ने 'आयफोन' भारतात नाही तर अमेरिकेतच तयार करावा, अशी भूमिका घेतली आहे. तसे न केल्यास २५ टक्क्यांपर्यंत टॅरिफ लावण्याची धमकी दिली आहे. असे असले तरी 'ॲपल' सह अनेक कंपन्या ट्रम्प यांना जुमानायला तयार नाहीत. त्याचे कारण भारतात वस्तू तयार करणे, उत्पादन तयार करणे स्वस्त आहे. मोठे उद्योग भारतात आले, वाढले तर अर्थव्यवस्थेला त्याची मदत होणार, हे इथे लक्षात घेतले पाहिजे.

**आर्थिक**
**महेश देशपांडे**
**अर्थतज्ज्ञ**
**राष्ट्रसंचार**

आता एक वेगळी बातमी. वाढत्या राहणीमानाच्या खर्चामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या बदलत्या आकांक्षांमुळे बहुतेक कर्मचारी दीर्घकालीन फायद्यांसाठी किंचित कमी पगार स्वीकारण्यास तयार आहेत. 'जीनियस कन्सल्टंट्स' या 'स्टाफिंग सोल्युशन्स' आणि एचआर सेवा प्रदात्या कंपनीच्या अहवालामध्ये हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या अहवालात म्हटले आहे की, ७४ टक्के कर्मचारी दीर्घकालीन फायद्यांसाठी किंचित कमी पगार स्वीकारण्यास तयार आहेत.



**भारताची अर्थव्यवस्था जपानपेक्षा मोठी**

● 'नीती आयोगा'चे 'सीईओ' बी. वी. आर. सुब्रमण्यम यांनी याबाबत माहिती देताना नीती आयोगाच्या दहाव्या 'गव्हर्निंग काऊंसिल'च्या बैठकीनंतर ही घोषणा केली. त्यांच्या मते भारतासाठी आता चांगली स्थिती असून देशाची आर्थिक स्थिती मजबूत आहे. भारताची अर्थव्यवस्था चार ट्रिलियन डॉलर इतकी झाली आहे. सुब्रमण्यम यांनी जागतिक नाणेनिधीच्या आकड्यांचा आधार घेत चौथी मोठी अर्थव्यवस्था होणे हा मैलाचा दगड असल्याची माहिती दिली.

दीर्घकालीन फायद्यांमध्ये आरोग्य विमा, निवृत्ती नियोजन आणि शिक्षणासाठी पाठिंबा या मुद्द्यांचा समावेश आहे. 'जीनियस कन्सल्टंट्स' चा अहवाल देशभरातील विविध क्षेत्रांमधील ११३९ कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या अभिप्रायांवर आधारित आहे. त्यानुसार फक्त ३२ टक्के कर्मचाऱ्यांना मिळत असलेले लाभ पॅकेज आर्थिक कल्याणासाठी प्रभावीपणे मदत करते, असे वाटते. त्याचवेळी, ६१ टक्के कर्मचाऱ्यांनी त्यांना मिळणारे फायदे पुरेसे नाहीत, असे सांगितले.

मुलाखत देणाऱ्या ५४ टक्क्यांहून अधिक कर्मचाऱ्यांच्या मते त्यांची कंपनी वेलनेस कार्यक्रम राबवताना मानसिक आणि आर्थिक आरोग्याला प्राधान्य देत नाही. अहवालात म्हटले आहे की, सुमारे ८४ टक्के कर्मचाऱ्यांचा विश्वास आहे की हायब्रीड किंवा रिमोट व्यवस्था (कोठूनही काम करण्याची सुविधा) त्यांना आपले आर्थिक व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करण्यास आणि बचत करण्यास मदत करेल. अहवालात म्हटले आहे की अभ्यासाच्या निष्कर्षांवरून दिसून येते की ते उत्पादकता वाढीपलीकडे कामाच्या ठिकाणी लवचिकता आणि आर्थिक कल्याणामध्ये एक मजबूत संबंध स्थापित करते. सुमारे ७३ टक्के कर्मचाऱ्यांचा विश्वास आहे की कामगिरीवर आधारित बोनस आणि प्रोत्साहनाने त्यांच्या सध्याच्या आर्थिक चिंता कमी होतील.

दरम्यान, भारतीय रिझर्व्ह बँकेने अलिकडेच केंद्र सरकारला २.६९ लाख कोटी रुपयांचा लाभांश दिला. यामुळे केंद्र सरकारला अपेक्षेपेक्षा जास्त लाभांश मिळाला. परिणामी, देशाच्या तिजोरीतील संपत्तीत चांगलीच वाढ होणार आहे. या लाभांशामुळे देशाला विकासकामांसाठी कोणाकडेही निधी मागण्याची गरज पडणार नाही. यासंदर्भातील निर्णय रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. केंद्र सरकारला मिळालेल्या लाभांशामध्ये मागील नऊ वर्षांमध्ये नऊपट वाढ झाली आहे. त्यामुळे भारताला अडचणीत आणण्याचा अमेरिका आणि पाकिस्तानचा मनसुबा अर्थहीन ठरला आहे. रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाची ६१६ वी बैठक गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली झाली. रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२४ -२५ साठी केंद्र सरकारला २.६९ लाख कोटी रुपयांचा लाभांश दिला. मागील वर्षापेक्षा हे प्रमाण २७.४ टक्के जास्त आहे.

रिझर्व्ह बँकेने २०२३ -२४ मध्ये केंद्र सरकारला २.१ लाख कोटी रुपये लाभांश दिला होता. त्यापूर्वी २०२२-२३ या आर्थिक वर्षात ८७४१६ कोटी रुपये लाभांश दिला होता. रिझर्व्ह बँकेकडून विक्रमी लाभांश मिळाल्यानंतर अमेरिका आणि पाकिस्तानचा मनसुबा फोल ठरला. तज्ज्ञांच्या माहितीनुसार, पाकिस्तान भारताला युद्धाच्या संकटात टाकून देशाचे मोठे आर्थिक नुकसान करण्याच्या तयारीत होता. दुसरीकडे, अमेरिका टॅरिफ लावून भारताचे नुकसान करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे भारताच्या विकासदराला धक्का बसण्याची शक्यता होती. यावेळी रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या लाभांशामुळे अमेरिकेकडून लावण्यात आलेले टॅरिफ आणि पाकिस्तानविरोधात लढा देण्यासाठी संरक्षण क्षेत्र मजबूत करण्यास मदत मिळणार आहे. परिणामी, भारताचे नुकसान करण्याचा दोन्ही देशांचा प्लॅन फोल ठरला आहे. रिझर्व्ह बँकेकडून केंद्र सरकारला मिळणाऱ्या लाभांशात सातत्याने वाढ होत आहे. २०१७ मध्ये रिझर्व्ह बँकेने ३०,६५९ कोटी रुपयांचा लाभांश दिला होता. तो २०२५ मध्ये २.६९ लाख कोटी रुपये झाला. याचा अर्थ या लाभांशात गेल्या नऊ वर्षांमध्ये ८.७७ टक्के वाढ झाली आहे. आता पुढील काही वर्षांमध्ये लाभांश ३ ते ३.५ लाख कोटी रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

# उच्चांकी तांदूळ उत्पादन आणि पर्यावरण समस्या

सर्वाधिक तांदळाचे उत्पादन करणारा देश म्हणून आपण नुकतीच जगात नवी ओळख निर्माण केली. मार्च २०२५ अखेरच्या वर्षात जवळजवळ १५ कोटी टन तांदळाचे उत्पादन गाठले. सुधारित वाणांचे संशोधन, आर्थिक सवलतींमुळे यापुढे त्यात वाढच होणार आहे. मात्र वाढत्या तांदूळ उत्पादनाबरोबरच त्याच्याशी निगडित पर्यावरणाच्या समस्या तीव्र स्वरूप धारण करत आहेत. या समस्यांकडे दुर्लक्ष न करता त्यांच्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. या समस्यांचा घेतलेला वेध.





**आर्थिक**
प्रा. नंदकुमार काकिर्डे
राष्ट्रसंचार

भारताने गेल्या दशकात सातत्याने तांदूळ उत्पादनामध्ये उत्तम वाढ नोंदवली आहे. २०१५-१६ मध्ये १०.४ कोटी टन तांदळाचे उत्पादन झाले होते. त्यानंतर त्यात दरवर्षी वाढ झाल्याने २०२२-२३ मध्ये १३.५ कोटी टन तांदळाचे उत्पादन गाठले. २०२४-२५ मध्ये १४.९ कोटी टन उत्पादनाची नोंद होत आहे. आपण प्रथमच चीनपेक्षा जास्त उत्पादन गाठले असून त्यांचे उत्पादन १४.४६ कोटी टनाच्या घरात आहे. पश्चिम बंगाल,उत्तर प्रदेश,पंजाब यांच्याबरोबरच उत्तर पूर्व भागातील म्हणजे छत्तीसगड, तेलंगणा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश ही सर्वाधिक तांदूळ उत्पादनाची राज्ये होत आहेत. तांदळाच्या सुधारित बियाणे, सरकारचे वाढते समर्थन,अनुकूल हवामान परिस्थिती यामुळे उत्पादनामध्ये सातत्याने चांगली वाढ होत आहे. तांदूळ उत्पादनाबरोबरच तांदूळ निर्यातही सर्वाधिक होत आहे. यामध्ये शेतकरी, शास्त्रज्ञ, तांदळाच्या गिरण्या मालक, निर्यातदार अशा विविध घटकांचा मोठा वाटा आहे. खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामामध्ये जवळपास ४.७८ कोटी हेक्टर जमिनीवर भाताचे पीक घेण्यात येत आहे.

जागतिक पातळीवर सर्वाधिक तांदळाचे उत्पादन करत असलो तरी त्यामुळे पर्यावरणाच्या काही गंभीर समस्या वाढत आहेत. भाताचे पीक जास्त पाण्याची गरज असलेले आहे. त्याची जास्त लागवड केल्याने भूजल पातळी कमी होत आहे. उदाहरण द्यायचे झाले तर एक किलो तांदळासाठी ३००० ते ५००० लिटर पाण्याची गरज असते. विशेषतः पंजाब, हरियाणा व उत्तर प्रदेशामध्ये ही समस्या जास्त जाणवत असून कालव्यांच्या अनियमित वापराने पाण्याच्या पातळीत घट होत आहे. तसेच पीक फेरपालट न करता सतत भाताची लागवड केल्याने मातीतील पोषक घटक द्रव्ये कमी होतात. रासायनिक खते, कीटकनाशकांचा जास्त वापर केल्यामुळे माती विषारी होऊन त्याची सुपीकता कमी होते. एवढेच नाही तर रासायनिक खते व कीटकनाशकांचा प्रवाह जलसाठे दूषित करतो, जलचरांना हानी पोहोचते, त्याची जैवविविधता नष्ट होते. हे पाणी पिण्यासाठी किंवा अन्य औद्योगिक वापरासाठी अयोग्य होते. भात शेतीमुळे अनारोग्य वाढवणाऱ्या मिथेनची निर्मिती होत असल्याने तापमानावर व हवामान प्रणालीवर त्याचा विपरीत परिणाम होतो.

भात कापणीनंतर त्याच्या पेंढ्या जाळल्यामुळे गंभीर वायू प्रदूषण व धोके निर्माण होत आहेत. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य व प्रादेशिक हवामानावर परिणाम होताना दिसत आहे. तांदळाच्या एकल शेतीमुळे कृषी जैवविविधता कमी होत असून अनेकदा पाणथळ परिसंस्था नष्ट होत असल्याचे लक्षात आलेले आहे. खराब सिंचन पद्धती किंवा जास्त सिंचनामुळे विशेषता: किनारी व कालव्यांच्या मार्फत केलेल्या संचित प्रदेशांमध्ये जमिनीचे क्षारीकरण वाढत आहे.

पाण्याची समस्या ही गंभीर आर्थिक समस्या बनत आहे. देशातील ताज्या पाण्यापैकी ८० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते. एकूण वापराच्या ६० टक्के पाणी फक्त ऊस आणि तांदूळ या दोन पिकांसाठीच वापरले जाते. या दोन्ही पिकांना किमान आधारभूत किंमतीचा जोरदार, भक्कम पाठिंबा आहे. उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या खते, बी बियाणे, वीज, पाणी या गोष्टींना मोठे आर्थिक अनुदान लाभते. एवढेच नाही तर सरकार हमी भावाने त्यांच्याकडून निश्चित खरेदी करते. केंद्र सरकारने तांदळासह विविध वाणांसाठी आधारभूत किंमतीत चांगली वाढ केली. एकंदरीतच या पिकाला दिला जाणारा पाठिंबा हा नैतिक धोक्याचा व नकारात्मक स्वरूपाचा आहे. त्याला लाभणारे खाजगी प्रोत्साहन हे सामाजिक कल्याणाच्या विरोधात आहे. एक प्रकारे राष्ट्रीय संसाधनाचे चुकीचे वाटप भाताच्या पिकामुळे होत असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते.

शेतकऱ्यांचा विचार करायचा झाला तर त्यांच्या दृष्टिकोनातून भाताचे पीक घेणे किफायतशीर ठरते. या पिकासाठी एका हेक्टर मागे साधारणपणे मिळणारे सात हजार रुपये अनुदान लक्षात घेतले तर अन्य कोणत्याही पिकामध्ये होणाऱ्या आर्थिक लाभापेक्षा भाताची लागवड फायदेशीर आहे. बासमती सारख्या जातीची लागवड करून व त्याची निर्यात करून शेतकऱ्याला एकरी ५० हजार रुपये निव्वळ नफा होत असल्याचे आढळले आहे. त्याच्या ऐवजी बाजरी किंवा अन्य कोणतेही पीक अनुदानासह लक्षात घेतले तर भाताची शेती जास्त लाभदायक ठरते. त्यामुळे देशभरातील छोटा शेतकरी भात पिकालाच प्राधान्य देतो. केंद्र सरकार कडधान्ये, डाळीसारख्या अन्य पिकांना तांदळाच्या तुलनेत जास्त आर्थिक सवलती देत नाही. त्यामुळे अन्य पिके घेण्याकडे लहान शेतकरी वळणार नाही. त्यासाठी संपूर्ण गावालाच अन्य पिके घेण्यासाठी सामूहिक आर्थिक सवलती देण्याची आवश्यकता आहे. छोट्या, मध्यम शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या कमी होतील. कमी पाणी वापरण्यासाठी नियम करून प्रश्न सुटणार नाही त्याऐवजी व्यापक प्रमाणात आर्थिक प्रोत्साहन दिले तरच या समस्येचे गांभीर्य कमी होऊ शकते.

आपल्याला सातत्याने कमी उपलब्ध होत असणाऱ्या जमिनीवर कमी पाण्याचा वापर करून तांदळाचे जास्त उत्पादन करण्याचे आव्हान आहे. यासाठी आपल्याला तांदळाच्या अशा जाती निर्माण केल्या पाहिजेत की कमीत कमी जागेमध्ये जास्तीत जास्त उत्पादन तर होईलच पण त्याचवेळी कमी पाण्यामध्ये हे उत्पादन घेता आले पाहिजे. यदाकदाचित तांदळाच्या अशा नवीन वाणाचे संशोधन झाले तरी ते गोरगरीब शेतकऱ्यांना परवडले पाहिजे ही महत्त्वाची गरज आहे. भारतीय कृषी संशोधन परिषदेने केलेल्या अभ्यासातून असे स्पष्ट झालेले आहे की हवामान प्रतिरोधक आणि शाश्वततेवर पुरेसे लक्ष केंद्रित करण्यासाठी हरितक्रांतीच्या आदर्शातून आपण अजून बाहेर पडलेले नाही. भाताचे पीक जास्त घेतल्यामुळे अन्नसुरक्षेच्या समस्येला आपण खंबीरपणे सामोरे गेलो आहोत.

मोठ्या लोकसंख्येसाठी मुख्य अन्नाची उपलब्धता त्यामुळे निश्चित झाली आहे. सार्वजनिक वितरण प्रभावी झाले असून तांदळाचा बफर स्टॉक वितरणासाठी उपयुक्त ठरतो. भाताच्या शेतीमुळे ग्रामीण भागात रोजगार निर्माण होतो व कृषी जीडीपी मध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. बासमती तांदळाच्या उत्पादनात आपला देश प्रमुख असून त्यामुळे मौल्यवान परकीय चलन मिळाल्याने लहान व छोट्या शेतकऱ्यांना त्याचा चांगला फायदा होतो. या निश्चित जमेच्या बाजू आहेत. भारताने मार्च अखेरच्या आर्थिक वर्षांमध्ये जवळजवळ २० दशलक्ष टन तांदूळ निर्यात केलेली होती त्यामध्ये १४ दशलक्ष टन बासमती होता.एवढ्या मोठ्या प्रमाणावर तांदूळ निर्यात करणे म्हणजे एक प्रकारे भारतातील पाणी निर्यात करण्यासारखे आहे. कारण वर उल्लेख केल्यानुसार एक किलो तांदूळ निर्माण करण्यासाठी ३५०० लिटर पाणी वापरले जाते.

भात पिका बाबतच्या या परिस्थितीमुळे तेलबिया, कडधान्ये, डाळींच्या पिकासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे खाद्यतेल आणि कडधान्ये, डाळींची आयात मार्च २०२५ अखेरच्या वर्षात २३ अब्ज डॉलर्स वर पोहोचलेली आहे. दुसरीकडे भाताच्या लागवडीचे क्षेत्र सतत वाढत आहे. तेल बिया, कडधान्य व विविध डाळींची लागवड अधिक आकर्षक बनवून किमान आधारभूत किंमतीतील वाढ प्रभावी ठरू शकते. तरीसुद्धा भाताच्या लागवडीबरोबरच निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्या या तेवढ्याच गंभीर असल्याने त्यांच्याकडे सर्व राज्यांनी व केंद्र सरकारने एकत्रितपणे सोडवण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजेत.

# जनतेमध्ये भीती निर्माण करणारे शब्द समाजासाठी धोकादायक!

**कायदा**
ॲड. गायत्री कांबळे
राष्ट्रसंचार

समाजातील शांतता आणि सलोखा कायम रहावा यासाठी समाजातील जबाबदार घटकांनी योगदान देणे आवश्यक असते. जनतेला सुरक्षित जीवन जगण्यासाठी सौहार्द वातावरण निर्माण करण्याची तसेच कायदा आणि सुव्यवस्था ठेवण्याची जबाबदारी जशी प्रशासकीय यंत्रणांची असते. तशीच ती जबाबदार नागरिक म्हणून आपलेही सर्वांचे कर्तव्य आहे. त्यामुळे संस्था संघटनेचे नाव देताना किंवा त्यासंबंधी काम करणाऱ्या यंत्रणांना नाव देताना जनतेच्या मनात भीती निर्माण होईल, जनतेला दहशत वाटेल असे शब्द टाळले पाहिजेत, असे निरीक्षण एका प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने नोंदवले आहे.

प्रत्येक नागरिकाला निर्भयपणे आणि स्वतःच्या मनमर्जीप्रमाणे जगण्याचा हक्क आणि अधिकार संविधानाने दिलेला आहे. असे असताना काही लोक जाणीवपूर्वक मनी आणि मसलच्या जोरावर दुर्बल लोकांना धमकावणे, त्यांना दहशतीने भीती दाखवणे तसेच त्यांचे शोषण करतात. मात्र, असे करणे हा गुन्हा आहे. त्याचप्रमाणे काही एजन्सी देखील जनतेच्या मनात भीती निर्माण होईल अशा पद्धतीची नावे वापरतात. ते देखील कायद्याला मान्य नाही. कोणत्याही नागरिकाच्या मूलभूत हक्क आणि अधिकारांचे उल्लंघन कुणालाही करता येत नाही. अशाच एका प्रकरणात सुनावणी करताना पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने खाजगी सुरक्षा एजन्सींकडून "बाउन्सर" हा शब्द वापरल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. भीती आणि दहशतीला प्रोत्साहन देणारे शब्द आणि संकल्पना ज्याला सुसंस्कृत समाजात कोणतेही स्थान नाही, ते वापरू नयेत असे देखील उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

खाजगी सुरक्षा एजन्सी त्यांच्या कामगारांसाठी "बाउन्सर" हा शब्द वापरत असल्याबद्दल चिंता व्यक्त करताना, पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, बाउन्सर हा शब्द वापरण्याचा उद्देश "जनतेच्या मनात भीती, चिंता आणि दहशत निर्माण करणे" आहे, जे कोणत्याही सुसंस्कृत व्यवस्थेत मान्य नाही. खाजगी सुरक्षा एजन्सी चालवणाऱ्या एका व्यक्तीने दाखल केलेल्या अटकपूर्व जामिनाच्या याचिकेवर उच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. त्यावेळी न्यायालयाने असेही निरीक्षण नोंदवले की, "सुरक्षा एजन्सी किंवा सुरक्षा रक्षकांच्या सेवा घेण्याचे मुख्य कारण म्हणजे सुरक्षा आणि सुरक्षित वातावरण निश्चित करणे आहे. परंतु जेव्हा या सेवा देणारे किंवा त्यांचे कर्मचारीच वाईट गोष्टी करतात, स्वतःला घटनाबाह्य अधिकारी मानतात, धमक्या आणि क्रूर शक्तीचा शस्त्र म्हणून वापर करतात, तेव्हा ते समाजासाठी गंभीर चिंतेचे कारण बनते."

सुनावणीदरम्यान, खंडपीठाने या प्रकाराचा 'त्रासदायक ट्रेंड' म्हणून उल्लेख केला. याचबरोबर म्हटले की, "सुरक्षा एजन्सी चालवणारे आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचा एक विशिष्ट वर्ग, साध्या "बाउन्सर" च्या नावाखाली "दहशत निर्माण करणारी आणि धमकावणारी भूमिका" स्वीकारू लागला आहे."

### राज्य सरकार असंवेदनशील

● या प्रकरणाच्या सुनावणी वेळी उच्च न्यायालयाने राज्य सरकारवरही नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने म्हटले आहे की, "राज्याला हे देखील माहिती आहे की सुरक्षा एजन्सी त्यांचा प्रभाव पाडण्यासाठी "बाउन्सर" हा शब्द कसा वापरत आहेत, परंतु राज्य सरकार अविचलित व बेफिकीर आहे आणि म्हणूनच अशा मुद्द्याबद्दल त्यांनी असंवेदनशील राहण्याचा पर्याय निवडला आहे."

### बाउन्सर शब्दाची व्याख्या...

● न्यायालयाने शब्दकोशांमध्ये आढळणाऱ्या "बाउन्सर" या शब्दाची व्याख्या देखील स्पष्ट केली आहे. मेरियम-वेबस्टरच्या मते, जी गोष्ट उसळते त्यास बाउन्सर म्हणतात. तर, ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार, बाउन्सर म्हणजे सार्वजनिक ठिकाणी, विशेषतः बार किंवा नाईट क्लबमधून दंगा करणाऱ्या व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी नियुक्त केलेला व्यक्ती. केंब्रिज शब्दकोशानुसार बाउन्सर म्हणजे अशी व्यक्ती ज्याचे काम बार, पार्टी इत्यादी बाहेर उभे राहणे आणि त्रास देणाऱ्या लोकांना आत येण्यापासून रोखणे किंवा त्यांना बाहेर काढणे हे असते, असे न्यायालयाने म्हटले आहे.

# ओठांचा काळेपणा दूर करण्यासाठी घरगुती उपाय

**बऱ्याचदा, वाईट जीवनशैलीमुळे, ओठांचा रंग काळा होऊ लागतो, जो खूप वाईट दिसतो. आज आम्ही तुम्हाला काही घरगुती उपाय सांगणार आहोत, जे तुमच्या ओठांचा रंग बदलण्यास मदत करू शकतात. हे उपाय अवलंबवल्यावर ओठ नैसर्गिकरित्या गुलाबी होतील.**

**लिंबाचा रस :** लिंबूमध्ये नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म असतात. दररोज रात्री झोपण्यापूर्वी ओठांवर ताजे लिंबाचा रस लावा आणि सकाळी धुवा. यामुळे ओठांचा काळेपणा हळूहळू कमी होतो.

**ग्लिसरीन :** काळ्या ओठांना नैसर्गिकरित्या गुलाबी करण्यासाठी तुम्ही ग्लिसरीन वापरू शकता. ग्लिसरीनचा वापर त्वचेच्या काळजीसाठी बऱ्याच काळापासून केला जात आहे. ते त्वचेला मॉइश्चरायझ करते आणि ती मऊ ठेवते. दररोज रात्री ग्लिसरीन लावल्याने ओठांवरचा काळसर थर हळूहळू हलका होऊ शकतो.

**कोरफड जेल :** काळ्या ओठांना नैसर्गिकरित्या गुलाबी करण्यासाठी तुम्ही कोरफडीचे जेल वापरू शकता. कोरफडीमध्ये असलेले ॲलिसिन त्वचेचा रंग उजळवण्यास मदत करते. दररोज ओठांवर ताजे कोरफडीचे जेल लावा आणि १५-२० मिनिटांनी ते धुवा. हे ओठांना मऊ आणि गुलाबी बनवण्यास मदत करते. यासोबतच, ते ओठांना मॉइश्चरायझ करण्यास देखील मदत करते.

# बोल अंतरीचे...

**जीवनपट**
शशिकांत जाधव
(महात्मा गांधी विद्यालय खानापूर)
राष्ट्रसंचार



याज्ञानगंगेच्या प्रवाहात शिक्षक म्हणून माझी 32 वर्षांपूर्वी सुरुवात झाली.या प्रवासात अनेक चढउतार आले.आपल्या हातून अधिकाधिक विद्यार्थ्यांना घडवण्याचा,उत्तम संस्कार देण्याचा आटोकाट प्रयत्न केला.आज हा प्रवास थांबणार आहे,परंतु ज्या शाळेने मला मान सन्मान प्राप्त करून दिला त्या शाळेचे आजी-माजी विद्यार्थी,मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर सहकारी,ग्रामस्थ,संस्थेचे आजी -माजी पदाधिकारी यांनी दिलेले प्रेम, आशीर्वाद,आपुलकी अखेरपर्यंत विसरू शकत नाही.खऱ्या अर्थाने 'खानापूर'ही माझी कर्मभूमी ठरली. या निमित्ताने माझा जीवनपट उलगडण्याचा मी प्रयत्न करत आहे.

माझा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा या गावी झाला. जन्मभूमीत आजोबा कै.तुकाराम बकाजी गाढवे यांच्या संस्कारात घडलो.आजोबा तालुका मास्तर असल्याने घरातच शिक्षणाचा वारसा होता.हा वारसा मला माझ्या आजोबांकडून प्राप्त झाला. आजोबांना तालुक्यामध्ये आदराचे, मानाचे स्थान होते. आजोळी शिक्षणाला सुरुवात झाली. जीवन शिक्षण विद्यामंदिर खंडाळा या शाळेत सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले.प्राथमिक स्तरावर धुमाळ गुरुजी व काकडे गुरुजी यांचे मार्गदर्शन मिळाले. अनेक स्पर्धा मधून भाग घेत असताना बक्षीस मिळाल्यावर आजोबांना आपल्या नातवाचा अभिमान वाटत असे. बालपणात आजोबांनी केलेले संस्कार आजही मला मार्गदर्शक ठरतात. आजोबांच्या निधनानंतर मामा-मामींनीही चांगला सांभाळ केला. माध्यमिक स्तरावर आठवी व नववी राजेंद्र विद्यालय खंडाळा येथे पूर्ण केले त्यानंतर काही कारणास्तव आजोळ खंडाळा सोडून मुंबईला आई-वडिलांकडे शिक्षणासाठी यावे लागले.

मुंबईला दादर शिवाजी पार्क येथे सेना भवनाच्या पाठीमागे डबेवाल्यांची बिल्डिंग.जेमतेम दोन खोल्यांचे घर. आर्थिक दृष्टिकोनातून स्वप्ननगरी असलेल्या मुंबई शहरात पुढील वाटचाल सुरू झाली.बालविकास विद्यामंदिर, दादर येथे दहावीचे शिक्षण पूर्ण केले.उच्च शिक्षण 'कीर्ती महाविद्यालय दादर' येथे झाले. मराठी विषयास भारतरत्न सचिन तेंडुलकर यांचे वडील रमेश तेंडुलकर शिकवायला होते. त्यांचा तास कधीही बुडवण्याचा विचार मनात आला नाही. त्यांच्यामुळे मराठी विषयाबद्दल आकर्षण अधिक वाढले. येथेच अनेक मित्र मिळाले त्यातील एक मित्र आकाराम दिंडे हा होता. बी.ए.चा निकाल लागण्यास पुरासा वेळ होता. या काळात वडिलांचा व्यवसाय असलेल्या भाजी मार्केटमध्ये जायला लागलो. व्यवसायातील माहिती हळूहळू मिळू लागली. व्यवसायाकडे ओढा वाढत असतानाच अचानक बी.ए.चा निकाल लागला आणि मित्र आकाराम दिंडे मार्केटला आला आणि आपल्याला बी.एड.ला ॲडमिशन घ्यायचे आहे, असे सांगितले आणि आम्ही दोघांनी एकाच वेळी विद्याधिराजा कॉलेज, पनवेल येथे ॲडमिशन घेतले आणि खऱ्या अर्थाने शिक्षक म्हणून प्रवासाची सुरुवात झाली.

शिक्षण पूर्ण केले आणि त्यानंतर नोकरीसाठी प्रयत्न सुरू झाले. त्यावेळचे साताऱ्याचे खासदार व जनता शिक्षण संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष प्रतापराव भोसले यांच्या संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल सिद्धनाथ वाडी, वाई मध्ये नोकरीला सुरुवात झाली. चुलते बाबुराव जाधव व मोठे बंधू सुनील जाधव यांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले. त्यावेळी रात्रीचे इयत्ता इयत्ता दहावीचे जादा तास ही संकल्पना होती.स्थानिक असल्यामुळे संस्था व गावकरी यांचा अधिक विश्वास होता. दोन वर्षाच्या कालखंडात विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिल्यामुळे संस्था पदाधिका-यांच्या मनात विश्वास निर्माण करण्यात यश आले. ही शाळा विनाअनुदानित होती अवघे तीनशे रुपये पगार मिळत होता.त्यातही समाधान मिळत होते तरीही उंच भरारी घ्यावी असे वाटू लागले आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळामध्ये अर्ज केला. माझे मामा शिवराज गाढवे तसेच मोठे बंधू सुनील जाधव यांच्या आशीर्वादाने तसेच तत्कालीन मानद सचिव मामासाहेब पिंपळे, रजिस्ट्रार बाळासाहेब माने यांच्या सहकार्याने संस्थेत प्रवेश झाला. सुरुवातीचे ग्रामीण भागात बालपण नंतर मुंबईसारख्या मायानगरीत पुढील शिक्षण आणि पुन्हा एक जानेवारी १९९६ रोजी खानापूर या ग्रामीण भागातील शाखेत प्रवास सुरू झाला. एक चादर व एक सतरंजीसह माझा जीवन प्रवास सुरू झाला. त्यावेळी आम्ही बॅचलर असणारे शाळेतील सहकारी संतोष पंडित मामा, संजय थोरवे सर व त्यानंतर आलेले आदलिंग सर असा एकत्र आमचा प्रवास सुरू झाला.माझे पहिले मुख्याध्यापक म्हणून कारळे सर.त्यांच्या नेतृत्वाखालील नोकरीतील सेवेचा प्रवास सुरू झाला.खानापूरात ज्यांच्याकडे आदराने पाहिले जायचे असे संस्था सदस्य ऋषितुल्य व्यक्तिमत्व कै.आप्पासाहेब जावळकर व सिंहगड पंचक्रोशीत आदराचे स्थान असणारे डॉ. गोपाळराव मोडक यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असे. सुरुवातीला माझ्याकडे नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग असल्याने विद्यार्थ्यांना शिस्त व संस्कार घडवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले.सहकारी व ग्रामस्थांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले. इयत्ता दहावीचा आपल्या विषयाचा निकाल चांगल्या लागण्यासाठी शिक्षकांमध्ये निकोप स्पर्धा लागे. शनिवार हा दिवस वीस गुणांची परीक्षा घेण्यासाठी विषय शिक्षक जातीने लक्ष देत असत. मी मराठी विषय विद्यार्थ्यांच्या गळी अत्यंत चांगल्या पद्धतीने उतरवू शकलो.

सुरुवातीच्या काळात क्रीडा स्पर्धांची जबाबदारी माझ्याकडे असताना विविध पातळीवर क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना उतरवताना त्यांचा कसून सराव करून घेणे आणि त्यानंतरच स्पर्धेत उतरवणे हा अजेंडा ठेवल्याने अनेक स्पर्धांत विद्यार्थी चमकू लागले. त्यानंतर ज्युनिअर कॉलेजला मराठी विषयाचे शिक्षकांची बदली झाली आणि त्याची जबाबदारी मुख्याध्यापकांनी माझ्यावर टाकली ती आज अखेरपर्यंत तशीच राहीली. माझ्यावर टाकलेली जबाबदारी यशस्वीपणे पूर्ण करणारच याची खात्री असल्याने नाट्य स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन याची आयोजन व नियोजनाची जबाबदारी सातत्याने माझ्यावर पडत होती. तीही यशस्वीपणे पार पाडत गेलो. विद्यार्थ्यांच्या चांगले संस्कार घडावे यासाठी साने गुरुजी कथामाला, विनोबा भावे श्लोक स्पर्धा अशा अनेक स्पर्धात विद्यार्थ्यांना उतरून त्यांच्यावर चांगले संस्कार कसे घडतील याचा प्रयत्न केला.

तत्कालीन संस्था आजीव सदस्य व उपसचिव पी.ई. कुलकर्णी साहेब यांनी किर्लोस्कर फाउंडेशन आयोजित स्वच्छ शाळा व सुंदर शाळा स्पर्धेत खानापूर शाखेचा सहभाग असावा यासाठीची जबाबदारी माझ्यावर सोपवल्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना सलग तेरा वर्षे प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ व दोन वेळा आदर्श शाळा पुरस्कार मिळवून शाळेची पुणे जिल्ह्यात ओळख निर्माण केली. याचे श्रेय आदरणीय कुलकर्णी साहेब, मुख्याध्यापक व माझ्या सहकाऱ्यांना जाते.मी फक्त निमित्त मात्र होतो. याचे फलित म्हणून संस्थेने २०१२ ते २०१५ या कालावधी करता सेवक कल्याण निधीचे संचालक म्हणून बिनविरोध निवड करून संधी दिली. तेथेही माझ्यापरीने जे कल्याण निधी ध्येय व धोरण आहे ते संस्थेतील शिक्षकांपर्यंत पोहोचवून त्यांना लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे महात्मा फुले गुणवत्ता वाढ अभियानात मला संधी मिळाली. तेथेही विविध शाळांची पाहणी करताना एखाद्या शाळेतील चांगली योजना आपल्या शाळेत कशी राबवता येईल याचा प्रयत्न केला. गेले अनेक वर्ष इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेचे नियोजन माझ्याकडे आहे तेही कुठलाही अडथळा न येता यशस्वीपणे पार पाडत राहिलो.

विविध क्षेत्रातील व्यक्तींशी सातत्यपूर्ण संपर्क करत राहून शाळेच्या वैभवात भर कशी पाडता येईल यासाठी सातत्याने प्रयत्न केला. त्यामुळे शाळेला विविध भौतिक वस्तू मिळवून देऊ शकलो. तसेच गेल्या पंधरा ते सोळा वर्षापासून शाळेतील गरजू विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी प्रयत्न केले.यात पंचक्रोशीतील प्रतिष्ठित व्यक्ती व माजी विद्यार्थी यांचे लाख मोलाचे सहकार्य मिळाले, म्हणून हे शक्य झाले. विविध विषयावर असंख्य लेख लिहून समाज जागृती करण्याचा मी प्रयत्न करीत आहे.याचे श्रेय माझी पत्नी डॉ.कीर्ती जाधव हिला जाते.

माझ्या जडणघडणीत तिचा बहुमोल वाटा आहे. मुलगी अपूर्वा ही अमेरिकेत उच्च शिक्षण घेत आहे तर मुलगाही अभ्यासात खूप हुशार आहे, याचे सेवानिवृत्त होत असताना समाधान आहे.

सेवानिवृत्तीच्या निमित्ताने आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेत्तर सहकारी, पत्रकार मित्र, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी गौरव अंक काढण्याचे ठरविले हे माझ्या दृष्टीने अनपेक्षित आहे.संपादक मा.संदीप तापकीर सरांनी अंकाची धुरा यशस्वीपणे उचलली. मी सर्वांच्या ऋणानुबंधातून मुक्त होवू शकत नाही. आतापर्यंत सहवासात आलेल्या सर्वांनीच कायम आपुलकी आणि प्रेम दिले आहे. यापुढेही आपल्याकडून असेच प्रेम कायम मिळत राहो, हीच परमेश्वरचरणी प्रार्थना!

# अभेद्य सुरक्षा, शत्रुची परीक्षा!

**पहेलगाम हल्ल्यानंतर आणीबाणीच्या प्रसंगी भारताने आपल्या सक्षम संरक्षण प्रणालीची चुणूक जगाला दाखवली. चिनी क्षेपणास्त्रे आणि तुर्की ड्रोन्सना भेदून भारताचे आकाश हे सदैव भारताचेच असेल हा संदेश भारताने संपूर्ण जगाला दिला. या मोहिमेत कामी आलेली शस्त्रसज्जता आणि अत्याधुनिक यंत्रणा आता जागतिक चर्चेचा विषय बनल्या आहेत. नेमक्या कोणत्या आहेत या यंत्रणा? त्यांनी आपले वर्चस्व कसे सिध्द केले आहे?**

**वेध**
शंतनु चिंचाळकर
राष्ट्रसंचार

पहेलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार करून २६ जणांची निर्घृण हत्या केल्यानंतर प्रत्युत्तरादाखल भारतीय संरक्षण दलांनी दहशतवादी छावण्यांवर अचूक हल्ले केले. 'ऑपरेशन सिंदूर' मिशनद्वारे भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये असलेल्या केवळ दहशतवादी लॉंच पॅडवरच नव्हे तर पाकिस्तानमध्ये घुसून त्यांचे प्रशिक्षण तळ उध्वस्त केले. या मिशनसाठी भारतीय सैन्याने क्षेपणास्त्रे, ग्लाइड बॉम्ब, लोइटरिंग दारूगोळा आणि इतर अत्याधुनिक शस्त्रे वापरली. प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानने भारतीय लष्करी तळ, धार्मिक स्थळे आणि निर्दोष नागरिकांवर तुर्कस्तानकडून मिळालेल्या ड्रोन तसेच चिनी क्षेपणास्त्रांद्वारे दोन दिवस हल्ले केले. पाकिस्तानने एफ १६ सारख्या अत्याधुनिक विमानांचाही वापर केल्याचे उघड झाले. भारताच्या एकात्मिक हवाई संरक्षण प्रणालीने (एडी) भिंतीसारखी उभी केलेली संरक्षण यंत्रणा पाकिस्तानला भेदता आली नाही. तुर्कीचे ड्रोन असो किंवा इतर काहीही, ते भारताच्या तंत्रज्ञानासमोर अपयशी ठरले हे सिद्ध झाले.

'भारतीय संरक्षणदलांनी पाकिस्तानचे सर्व मनसुबे उधळून लावले असून आमचे सर्व लष्करी तळ, सर्व सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे कार्यरत आहेत. भारताचे हवाई क्षेत्र असलेले आकाश हे सदैव भारताचेच असेल. हा संदेश भारताने या मिशनद्वारे संपूर्ण जगाला दिला आहे', असे एअर ऑपरेशनचे महासंचालक, एयर मार्शल ए. के. भारती यांनी म्हटले आणि आपल्या शस्त्रसज्जतेची, अत्याधुनिक संरक्षण यंत्रणांची जोरदार चर्चा सुरु झाली.

भारतीय हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी, पाकिस्तानने हल्ला करण्यासाठी चिनी बनावटीची पीएल-15 एलआर दृश्य श्रेणीच्या पलीकडे असलेली हवेतून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे तसेच तुर्कीचे निष्क्रीय केलेले मूळचे बायकर यिहा कामिकाझे आणि असिसगार्ड सोंगर ड्रोन, लांब पल्ल्याचे रॉकेट, लॉटर दारूगोळा आणि क्वाडकॉप्टर वापरल्याचे पुरावे दाखवले. त्यापैकी बहुतेक भारताच्या एडी सिस्टीमने पाडले. 'जेव्हा जेव्हा पाकिस्तानी हवाई दलाने आमच्यावर हल्ला केला, तेव्हा ते आमच्या एडी ग्रिडसमोर अपयशी ठरले,' असे लेफ्टनंट जनरल घई म्हणाले.

एका वृत्तानुसार, भारताच्या तिन्ही सशस्त्र दलांना हवा आणि आकाशातील संशयास्पद हालचाली आणि हवाई हल्ले टिपण्यासाठी एक संयुक्त हवाई प्रणाली प्रदान केली आहे. त्याद्वारे रडारचे एडी नेटवर्क आणि शस्त्रास्त्र प्रणालींची विस्तृत श्रेणी ही एअर कमांड अँड कंट्रोल सिस्टीम आणि आकाशतीर सिस्टीममध्ये जोडली गेली आहे. हे नेटवर्क इस्रायलसोबत संयुक्तपणे विकसित केलेल्या लांब पल्ल्याच्या रशियन एस-४०० ट्रायम्फ जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली (380-किमी इंटरसेप्शन रेंज) आणि बराक-८ मध्यम पल्ल्याच्या एसएएम प्रणाली (70-किमी) पासून खांद्यावर चालवता येणाऱ्या इग्ला-एस क्षेपणास्त्रे (6-किमी) आणि स्वदेशी एकात्मिक ड्रोन डिटेक्शन अँड इंटरडिक्शन सिस्टीम (1-2 किलोमीटर) पर्यंत पसरले आहे. स्वदेशी आकाश प्रणाली २५ किलोमीटरच्या रेंजवर शत्रूची विमाने, हेलिकॉप्टर आणि ड्रोन्स रोखण्यास सक्षम आहे. ती या दरम्यान येते. यावरुन भारताच्या मजबूत हवाई सुरक्षेची कल्पना येईल.



भारतीय हवाई दलाने १०,९०० कोटी रुपयांना ऑर्डर केलेल्या आकाश-१ आणि २ प्रणालींच्या १५ स्क्वॉड्रनपैकी बहुतेक भाग त्यांना प्रदान केले आहेत. त्या बदल्यात लष्कराकडे २२,३४० कोटी रुपयांच्या चार आकाश रेजिमेंट आहेत, ज्यांची संख्या पाइपलाइनमध्ये आहे. ३० किलोमीटर अंतरावरील अंतर्मुखी रेंज असलेली नवीन पिढीची आकाश शस्त्र प्रणालीदेखील आता अंतिम चाचण्यांसाठी सज्ज आहे. वरिष्ठ आयएएफ अधिकाऱ्यांनी भारताच्या संरक्षण प्रणालीमध्ये कार्यरत असलेली पेचोरा क्षेपणास्त्रे, ओएसए-एके-एम (दहा किलोमीटर) आणि कमी-स्तरीय एल-70 विमानविरोधी तोफां (3.5 किमी)सारख्या जुन्या एडी प्रणालींनी पाकिस्तानने चीन आणि तुर्कस्तानाकडून आणलेल्या अस्त्रांचा सामना करण्यासाठी दाखवलेल्या कार्यक्षमतेची प्रशंसा केली आहे. त्याचे उदाहरण म्हणजे 8 मे रोजी संपूर्ण पश्चिम आघाडीवर पाकिस्तानने प्रक्षेपित केलेल्या ३०० ते ४०० ड्रोनपैकी 50 ड्रोन एल-70 आणि झेडयू-23 मिमी ट्विन-बॅरल गन आणि अशा इतर शस्त्रांनी नष्ट केले. आणखी वीस ड्रोन विविध उपकरणांनी नष्ट केले गेले, तर उर्वरित सीमेपलीकडे परत गेले.

स्पेक्ट्रमच्या दुसऱ्या टोकाला, 10 मे रोजी प्रगत एडी क्षेपणास्त्र प्रणालीने सिरसावरून पाकिस्तानी हाय-स्पीड क्षेपणास्त्र रोखले. नौदलाची जबरदस्त 'फ्लीट एअर डिफेन्स मेकॅनिझम' उत्तर अरबी समुद्रात प्रत्यक्षात आली नसली तरी मिग-29 के लढाऊ विमाने आणि पूर्वसूचना देणाऱ्या हेलिकॉप्टरच्या तैनातीने सिध्द असलेले आयएनएस विक्रांत युद्धसमूहाच्या उपस्थितीने पाकिस्तानी हवाई दलाला हालचाल करण्यापासून दूर राहण्यास भाग पाडत राहिले.

हवाई हल्ल्यापासून संरक्षणार्थ भारताने एस-४०० क्षेपणास्त्र प्रणालीचे तीन स्क्वॉड्रन तैनात केले आहेत. २०२६ पर्यंत यात आणखी दोन स्क्वॉड्रनची वाढ अपेक्षित आहे. ही यंत्रणा विविध हवाई धोक्यांपासून संरक्षण देत भारताच्या धोरणात्मक हवाई संरक्षणाचा कणा बनली आहे. एस ४०० प्रणाली ही रशियन संक्षेपणास्त्र प्रणाली असून अत्याधुनिक जहाजभेदी, विमानभेदी आणि क्षेपणास्त्रभेदी अशी बहुउपयोगी प्रणाली आहे. ४०० वर्ग किलोमीटर पल्ल्यापर्यंत मारा करण्याची तिची क्षमता आहे. यामध्ये बारा लॉंचर असतात आणि त्यातून एका वेळेस तीन अस्त्र डागली जाऊ शकतात. ही दीर्घ काळ हवेत मारा करण्यास सक्षम आधुनिक प्रणाली आहे.

भारताच्या स्वदेशी हवाई संरक्षण प्रणालीमधील पृथ्वी एअर डिफेन्स (पीएडी) हे वातावरणाबाहेर (एक्सो-एटमॉस्फेरिक) येणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांना रोखण्यासाठी विकसित केलेले अँटी-बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे. त्याची ऑपरेटिंग रेंज तिनशे ते दोन हजार किलोमीटर आहे. त्याची मारक क्षमता ८० किलोमीटर आहे. अॅडव्हान्स्ड एअर डिफेन्स (एएडी) हे एक अँटी-बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे, जे ३० किलोमीटर (19 मैल) उंचीवर एंडो-वातावरणात येणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांना रोखण्यासाठी डिझाइन केले आहे. अॅडव्हान्स्ड एअर डिफेन्स (ए ए डी) हे अँटी-बॅलिस्टिक क्षेपणास्त्र तीस किलोमीटर (19 मैल) उंचीवर एंडो-वातावरणात येणारे बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे रोखण्यासाठी डिझाइन केलेले आहे.

एस-125 पेचोरा ही सोव्हिएत वंशाची जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली आहे. ही प्रणाली बऱ्याच काळापासून भारतीय हवाई दलाच्या हवाई संरक्षणाचा कणा आहे. या प्रणालीने जवळजवळ प्रत्येक आधुनिक युद्धात भाग घेत असाधारण कामगिरी केली आहे. भारतीय हवाई दल पेचोराच्या २५ स्क्वॉड्रन चालवते. आकाश ही संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) ने विकसित केलेली मध्यम पल्ल्याची जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली आहे. ही क्षेपणास्त्र प्रणाली १८ हजार मीटर उंचीवर ४५ किलोमीटर अंतरावर असलेल्या विमानांना लक्ष्य करू शकते. त्यात लढाऊ विमाने, क्रूझ क्षेपणास्त्रे आणि हवेतून जमिनीवर मारा करणारी क्षेपणास्त्रे तसेच बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे यासारख्या हवाई लक्ष्यांना निष्प्रभ करण्याची क्षमता आहे. स्पायडर (सरफेस-टू-एअर पायथॉन आणि डी.ई.आर.बी.वाय.) ही एक इस्रायली लघु आणि मध्यम श्रेणीची मोबाइल हवाई संरक्षण प्रणाली राफेल अँडवान्स डिफेन्स सिस्टीमने इस्रायल एरोस्पेस इंडस्ट्रीज (आय ए आय) च्या मदतीने विकसित केली आहे.

एकीकडे रशिया-युक्रेन आणि इस्राएल-हमास युद्ध चालू असताना काश्मीरमध्ये अनपेक्षितपणे घडलेल्या दुर्दैवी पहेलगाम हल्ल्यानंतर आणीबाणीच्या प्रसंगीदेखील भारताने आपल्या सक्षम संरक्षण प्रणालीची चुणूक जगाला दाखवली. चिनी क्षेपणास्त्रे आणि तुर्की ड्रोन्सना भेदून भारतीय सैन्याच्या तिन्ही दलांनी आणि भारतीय संरक्षण यंत्रणेने पाकिस्तानचे कंबरडे मोडले, शिवाय भारताचे हवाई क्षेत्र असलेले आकाश हे सदैव भारताचेच असेल हा संदेश जगाला दिला आहे.

भारताचा पारंपरिक शत्रू असलेल्या चीन आणि भारतादरम्यान १९६२ मध्ये एक मोठे युद्ध झाले. या व्यतिरिक्त १९६७ आणि १९८७ मध्ये काही ठिकाणी सीमा संघर्ष झाले. आजवर



# डिजिटलीकरणाची भरारी



**देशात आज डिजिटल युग घराघरात पोहोचले आहे. दैनंदिन जीवनात नेटबँकिंग, डिजिटल वॉलेट यासारख्या संकल्पनांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. सरकारने २०१५ मध्ये सुरू केलेल्या 'डिजिटल इंडिया' या मोहिमेने मोबाईल बँकिंग, डिजिटल पेमेंट, ई-कॉमर्ससारख्या सेवांचा वापर भारतात सूकर केला आहे. सरकारी कामकाज 'नेट'वरून वेगात होऊ लागले असल्याने विविध सरकारी योजनांचा लाभ घेणेही शक्य होत आहे.**

**तंत्रवेध**
डॉ. दीपक शिकारपूर
राष्ट्रसंचार

काही दिवसापूर्वी एका जपानी पाहुण्याला पुण्यात फिरवत होतो . अनेक ठिकाणे झाल्यावर एका पेरूवाल्याकडे पेरू घ्यायला गेलो. तिथे क्यूआर कोड बघून जपानी पाहुणा थक्क झाला. जगामध्ये असे कुठेही नाही असं तो म्हणाला. अगदी विकसित अमेरिका, जपानमध्येही डिजिटल योजना तळातल्या व्यक्तीपर्यंत पोचलेल्या नाहीत. आपल्या देशात आज डिजिटल युग घराघरात पोचलेले आढळते. प्रथमतः कॉंप्युटरमुळे आणि गेल्या पाच-दहा वर्षांमध्ये स्मार्टफोनमुळे बहुतेकांची नव्या डिजिटल सुविधांशी तोंडओळख नक्कीच झाली आहे. नेटबँकिंग, डिजिटल वॉलेट यासारख्या संकल्पनांचा वापर दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात दिसतो आहे.

डिजिटल इंडिया ही भारत सरकारने २०१५ मध्ये सुरु केलेली एक महत्त्वाकांक्षी मोहीम आहे. या मोहिमेचे उद्दिष्ट भारताला एक डिजिटल अर्थव्यवस्था बनवणे, शासकीय सेवांचे डिजिटलीकरण करणे आणि नागरिकांना डिजिटल साक्षर बनवणे हे आहे. भारतासारखा खंडप्राय, विविधतेने नटलेला देश कधीच डिजिटल होणार नाही असे अनेकांचे मत होते. पण या मोहिमेने अफाट यश मिळवले. मोबाईल बँकिंग, डिजिटल पेमेंट, ई-कॉमर्ससारख्या सेवांचा वापर भारतात झपाट्याने वाढला आहे. सरकारी कामकाज 'नेट'वरून वेगात होऊ लागले असल्याने विविध सरकारी योजनांचा लाभ घेणेही शक्य होत आहे. सरकारी कारभाराचा 'इन-लाइन' पासून 'ऑन-लाइन' पर्यंतचा हा प्रवास बऱ्यापैकी वेगाने झाला. डिजिटल इंडिया मोहिमेमुळे भारतात स्टार्टअप्सची संख्या आणि या क्षेत्रात गुंतवणूक, रोजगारनिर्मिती वाढली आहे. प्रथितयश ई कॉमर्स कंपन्यांच्या मते तर छोट्या शहरांमध्ये शहरांपेक्षाही ज़ास्त प्रतिसाद मिळत आहे .

सार्वजनिक सेवांचे वितरण सुधारण्यासाठी आणि ई-गव्हर्मेंटच्या युगाची सुरुवात करण्यासाठी विविध राज्य सरकारे आणि केंद्रीय मंत्रालयांनी अनेक ई-गव्हर्नन्स उपक्रम हाती घेतले आहेत. भारतातील ई-गव्हर्नन्स हे सरकारी विभागांच्या संगणकीकरणापासून नागरिक केंद्रितता, सेवा अभिमुखता आणि पारदर्शकता यासारखे शासनाचे बारीकसारीक मुद्दे अंतर्भूत करणाऱ्या उपक्रमांमध्ये सातत्याने विकसित झाले आहे. नोटबंदीचा निर्णय जाहीर झाल्यानंतर अनेक 'पेमेंट ॲप्स'चे पेव फुटले आणि बऱ्याचजणांनी ती स्वतःच्या फोनमध्ये उतरवून घेऊन वापरायला सुरूवातही केली. 'भीम' हे भारत सरकारद्वारे विकसित केलेले एक मोबाईल पेमेंट ॲप आहे.

या ॲपच्या माध्यमातून आपण आपल्या बँक खात्यातून पैसे त्वरित आणि सुरक्षितपणे पाठवू शकता आणि प्राप्त करू शकतो. हे ॲप वापरण्यासाठी आपल्याला फक्त आपले बँक खाते लिंक करणे आवश्यक आहे. हे ॲप विविध भारतीय भाषांमध्ये उपलब्ध असल्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला याचा उपयोग करणे सोपे होते. या ॲपचा वापर करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. देशभरातील लाखो व्यापाऱ्यांकडून ते स्वीकारले जाते.

रेल्वे ही अनेकांची जीवनदायिनी आहे आपल्याला बऱ्याचदा रेल्वेने बाहेरगावी जायचे असते. मात्र, वेळेवर तिकीट मिळत नाही. अशा स्थितीत आता रेल्वे (आयआरसीटीसी) ने नागरिकांसाठी 'रेल कनेक्ट' ॲप सादर केले आहे. सर्वाधिक वर्दळीच्या वेळी किंवा आपत्कालीन प्रसंगी तिकीट काढण्यासाठी प्रवाशांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्यांवर तोडगा म्हणून आयआरसीटीसीने हे ॲप प्रवाशांना उपलब्ध करून दिले आहे. या ॲपद्वारे प्रवासी ऑनलाईन बुकिंग आणि ऑनलाईन पेमेंटसुद्धा करु शकतात. आत्तापर्यंत १३ कोटीहून अधिक लोकांनी हे ॲप डाउनलोड केले असून ४० कोटींहून अधिक तिकिटांचे बुकिंग हे ॲप वापरून झाले आहे.



पासपोर्ट, रेशनकार्ड, वाहन परवाना असे आपली ओळख पटवायचे अनेक मार्ग विसाव्या शतकात होते. २००९ मध्ये आपल्या देशात आधार कार्ड हे एक नवीन ओळखपत्र सादर झाले. हे एक महत्त्वपूर्ण ओळखपत्र आहे, जे सूचित करते की तुम्ही भारतीय नागरिक आहात. आधार कार्ड हे भारतातील पहिले विश्वासपात्र ओळखपत्र आहे. आधार कार्ड मिळवण्यासाठी नागरिकांनी ओळख पडताळण्यासाठीची कागदपत्रे (उदा राहत्या पत्त्याचा पुरावा- मतदार आयडी, चालक परवाना, वीज बिल) तसेच बायोमेट्रिक तपशील (जसे बोटांचे ठसे आणि डोळ्यांचे ठसे) सादर करणे आवश्यक असते. त्यानंतर व्यक्तीला एक ओळख क्रमांक दिला जातो, जो तो भारतीय नागरिक असल्याची पुष्टी करतो आणि त्याची सर्व माहिती एका अद्वितीय भारतीय डेटाबेसमध्ये रेकॉर्ड केली जाते. प्रत्यक्ष कार्ड जवळ बाळगायचे नसल्यास 'एम आधार' ॲपचा वापर करता येतो. हे ॲप तुम्ही फोनमध्ये सहज डाउनलोड करू शकता व याचा कुठेही वापर करणे शक्य आहे. ओळखपत्राचा पुरावा दाखवायचा असतानाही एम आधार उपयोगी येईल.

परदेशी प्रवास करायचा असेल तर पासपोर्ट ही अत्यावश्यक गोष्ट ठरते. पहिल्यांदाच परदेशात जाण्याची तयारीच मुळी पासपोर्टपासून सुरू होते; पण त्याखेरीजही पासपोर्ट हा एखाद्या व्यक्तीसाठी महत्त्वपूर्ण पुरावा ठरू शकतो. एके काळी पासपोर्ट काढणे हे परदेशात जाण्याइतकेच कठीण आणि कटकटीचे काम होते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये ही प्रक्रिया अतिशय सुटसुटीत आणि जलद बनली आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाचा अवलंब करत पासपोर्ट विभागाने पासपोर्ट मिळवण्याची प्रक्रिया ऑनलाइन केली आहे. त्यामुळे अर्ज घेण्यापासून कागदपत्रांच्या छाननीपर्यंत आणि पोलीस ठाण्यांचे खेटे घालण्यापासून पासपोर्ट येण्याची प्रतीक्षा करेपर्यंतच्या अनेक अडचणींतून नागरिकांची सुटका झाली आहे. याचाच पुढचा भाग म्हणून आता स्मार्टफोनवरून पासपोर्ट मिळवणे सोपे झाले आहे. भारतीय नागरिकांना जलद, सहज आणि पारदर्शकपणे पासपोर्ट मिळवता यावा, यासाठी केंद्र सरकारने टाटा कन्सल्टन्सीच्या सहकार्यातून 'पासपोर्ट सेवा' हे ॲप सुरू केले आहे.

'एमपासपोर्ट सेवा' नावाचे हे ॲप पासपोर्टसाठी अर्ज भरणे, नजीकचे पासपोर्ट सेवा केंद्र शोधणे, पासपोर्ट अर्जाची सद्यस्थिती जाणून घेणे, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे आणि शुल्काची माहिती पुरवणे अशा अनेक गोष्टींसाठी साहाय्य करते. एम पासपोर्ट पोलिस या ॲपद्वारे नागरीकांना अत्यंत सहज आणि सोप्या पद्धतीने मोबाईल ॲप च्या माध्यमातून पोलिस व्हेरीफिकेशन प्रोसेस पूर्ण करता येत आहे. एम पासपोर्ट पोलिस ॲप सुरु करण्यात आल्यानंतर पासपोर्टची पोलिस व्हेरीफिकेशनचा कालावधी १५ ऐवजी फक्त पाच दिवस इतका झाला आहे.





दरम्यान, आयुष्मान भारत डिजिटल मिशनअंतर्गत ६.७ कोटी आरोग्य खाते क्रमांक जारी करण्यात आले आहेत. 'डिजिटल इंडिया' मोहिमेने पायाभूत सुविधांच्या विकासावर, डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यावर, सरकारी सेवा ऑनलाइन उपलब्ध करण्यावर आणि नागरिकांचे डिजिटल सक्षमीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल दरी कमी होण्यास मदत झाली असून नागरिकांच्या जीवनात सुधारणा झाली आहे.

# कार्यक्षम राज्यकर्त्या : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



**अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला. त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले.**

**अभिवादन**
श्याम ठाणेदार
राष्ट्रसंचार


पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती. ३०० वर्षापूर्वी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला. अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला.

खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला.

अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही... पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले.

ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले. सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य.

अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले. बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. **विनम्र अभिवादन !**





माहूर (ता.पुरंदर) जलाशयातील पाण्याचे जलपूजन करताना हेमंतकुमार माहूरकर, शरद जगताप व शेतकरी उपस्थित होते.

# माहूरची जीवनवाहिनी काठोकाठ

## जलपूजन करून शेतकऱ्यांकडून आनंदोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** दरवर्षी जुलै महिन्याच्या सुरुवातीला पूर्ण क्षमतेने भरणारा माहूर (ता. पुरंदर) ल .पा.प्रकल्प यंदा उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असतानाच पूर्ण क्षमतेने भरला असून, माहूरजाई पाणी वापर संस्थेच्या वतीने लाभार्थी शेतकऱ्यांनी गावचे इनामदार हेमंतकुमार माहूरकर यांच्या हस्ते जलपूजन करून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शरद जगताप, उपसरपंच मेघा जगताप, पोलिस पाटील आरती जगताप मान्यवर म्हणून उपस्थित होते.

पुरंदर किल्ल्यावरून वाहत येणाऱ्या केदार गंगा नदीवर १९७२ साली माहूर जलाशयाची निर्मिती केली असून, चालू पर्जन्यमान वर्षात दोन वेळा पुर्ण क्षमतेने भरण्याचा मान माहूर जलाशयाने पटकावला आहे. गेल्यावर्षी पाऊस काळ कमी असताना देखील माहूर जलाशय पुर्ण क्षमतेने भरला होता. जलाशय व परिसराचे नैसर्गिक सौंदर्य पहाण्यासारखे असून, सांडव्यातून वाहणारा पाण्याचा धबधबा पर्यटकांचे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरेल जलाशयात नौकाविहार, वॉटर पार्क, जलतरण तलाव आधी गोष्टी साकारणे सहज शक्य असल्याचे मत हेमंतकुमार माहूरकर यांनी व्यक्त करून या परिसराचा पर्यटन विकास होण्यासाठी शासनाने मदत करण्याची मागणी केली आहे.

> माहूर जलाशयातून उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करण्याच्या उद्देशाने माहुरजाई पाणी वापर संस्था काम करत असून तुषार व ठिबक सिंचनाचा अवलंब करून एक हजार एकर शेत शिवाराला बारमाही पाण्याची हमी देणारा हा प्रकल्प आहे. या परिसराचा पर्यटन विकास झाल्यास परिसरातील अनेक व्यवसायाला चालना मिळणार आहे. रोजगाराची नवीन संधी देखील उपलब्ध होणार आहे." **— शरद जगताप**

जलाशयातून वहानाऱ्या पाण्यामधून येत्या आठ दिवसात संगम जलाशय (वीर नाला) भरण्यास मदत होणार आहे. जलाशयातील पाण्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटला असल्याचे माजी उपसरपंच हनुमंत माहुरकर यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे सचिव राम जगताप, सत्यवान गोळे , हनुमंत माहुरकर , शंकर पवार,शिवाजी जगताप, नामदेव ताकवले, संजय फडतरे, प्रा.रवींद्र जगताप ,महादेव जगताप, बाळासाहेब जगताप, अमोल गोळे व लाभार्थी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे ऊस लागवड धोरण जाहीर

**पारगाव :** पारगावतर्फे अवसरी बुद्रुक, (ता.आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे लागवड हंगाम २०२५-२६ साठी ऊस लागवडीचे धोरण जाहिर झाले असून त्याची अंमलबजावणी दि. १ जून २०२५ पासून करण्यात येणार असून कारखान्यामार्फत "दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील ऊस उत्पादकता वाढ लक्ष २०२०" ही महत्वाकांक्षी ऊस विकास योजना राबविण्यात येत असलेची माहिती कारखान्याचे अध्यक्ष भगवानराव बेंडे यांनी दिली.



अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की, दि. १ जून २०२५ ते ३० ऑक्टोबर २०२५ पर्यंतच्या कालावधीमध्ये को.एम.०२६५ तर दि. १ जून २०२५ ते ३० एप्रिल २०२६ पर्यंतच्या कालावधीमध्ये को.८६०३२ ऊस लागवडीस व नोंदीस परवानगी देण्यात आली आहे. दि. १ ऑगस्ट २०२५ ते ३० एप्रिल २०२६ अखेर पर्यंतच्या कालावधीमध्ये व्हीएसआय ०८००५ या ऊस लागवडीस परवानगी देण्यात आली आहे. दि. १ सप्टेंबर २०२५ ते ३० एप्रिल २०२६ अखेर पर्यंतच्या कालावधीमध्ये एम.एस. १०००१, को. ९०५७, या ऊस लागवडीस परवानगी देण्यात आली आहे. को.व्हीएसआय १८१२१, फुले ऊस १५०१२, फुले ऊस १५००६, फुले ऊस १३००७, को.एम. ११०८२ इ. शिफारशीत ऊस लागवडीस दि. १ जून २०२५ ते दि. ३० एप्रिल २०२६ पर्यंत परवानगी देण्यात आली आहे.

## अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त वैदवाडी येथे कार्यक्रम

**लोणी-धामणी :** जारकरवाडी (ता.आंबेगाव) येथील वैदवाडी येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त वैदवाडी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अहिल्याबाई होळकर सार्वजनिक उत्सव समितीनी दिली आहे. शनिवारी (दि. ३१) रोजी सदर कार्यक्रम पार पडणार असून यामध्ये रक्तदान शिबिर, बाळशिराम महाराज मिंडे यांचे व्याख्यान, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, पहलगाम येथे मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना आदरांजली, अन्न प्रसादाने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे. पंचक्रोशीतील नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन उत्सव समितीने केले आहे.

## शासकीय मानधन रखडल्याने वयोवृद्धांचे हाल

**लोणी-धामणी :** महाराष्ट्र शासनाकडून समाजातील कलावंत मानधन, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, दिव्यांग-विधवा निराधार योजना अशा विविध घटकांना शासनकडून मानधन देण्यात येते. परंतू गेले काही महिने हे मानधन न मिळाल्यामुळे यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या विविध घटकातील लाभधारकांना उदरनिर्वाह करता येणे अशक्य झाले आहे.व आरोग्य ही धोक्यात आले आहे. अधिकाऱ्यांकडून केवायसी करून घ्या, असे परत परत सांगितले जात आहे.परंतु बऱ्याच गरजूंना केवायसी करून ही पैसे मिळाले नाहीत.विविध स्तरतील हे घटक असल्यामुळे असंघटित आहे. त्यांची कुठलीही संघटना नसल्यामुळे शासन दरबारी आवाज उठवायला कोणीही वाली नाही. त्यात दिवसेंदिवस महागाई वाढत चालली आहे. राज्य शासनाच्या न्याय आणि सांस्कृतिक विभागाने त्याची गांभीर्याने दखल घ्यावी व शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याप्रमाणे मानधनाला जोडून द्यावा. दरवर्षी या प्रश्नासाठी वारंवार मागणी करण्याची गरज राहणार नाही.

## मालेगाव येथील मूकबधिर व्यक्ती जेजुरी येथून बेपत्ता

**जेजुरी :** खंडोबा देवाच्या दर्शनासाठी दिनांक ३० जेजुरी येथे आलेले मुक बधिर असलेले राजेंद्र सर्जेराव जाधव वय ४७ रा मालेगाव ता येवला जि बीड हे जेजुरी येथून हरवले आहेत. याबाबत जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की सर्जेराव भिवा जाधव हे आपल्या परिवारासह दि २६ रोजी जेजुरी गडावर देवदर्शनासाठी आले होते. त्यांचा मुलगा राजेंद्र जाधव हे मतिमंद असून ते गर्दीतून हरवले आहेत. राजेंद्र जाधव हे मुक बधिर असून रंगाने गोरा,मजबूत बांधा, उंची ५ फूट ५ इंच,अंगात पंधरा शर्ट काळी पॅन्ट असे वर्णन असून कोणास माहिती असल्यास जेजुरी पोलीस स्टेशन येथे संपर्क साधावा.



## मुसळधार पावसामुळे पिकांचे अतोनात नुकसान

**मंचर :** अवकाळी ऐन उन्हाळ्यात आलेल्या पावसामुळे आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम व पूर्व भागात मुसळधार पावसामुळे आंबा जांभूळ केळी मका बाजरी भुईमूग व पालेभाज्या वर्गीय पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे प्रत्येक गावातील गाव कामगार तलाठी आपापल्या सजातील नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करतील अशी माहिती आंबेगाव तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार सचिन वाघ यांनी दिली. मागील पंधरा दिवसापासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे अनेक ठिकाणी बांध फुटले आहेत, रस्ते वाहून गेले आहेत तर वीज पडल्याने कांदा बराखी जळून गेली आहे. पालेभाज्या वर्गीय पिके कोबी, फ्लावर, कोथिंबीर, मेथी, शापू सह अनेक पालेभाज्या शेतात पाणी साचल्याने काढता येत नसल्याने सडू लागले आहेत.

आंबेगाव तालुक्यात पूर्व भागात पाणी उपलब्ध असल्याने तालुक्यातील सुमारे ३ हजार ७५० एकर क्षेत्रावर उन्हाळी बाजरी पिकाची पेरणी करण्यात आली होती परंतू अवकाळी पावसाने उन्हाळ्यात हमखास उत्पन्न देणारे बाजरीचे पीक भुईसपाट झाले आहे बाजरीच्या कणसांना चौरे ( कोंब) फुटले आहेत तर जनावरांचा वाळलेल्या चारा वैरण पाण्यात भिजत आहे या वैरणीवर कुज व बुरशी रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे दुभत्या व भाकड जनावरांना हिवाळ्यात व उन्हाळ्यात वाळलेल्या चाऱ्याची मोठी टंचाई यंदा भासणार असल्याचे शेतकरी सांगत आहेत.त्याचप्रमाणे सुमारे दोन हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे अतोनात नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

## अवकाळीमुळे शेतकऱ्यांचे हिराड्याचे उत्पन्न वाया



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** आदिवासी पश्चिम भागातील शेतकऱ्यांचे नागदि उत्पादन असलेल्या हिरडा पिकांचे नुकत्याच झालेल्या प्रचंड पावसाने मोठे नुकसान झाले असल्याने येथील शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे तरी या पिकाचे पंचनामे करून नुकसाना भरपाई मिळावी अशी मागणी येथील आदिवासी शेतकऱ्यांनी केले आहे.

खेड, जुन्नर व आंबेगाव तालुक्याचे पश्चिम आदिवासी भागातील शेतकऱ्यांचे बाळ हिरडा हे महत्वाचे उत्पादन असून मे महिना सुरु असल्याने अनेक शेतकऱ्यांनी हिरडा वाळवण्यासाठी मैदानात वाळविण्यासाठी ठेवला होता. परंतू, गेली अनेक दिवस सुरु असलेल्या वळवाच्या प्रचंड पावसाने तसेच हा हिरडा ठेवण्यासाठी आदिवासी शेतकऱ्यांकडे व्यवस्थित जागा उपलब्ध नसल्याने वाळविण्यासाठी ठेवलेल्या हिराड्यापैकी मोठ्या प्रमाणावर हिरडा ओला होऊन खराब झाला आहे. त्यातच ढगाळ वातावरणामुळे हा हिराडा आणखीची खराब झाला असून यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झाले आहे. दरम्यान या खराब झालेल्या हिरड्याचे तहसीलदार व वन खात्याचा अधिकाऱ्यांकडून त्वरित पंचांनामे करून आदिवासी शेतकऱ्यांना शासनाने मदत करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

### शेतकरी आर्थिक संकटात ?

- आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील डोनी, तिरपाड, आहूपे, पांचाळे, पोखरी, जांभोरी, अडीवरे, भीमाशंकर व पाटण खोऱ्यातील विविध भागात हिराड्याचे मोठ्या प्रमानावर गोळा केला जाते. हिरडा हा येथील आदिवासी शेतकऱ्यांचे महत्वाचे उत्पादन आहे. परंतू हेच उत्पादन खराब झाल्याने आदिवासी शेतकरी आर्थिक संकटात सापडण्याची मोठी शक्यता निर्माण झाली आहे.

## येणेरे परिसरामध्ये पावसाने आंब्याचे मोठे नुकसान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यातील पश्चिम भागातील येणेरे परिसरातील अनेक आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे वादळी पावसाने मोठे नुकसान झाले असून, या नुकसानीची पाहणी जुन्नरचे तहसीलदार सुनील शेळके व कृषी अधिकारी गणेश भोसले यांनी केली. कामगार तलाठी व कृषी सहाय्यकांना झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश त्यांनी दिले.

येणेरे परिसरामध्ये आंब्याच्या बागा अधिक प्रमाणात असून, गेले पंधरा दिवस सतत पडत असणाऱ्या पावसामुळे या पिकावर मोठा परिणाम झाला. येणेरे परिसरातील शिवनेरी हापूस आंब्याला मोठी मागणी असते. परंतु पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच या भागामध्ये अनेक शेतकऱ्यांचे कांदे शेतामध्ये झाकून ठेवलेले होते, परंतु जास्तीच्या पावसाने अनेक शेतकऱ्यांचे कांदे भिजून गेल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे देखील नुकसान झाले आहे. जुन्नरचे तहसीलदार सुनील शेळके व कृषी अधिकारी गणेश भोसले यांनी येणेरे परिसरामध्ये शेतकऱ्यांच्या आंबा पिकाचे झालेल्या नुकसानीचे तसेच पावसाने भिजलेल्या कांदा पिकाची ही पाहणी केली.

स्थानिक शेतकरी व येणेरे गावचे सरपंच अमोल भुजबळ, काले गावचे सरपंच कुलदीप नायकोडी,काटेडे गावचे सरपंच चंद्रशेखर चिलप, विठ्ठलवाडीचे उपसरपंच हनुमान घोगरे, सुशांत ढोले, संदीप ढोले यांनी परिसरामध्ये झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीची माहिती तहसीलदार सुनील शेळके यांना दिली. दरम्यान शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईचे पंचनामे करण्यासाठी गाव स्तरावर कामगार तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक व सरपंच यांची संयुक्त समितीमार्फत पंचनामे करून ते नोटीस बोर्डवर सुद्धा प्रसिद्ध करावी. तसेच एकही शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहू नये असे आदेश तहसीलदार सुनील शेळके यांनी दिले आहेत. ज्या शेतकऱ्यांनी पिकाचा विमा काढला आहे, त्या शेतकऱ्यांच्या पिकाचे पंचनामे तत्काळ करण्यात यावेत, अन्यथा संबंधित विमा कंपन्यांना कारवाईला सामोरे जावे लागेल असे निर्देश तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांनी दिले.



पावसामुळे येणारे परिसरामध्ये आंबा पिकाचे मोठे नुकसान झाल्याने तहसीलदार सुनील शेळके व कृषी अधिकारी गणेश भोसले यांनी केली पाहणी. (छाया - सुरेश वाणी.)

## लक्ष्मी रस्ता हा ५ जूनपासून एकेरी वाहतुकीसाठी बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** मंचर शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी नगरपंचायतीने लक्ष्मी रस्ता हा ५ जून पासून एकेरी वाहतुकीसाठी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तशा माहितीचा फलक रस्त्यावर लावून नागरिकांना याची माहिती देण्यात आली होती. मात्र नगरपंचायतीचा मनमानी कारभार असल्याचा आरोप करत माजी सरपंच दत्ता गांजाळे यांनी माहितीच्या फलकाला काळे फासले आहे.

मंचर शहराची वाढती लोकसंख्या तसेच वाहनांची संख्या वाढल्याने



वाहतूक कोंडीची समस्या उग्र झाली आहे.शहरातील बहुतेक रस्त्यावर नेहमीच वाहतूक कोंडी होते. यामुळे वाहन चालक व नागरिक अक्षरशा त्रस्त झाले आहे.शहरातील रस्ते अरुंद आहेत मात्र असे असतानाही वाहने रस्त्याच्या लगत उभी केली जातात. त्यामुळे वाहतूक कोंडीत अधिकची भर पडते. शिवाय मोठी वाहने या रस्त्याने गेली की वाहतूक कोंडी ठरलेली असते. व्यवसायिकांचा माल घेऊन आलेली अवजड वाहने अनेक वेळ जाग्यावर उभी असतात. लक्ष्मी रस्ता हा सर्वाधिक गजबजलेला रस्ता आहे. या रस्त्यावर व्यवसाय वाढीस लागले आहेत. पुणे नाशिक महामार्ग तसेच एसटी बस स्थानकातून शहराच्या मध्यवर्ती भागात जाणारा हा रस्ता असल्याने या रस्त्यावर नेहमीच वर्दळ असते. परिणामी वारंवार वाहतूक कोंडी होते. शिवाय दुचाकी चालक रस्त्यालगतच वाहने उभी करतात त्यांना कोणीही अटकाव करत नाही. छोटी मोठी दुकाने हातगाड्या अनेक वेळा रस्त्यालगत थाटल्या जातात त्यामुळे ही वाहतूक कोंडीत भर पडते. मंचर पोलिसांनी हा रस्ता एकेरी करावा अशी सूचना मंचर नगरपंचायतीला केली होती. त्यानुसार 5 जून पासून सदरचा रस्ता एका बाजूने बंद करण्याचा निर्णय नगरपंचायत प्रशासनाने घेतला आहे. म्हणजेच या रस्त्यावरून एकेरी वाहतूक सुरू होणार आहे.

> नगरपंचायतीने निर्णय घेताना सर्व व्यापारी, गाळाधारक, जागा मालक यांना विश्वासात घेणे गरजेचे होते. एकेरी वाहतूक करायचीच होती तर ती फक्त चारचाकी वाहने जड वाहनांसाठी हवी होती. यामधून दुचाकी वाहने वगळणे गरजेचे होते. फक्त मनमानी कारभार व कोणाच्या तरी सांगण्यावरून एकेरी वाहतूक करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. बैठक घेऊन निर्णय घेणे गरजेचे होते. कारण व्यापारी बांधव आधीच आर्थिक मंदीमुळे अडचणीत आहेत. त्यात अजून भर नको दुचाकी वाहने व रुग्णवाहिका यांना वगळण्यात यावे." **— दत्ता गांजाळे, माजी सरपंच मंचर**

> लक्ष्मी रस्त्यावर एकेरी वाहतूक करावी अशी मागणी नागरिकांनी वेळोवेळी केली होती. तशी निवेदने सुद्धा मंचर नगरपंचायतीला देण्यात आली होती. त्याची दखल घेऊन लक्ष्मी रस्त्यावर एकेरी वाहतूक करण्याचा निर्णय घेतला आहे.मंचर पोलीस स्टेशनने सुद्धा हा रस्ता एकेरी वाहतुकीसाठी सुरू ठेवावा अशी सूचना केली होती.सदरच्या रस्त्यावर एकेरी वाहतूक करण्याचा निर्णय हा मंचर पोलीस स्टेशन व मंचर नगरपंचायत या दोघांनी घेतला आहे. एकेरी वाहतुकीमुळे वाहतूक कोंडीतून काहीशी सुटका होणार आहे." **— गोविंद जाधव, (मुख्याधिकारी मंचर नगरपंचायत)**



युवा सुराज्य प्रतिष्ठान आणि असीम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोथरूड मधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात 'ऑपरेशन सिंदूर - नव्या भारताचा सामर्थ्याविष्कार' या प्रकट मुलाखत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर यांनी लेफ्टनंट जनरल विनायक पाटणकर (नि.) (PVSM, UYSM, VSM), ले. जनरल एस. एस. हसबनिस(नि.) (PVSM, VSM, ADC), एअर मार्शल एस. एस. सोमण(नि.) (PVSM AVSM VM) यांच्याशी संवाद साधला. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते; यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती.

# सरकारच्या पाठिंब्यामुळेच 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी

## निवृत्त लष्कर अधिकाऱ्यांचे मत: प्रत्येक भारतीयाने सायबर हल्ल्याप्रति दक्ष रहावे!

**पुणे:** पहगाम हल्ल्यानंतर संपूर्ण देशभरातून संतापाची लाट होती. मात्र, त्यानंतर वरिष्ठ पातळीवरुन हलचाली सुरु होत्या, त्यानुसार काहीतरी मोठं घडणार असा प्रत्येकालाच विश्वास वाटत होता. त्यानंतर जे घडलं , ते सर्व जगाने पाहिले. भारत सरकारच्या खंबीर पाठिंब्यामुळेच हे शक्य झाले, अशी भावना माजी लेफ्टनंट जनरल विनायक पाटणकर, एस. एस. हसबनीस आणि एअर मार्शल एस. एस. सोमण यांनी व्यक्त केले.

> **देशातला प्रत्येक नागरिक हा एक देखील सैनिक आहे. त्यांनी शत्रूचा प्रतिकार करण्यासाठी नेहमीच सज्ज असलं पाहिजे. युद्ध हे केवळ सीमेवर लढलं जातं असं नाही; तर अंतर्गत ही लढलं पाहिजे. सायबर हल्ला हे आज आपल्यासमोरचं एक संकट आहे. त्यामुळे त्याविरोधात ही लढण्यासाठी प्रत्येक भारतीयाने सज्ज असलं पाहिजे,**
> **-विनायक पाटणकर,** सेवानिवृत्त लेफ्टनंट जनरल

युवा सुराज्य प्रतिष्ठान आणि असीम फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोथरूड मधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात 'ऑपरेशन सिंदूर - नव्या भारताचा सामर्थ्याविष्कार' या प्रकट मुलाखत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर यांनी लेफ्टनंट जनरल विनायक पाटणकर (नि.) (PVSM, UYSM, VSM), ले. जनरल एस. एस. हसबनिस(नि.) (PVSM, VSM, ADC), एअर मार्शल एस. एस. सोमण(नि.) (PVSM AVSM VM) यांच्याशी संवाद साधला. आजचा हा संवाद ऑपरेशन सिंदूरचे विविध पैलू उलगडणारा आणि भारताच्या सामर्थ्याची ओळख करून देणारा होता. या कार्यक्रमात सहभागी होऊन मान्यवरांचे विचार ग्रहण केले. यावेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील हे प्रमुख उपस्थित होते.

### चंद्रकांतदादांची आवर्जुन हजेरी...!



● राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री आणि कोथरुडचे आमदार चंद्रकांतदादा पाटील यांनी वेळात वेळ काढून या कार्यक्रमाला हजेरी लावली; विशेष म्हणजे चंद्रकांतदादा हे कार्यक्रम सुरु झाल्यापासून कार्यक्रम संपेपर्यंत याठिकाणी उपस्थित होते. त्यांच्याच हस्ते सैन्य दलातून सेवानिवृत्त झालेल्या या महान विभूतींचा सन्मान करण्यात आला, त्यानंतर चंद्रकांतदादांनी कार्यक्रम संपल्यानंतर या तिघांशीही मनमोकळया गप्पा मारुन त्यांच्या आणि सैन्यदलातील समस्या जाणून घेतल्या.

यावेळी ऑपरेशन सिंदूरच्या यशस्वीततेबाबत बोलताना, माजी लेफ्टनंट जनरल विनायक पाटणकर म्हणाले की, समोरच्या शत्रूला जर शांततेची भाषा समजत नाही, तर युद्धाशिवाय पर्याय राहत नाही. आज आपल्या सैन्य दलाचे सामर्थ्य एवढे प्रचंड वाढले आहे की, त्याला जगात कशाचीही तोड नाही. आज संरक्षण सामुग्रीच्याबाबत स्वयंपूर्ण झालो आहोत. यासाठी भारत सरकारने दिलेल्या खंबीर पाठबळामुळेच हे शक्य झाले अशी भावना व्यक्त केली.

ऑपरेशन सिंदूरच्या पूर्वतयारी आणि यशस्वीतेबाबत लेफ्टनंट जनरल एस एस हसबनीस म्हणाले, दहशतवादी हल्ला हे यापूर्वी देखील झाले. पण आज जशास तसे उत्तर देत आहे. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान मधील दहशतवाद्यांची तळ उद्ध्वस्त करण्यासाठी; जी माहिती संकलित केली होती, त्यासाठी अनेक विभाग कार्यरत होते. यात काही मित्र राष्ट्रांची देखील मदत झाली, अशी भावना व्यक्त केली.

एअर मार्शल एस. एस. सोमण म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरच्या यशामध्ये इंटिग्रेटी हा अतिशय महत्वाचा भाग आहे. प्रत्येकांनी आपल्याला दिलेले काम अतिशय चोख बजावले. त्यासोबतच या यशस्वीतेसाठी जी इच्छाशक्ती आवश्यक होती, ती पाठिशी खंबीरपणे असल्याने, मोहिम यशस्वी झाल्याची भावना व्यक्त केली.

## अहिल्याबाई होळकर खऱ्या हिंदू धर्म रक्षक:सुजित यादव

**पुणे :** अखंड भारतात देवभूमी निर्माण करणाऱ्या बद्रीनाथ पासून रामेश्वर पर्यंत द्वारकापासून जगन्नाथ पुरी पर्यंत भारत वर्षाचा भौतिक सांस्कृतिक सामाजिक अध्यात्मिक असा सर्वांगीण चौफेर विकास करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्या अहिल्याबाई होळकर ह्या खऱ्या हिंदू धर्म रक्षक होत्या असे प्रतिपादन काँग्रेस पक्षाच्या अनुसूचित जाती विभागाचे शहराध्यक्ष सुजित यादव यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त सारसबाग समोरील त्यांच्या पुतळ्यास पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग व पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या संयुक्त विद्यमाने त्यांना अभिवादन करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे ओबीसी विभागाचे शहराध्यक्ष प्रदीप परदेशी, प्रदेश काँग्रेस सदस्य महबूब नदाफ, संतोष सुपेकर, नारायण लोणकर,शकील शेख,संतोष हंगर्गी,सचिन सुर्वे, ईश्वर गायकवाड, अभिषेक यादव, रमेश सोनकांबळे, यांच्यासह धनगर समाजाचे युवा नेते उमेश धनगर व संदीप कुरवर इत्यादी यावेळी उपस्थित होते.



## विवाहितेला गुंगीचे इंजेक्शन देऊन बलात्कार

**पुणे :** विवाहितेला गुंगीचे इंजेक्शन देऊन तिच्यावर बलात्कार करण्यात आल्याची घटना घडली. याप्रकरणी लष्कर पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत पीडित विवाहितेने लष्कर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, मुसफ मुनीर खान (वय ३८, रा. रास्ता पेठ,) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी मुसफ खान हा पीडितेच्या ओळखीचा आहे. जानेवारी महिन्यात तो तरुणीला भेटला. तुझ्या आई-वडिलांचे भांडण झाले आहे, असे सांगून त्याने विवाहितेला रिक्षातून अज्ञात ठिकाणी नेले. तिला इंजेक्शन दिले. त्यानंतर त्याने तिच्यावर बलात्कार केला. चित्रफीत तयार केली. या प्रकाराची कोणाला वाच्यता केल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. त्याने चित्रफीत पतीला पाठविण्याचीही धमकी दिली. आरोपी खान याच्या धमकीमुळे घाबरलेल्या विवाहितेने नुकतीच लष्कर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलीस उपनिरीक्षक भराड तपास करीत आहेत.

# अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य तरुण पिढीला माहिती व्हावे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "आपल्याला शिकवल्या गेलेल्या इतिहासात मुघल गेल्यावर थेट ब्रिटिश आले आणि राज्य केले असे सांगितले जाते. पण ते चुकीचे आहे. दरम्यानच्या १०० ते १२५ वर्षात वेगवेगळ्या स्वरूपात ठिकठिकाणी राज्यकारभार सुरु होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी २८ वर्ष उत्कृष्ट कारभार चालवला. त्यांच्या कारभारात सामान्य माणूस सर्वप्रथम होता. अहिल्यादेवी महाराणी होत्या. त्यांच्या नावाने राज्यात अनेक योजना सुरू केल्या आहेत. अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य तरुण पिढीला माहिती व्हायला हवे," असे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी व्यक्त केले.



> **'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने केलेल्या कारवाईबाबत दोन महिला माहिती देत होत्या. या महिलांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्राधान्य दिले. हे अहिल्यादेवी होळकर यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याचे प्रतीक आहे. आत्मनिर्भर भारताचे महत्व अहिल्यादेवी यांनी त्याकाळात ओळखले होते. शस्त्रनिर्मिती कारखाने त्यांनी तयार केले. त्यांच्या राज्याला कोणी कधी नख लावू शकले नाही.**
> **-देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने 'युवा प्रेरणा संवाद' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेचे आमदार व महासचिव विक्रांत पाटील, आमदार योगेश टिळेकर, आमदार हेमंत रासने, आमदार शंकर जगताप, भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपा युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस सुदर्शन पाटसकर, निखिल चव्हाण, योगेश मेंद, महिला शहराध्यक्ष निवेदिता एकबोटे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष करण मिसाळ, संदीप सातव, सचिन जायभाये, कुणाल टिळक, प्रिया पवार, भैरवी वाघ, अमृत मारणे, कुणाल मराठे,अजित कुलथे, अजिंक्य टेकवडे, ललिता जाधव, संग्राम बर्गे आदी उपस्थित होते. याप्रसंगी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्ताने वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्पर्धेचे बक्षीस वितरण, तसेच समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आज आपण अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने एकत्र आलो. ३०० वर्षांनंतरही त्यांच्या कारभाराची आठवण काढली जाते. कारण देशात होणाऱ्या परकीय आक्रमणांना मोडीत काढण्याचे काम त्यांनी केले. भारतीय समाज एकसंध असून, आध्यात्मिक ताकद प्रबळ आहे. त्यामुळे आपली संस्कृतीची मानके तोडण्याचा, उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न आक्रमणांनी केला. भारतीयाची शक्तिस्थळे, देवस्थाने नष्ट करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. अहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण देशातील पुण्यस्थळे आणि शक्तीस्थळे, घाटांचे पुनर्जीवन करण्याचे काम केले. त्यांच्यामुळेच आज सर्व ज्योतिर्लिंग शाबूत आहेत."

औरंगजेबासारख्या नालायक लोकांनी आपली मंदिरे उद्ध्वस्त करण्याचे काम केले. आपल्या संस्कृतीचे पुनर्जीवन करण्यात अहिल्यादेवी यांचा मोठा वाटा आहे.

## महीला आयोगाच्या अध्यक्ष पदी राजकिय व्यक्ती नको

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य महीला आयोगाच्या अध्यक्ष पदी राजकिय व्यक्तीची नियुक्ती नको. गेल्या काही प्रकरणात आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची भुमिका योग्य दिसुन आली नाही. पक्षाचा एक विभाग असल्यासारखे आयोगाचे काम कोणी चालवित असेल तर योग्य ठरणार नाही, असे आमदार रोहीत पवार यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. तसेच चाकणकर यांनी स्वत:हून राजीनामा दिला पाहीजे असेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघटनेच्यावतीने 'एमपीएल' क्रिकेट स्पर्धा आयोजित केली गेली आहे. यानिमित्ताने आयोजित पत्रकार परीषदेत आमदार पवार यांनी राजकीय विषयांवर भाष्य केले. वैष्णवी कस्पटे - हगवणे यांच्या आत्महत्येनंतर राज्य महीला आयोगाच्या अध्यक्षा चाकणकर यांच्यावर टिका केली गेली. यासंदर्भात बोलताना आमदार पवार यांनी राज्य महीला आयोगाच्या अध्यक्षपदी राजकीय व्यक्तींची नियुक्ती करता कामा नये.



> **दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्यासंदर्भात आमदार पवार यांनी खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे बोट दाखविले. "मी आणि जयंत पाटील यांनी दोन्ही पक्ष एकत्र येण्यासंदर्भात पत्र दिल्याची माहीती खोटी आहे. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी या विषयी निर्णय घेण्याचे अधिकार हे पक्षाच्या कार्याध्यक्ष आणि खासदार सुप्रिया सुळे यांना दिले आहे.**
> **-आमदार रोहित पवार,** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

# मन हे कुरूक्षेत्र, शांतीचेही अधिष्ठान: गोविंद देव गिरिजी महाराज



लोणावळा येथील मनशक्ती प्रयोग केंदाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे आज उद्घाटन प्रसंगी संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या बोधचिन्हाचे अनावरण करताना ज्येष्ठ आध्यात्मिक गुरु गोविंद देव गिरिजी महाराज. यावेळी (डावीकडून) गजानन केळकर, गोविंद देव गिरिजी महाराज, प्रमोदभाई शिंदे आणि विजय कुवळेकर.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मअदृश्य असलेले मन हे अतिशय चंचल असते. त्या चंचल मनावर ताबा मिळवणे हे उसळलेल्या घोड्यावर नियंत्रण मिळवण्यासारखे असते. मन हे सिध्दीस नेण्याचे साधन ठरू शकते, तर अधोगती होण्याचे निमित्त देखील होऊ शकते. म्हणून बुध्दीसह मनावर देखील संस्कार आणि प्रयोग होणे आवश्यक आहे. कारण मन हे कुरूक्षेत्र आणि शांतीचेही अधिष्ठान असते, असे मत ज्येष्ठ आध्यात्मिक गुरु गोविंद देव गिरिजी महाराज यांनी व्यक्त केले.

व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र आणि मानवतेच्या कल्याणासाठी विज्ञान, अध्यात्म आणि व्यावहारिकता यांचा मेळ घालून कार्य करणाऱ्या लोणावळा येथील मनशक्ती प्रयोग केंदाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे उद्घाटन आज ज्येष्ठ आध्यात्मिक गुरु गोविंद देव गिरिजी महाराज यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

लोणावळा येथील मनशांती केंद्रात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर ज्येष्ठ लेखक, गीतकार आणि पत्रकार विजय कुवळेकर, मनशक्ती केंद्राचे कार्यकारी विश्वस्त प्रमोदभाई शिंदे आणि मनशक्ती संशोधक केंद्राचे प्रमुख गजानन केळकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ आध्यात्मिक गुरु गोविंद देव गिरिजी महाराज यांच्या हस्ते संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. गोविंद देव गिरिजी महाराज म्हणाले की, आधुनिक विज्ञानाने देखील प्रयोगाअंती अनेक शोध लावले. परंतु, मनावर प्रयोग करणारे विज्ञान किंवा वैज्ञानिक प्रयोग सिध्दीस गेल्याचे अजून तरी ऐकीवात नाही. या मनशक्ती केंद्रात अचल आणि अदृश्य असलेल्या मनावर होणारे प्रयोग आणि ते सिध्दीस जाण्याचे प्रमाण पाहता मन अचंबित होते आणि हरखून जाते.

> **स्वामी विज्ञानानंद हे अद्भूत व्यक्तीमत्व होते. त्यांनी आपल्या कार्याचा कधीच गाजावाजा केला नाही. राष्ट्र, समाज आणि व्यक्ती बलशाली होण्यासाठी मन संस्कारीत आणि सामर्थ्यवान बनले पाहिजे, यावर त्यांचा दृढ विश्वास होता आणि त्या दिशेने त्यांनी कार्य केले.**
> **-विजय कुवळेकर,** ज्येष्ठ पत्रकार

# नसांचा रंग कसा?



मित्रांनो, त्वचेखाली फुगलेल्या नसा पाहतो तेव्हा त्या निळ्या किंवा हिरव्या रंगाच्या दिसतात. पण रक्ताचा रंग तर लाल असतो. मग रक्तवाहिन्या निळ्या किंवा हिरव्या का दिसतात? असा प्रश्न तुम्हाला कधी पडतो का?

मुलांनो, आपल्या रक्तात हिमोग्लोबिन नावाचे एक प्रथिन असते, जे शरीराच्या प्रत्येक भागात ऑक्सिजन पोहोचवण्याचे काम करते. हे हिमोग्लोबिन ऑक्सिजनशी संयोग पावते तेव्हा ते चमकदार लाल होते. रक्त आपल्या शरीरात वाहते. त्वचेवर प्रकाश पडतो तेव्हा तो वेगवेगळ्या रंगांमध्ये विभागला जातो. लाल रंगाची तरंगलांबी जास्त असते आणि ती त्वचेत खोलवर जाऊ शकते. निळ्या लाटा कमी खोलीपर्यंत प्रवास करतात आणि लवकर परावर्तित होतात. यामुळे, आपले डोळे बहुतेक निळ्या लाटा टिपतात आणि आपल्याला शिरा निळ्या किंवा हिरव्या दिसतात. म्हणजेच डोळे आणि मेंदू एकत्रितपणे आपल्याला दाखवतात ते रंग वास्तविक असतातच असे नाही. नसांच्या पृष्ठभागावरून परावर्तित होणारा प्रकाश आणि त्वचेखालील

**माहिती असू द्या**

पोत एकत्रितपणे एक भ्रम निर्माण करतात ज्यामुळे त्या निळ्या दिसतात.

अनेकांना असे वाटते की, ऑक्सिजनची कमतरता असलेले रक्त असल्यास नसांचा रंग निळा असतो. तथापि, हे खरे नाही. गोरी त्वचा असलेल्या लोकांमध्ये शिरा बहुतेकदा अधिक स्पष्ट आणि निळ्या/हिरव्या दिसतात तर गडद त्वचेमध्ये हा फरक कमी लक्षात येतो. त्वचेची जाडी, रंग आणि नसांची खोली या सर्व गोष्टी तुम्हाला शिरा कोणत्या रंगाच्या दिसतील हे ठरवतात.



# प्राणीविश्वातील भ्रमंती

छोट्या दोस्तांनो, तुम्ही सुटीत खूप धमाल करत असाल. शक्य असेल तर तुम्ही जंगलसफारीला जा. प्राण्यांच्या दुनियेची सफर करा. मित्रमैत्रिणींनो,जंगलसफारी खूप थ्रीलिंग असते. तुम्हाला इथे भरपूर प्राणी बघता येतील. जंगल म्हणजे प्राण्यांच घर. त्यामुळे वाघ, सिंहासारखे प्राणी तेथे मुक्तपणे हिंडत असतात. म्हणूनच जंगलात फिरायला जायचं तर काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं. काही नियमांचं पालन करायला हवं. जंगल सफारीची योजना आखत असाल तर काय करायला हवं याविषयी...

✲ जंगलात फिरायला गेल्यावर आरडाओरडा करू नका. यामुळे प्राणी घाबरतात, लपून बसतात. त्यामुळे फिरताना शांतता राखा.

✲ जंगलात फिरायला जाताना कपड्यांकडे लक्ष द्या. गडद रंगाचे कपडे घालणं टाळा. निसर्गाशी साधर्म्य साधणाऱ्या रंगांचे कपडे घाला.

✲ जंगलात फिरताना गाडीतून अजिबात उतरू नका. हात बाहेर काढू नका. कोणत्याही प्राण्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करू नका.

✲ जंगलात कचरा करू नका. प्लास्टिक पिशव्या, बाटल्या फेकू नका.

✲ प्राण्यांची वास घेण्याची क्षमता माणसांपेक्षा जास्त असते. त्यामुळे फार परफ्युम लावू नका.

✲ फोटो काढताना फ्लॅशचा वापर करू नका. फ्लॅशमुळे

**भटकंती**

प्राण्यांना त्रास होऊ शकतो.

✲ जंगलात गेल्यावर प्राण्यांना त्रास देऊ नका. तुम्ही त्यांच्या राज्यात आला आहात हे लक्षात ठेवा.

# आहार हवा जीवनसत्त्वांनी युक्त




मित्रांनो, शरीराप्रमाणे मन निरोगी ठेवणे गरजेचे असते. अर्थातच त्यासाठी काही जीवनसत्त्वांची आवश्यकता असते. त्यांची कमतरता असेल तर आपल्या मानसिक आरोग्यावर विपरित परिणाम होतो. मानसिक संतुलन बिघडू शकते. म्हणूनच मेंदूला बळकटी देण्यासाठी आहारात खालील जीवनसत्त्वांनी युक्त घटकांचा समावेश आवर्जून करायला हवा.

✲ व्हिटॅमिन बी १२ मेंदूला योग्यरित्या कार्य करण्यास मदत करते. त्याच्या कमतरतेमुळे स्मरणशक्ती कमी होणे, चक्कर येणे, गोंधळणे, चिडचिड आणि नैराश्य यासारख्या समस्या उद्भवू शकतात. थकवा जाणवणे, लक्ष केंद्रित करण्यात अडचण येणे, गोष्टी विसरणे ही त्याची काही प्रमुख लक्षणे आहेत. म्हणूनच आपण आहारात दूध, दही, अंडी, मांस, मासे आणि फोर्टिफाइड तृणधान्यांचा वापर करायला हवा. याचे कारण त्याचमध्ये व्हिटॅमिन बी १२ भरपूर प्रमाणात आढळते. शाकाहारी असाल तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तुम्ही सोया मिल्क, मशरूम, फोर्टिफाइड ब्रेड किंवा सप्लिमेंट्स घेऊ शकता.


✲ व्हिटॅमिन डी फक्त हाडे निरोगी ठेवते असे नाही तर ते मेंदूचा मूड सेंटरही नियंत्रित करते. याच्या कमतरतेमुळे नैराश्य, चिंता आणि थकवा यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्याची

**आहारज्ञान**

कमतरता उदास मनःस्थिती, अस्वस्थता आणि झोपेची कमतरता याद्वारे ओळखली जाऊ शकते. म्हणूनच धोका टाळण्यासाठी व्हिटॅमिन डी युक्त घटकांचा आहारात समावेश करायला हवा.

✲ व्हिटॅमिन बी ६ मेंदूतील न्यूरोट्रांसमीटर (जसे की सेरोटोनिन आणि डोपामाइन) संतुलित करण्यास मदत करते.

# फोन करा रिस्टार्ट



छोट्या दोस्तांनो, अनेकदा आपला फोन हळू चालतो. हँग होतो. पण ही समस्या अगदी सहजपणे टाळता येते. फोन रीस्टार्ट करण्याच्या सोप्या कृतीद्वारे आपण फोनसंबंधीची ही समस्या दूर करू शकतो. मुलांनो, फोन सुरळीत चालण्यासाठी आठवड्यातून किमान तीन वेळा रीस्टार्ट करावा, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तुम्ही डिव्हाइस रीस्टार्ट करता तेव्हा ते रॅम साफ करते, पार्श्वभूमीवर असणारी ॲप्स बंद करते आणि ऑपरेटिंग सिस्टम रीसेट करते. कालांतराने, स्मार्टफोनमध्ये तात्पुरत्या फाइल्स, कॅशे केलेला डेटा आणि पार्श्वभूमी प्रक्रिया जमा होतात. यामुळे फोनचे काम मंदावते. आठवड्यातून एकदा रीस्टार्ट केल्याने हा गोंधळ दूर होतो आणि डिव्हाइस सुरळीत चालते. नियमित रीस्टार्ट करण्याचा

**टेक ज्ञान**

आणखी एक फायदा म्हणजे बॅटरीची क्षमता चांगली राहते. मागे सुरू असणारी ॲप्स आणि सिस्टम कोणतीही प्रक्रिया वापरात नसतानाही वीज वापरतात. फोन रीस्टार्ट केल्याने या प्रक्रिया थांबतात आणि अनावश्यक बॅटरी संपण्यापासून बचाव होतो. यामुळे तुमचा फोन एकदा चार्ज केल्यानंतर जास्त काळ टिकतो आणि बॅटरीची कार्यक्षमता जास्त काळ चांगली राहते.


डिव्हाइस रीस्टार्ट केल्याने मालवेअर किंवा अयोग्य ॲप्सपासून निर्माण होणारे धोकेही कमी होतात. याशिवाय रीस्टार्टमुळे मोबाईल नेटवर्क आणि कनेक्टिव्हिटीलाही फायदा होतो. तुमच्या फोनला वाय-फाय किंवा मोबाईल नेटवर्कशी कनेक्ट करण्यात समस्या येत असेल तर रीस्टार्ट केल्याने कनेक्शन रिफ्रेश होऊ शकते आणि या सामान्य समस्या सहजी सोडवता येतात. हे हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर प्रक्रियांसाठी एक मिनी 'रीसेट' म्हणून काम करते.

तथापि, हे वारंवार केल्याने कोणताही अतिरिक्त फायदा होत नाही. खरेज कालांतराने अंतर्गत घटकांवर ताण येऊ शकतो. पण आठवड्यातून एकदा असे केल्याने देखभाल आणि व्यावहारिकता यांच्यात योग्य संतुलन साधले जाते.

# सापाविषयी अधिक काही...

दोन साप समोरासमोर आले आणि त्यांपैकी एकाने रागाने किंवा चुकून दुसऱ्याला चावले तर काय होईल? ते स्वतःच्या विषाने एकमेकांना मारू शकतात का? चला जाणून घेऊ या.

कधीकधी साप एकमेकांना चावतात. आक्रमकता किंवा भांडणाच्या वेळी किंवा दोन नर साप एका मादीसाठी स्पर्धा करताना एकमेकांना चावतात. किंग कोब्रासारखे साप इतर सापांची शिकार करतात. तथापि, प्रत्येक प्रजाती असे करत नाही. अजगरासारखे साप इतर सापांना खात नाहीत. म्हणूनच साप कोणत्या प्रजातीचे आहे यावर ते एकमेकांना चावतात का आणि डंख केल्यास काय परिणाम होतो, हे अवलंबून असते. एकाच प्रजातीच्या सापांमध्ये विषाविरुद्ध प्रतिकारशक्ती आढळते. म्हणजेच, एका सापाने दुसऱ्या सापाला चावले तर दुसरा साप वाचू शकतो कारण त्याच्या शरीरात त्याच विषाविरुद्ध ॲंटीबॉडीज विकसित झाले आहेत.



तथापि, वेगवेगळ्या प्रजातींचे साप असतील तर परिस्थिती बदलू शकते. उदाहरणार्थ एखादा किंग कोब्राने रसेल वाइपरला चावले तर त्याचे विष प्रभावी असू शकते. परंतु काही सापांमध्ये नैसर्गिक प्रतिकारशक्ती असते. विशेषतः इतर सापांना खाणाऱ्या सापांमध्ये ती अधिक असते.

संशोधनातून दिसून आले आहे की किंग कोब्रा सारख्या सापांमध्ये इतर सापांच्या विषाविरुद्ध बरीच प्रतिकारशक्ती असते. काही सापांच्या शरीरात ॲंटीजन नावाचे घटक आढळतात, जे इतर सापांचे विष निष्क्रिय करतात. त्यामुळे ते केवळ चावण्यापासून वाचू शकत नाहीत, तर ते त्यांना खाऊ शकतात आणि तरीही जगू शकतात.

**महत्त्वाचे काही...**

सापांमध्येही मारामारी होते. विशेषतः प्रजनन काळात, नर साप मादीसाठी आपापसात लढतात. या काळात ते एकमेकांवर विष सोडत नाहीत तर फक्त कुस्तीसारखे लढतात. डोके वर करून ते एकमेकांना दाबण्याचा प्रयत्न करतात. ही लढाई कमी घातक आणि शक्तिप्रदर्शन जास्त आहे.


# घरीच बनवा तोरण


मित्रांनो, सध्या लग्नसराई आहे. तुमच्या घरातही एखादे कार्य असेल. तसेच कोणत्याही शुभप्रसंगी आपण घराला तोरण लावतो. हस्तकलेची आवड असेल तर तुम्हीही घरी तोरण बनवू शकता. तोरण बनवण्याची सोपी पद्धत जाणून घेऊ.

**साहित्य :** लाल, केशरी आणि पिवळ्या रंगाचे कागद, लाल किंवा ब्राऊन रंगाचे क्रेयॉन किंवा खडू, दोरा किंवा वायर, सेलोटेप, झाडाची पानं.


**कृती :** झाडाची खरी पानं टेबलवर ठेवा. देठ असलेली बाजू खाली जाऊ द्या. आता या पानावर विविध रंगांचे कागद ठेवा. आता क्रेयॉन किंवा खडूच्या मदतीने कागदावर पानाचा आकार काढून घ्या. कात्रीने पानांचे आकार कापून घ्या. पानांचे वेगळे आकारही चालतील. तुमच्या आवडीच्या रंगाचे कागद घेता येतील. भरपूर पानं कापून झाली की पानांच्या वरच्या बाजूला भोक पाडा. आता ही सगळी पानं दोऱ्यात ओवून घ्या. कल्पकता असेल तर तुम्ही कागदी फुलं तयार करू शकता. पानांवर छानसं नक्षीकामही करू शकता. ग्लिटरचा वापर करून पानांवर सोनेरी किंवा चंदेरी नक्षी काढता येईल. त्यावर खडे किंवा चांदण्या चिकटवता येतील. तुमच्या आवडीप्रमाणे ही सजावट करता येईल. मग काय, मोकळ्या वेळेत कामाला लागा आणि छानशी तोरणं तयार करा. हे तोरण भेट म्हणूनही देता येतील.

**करून तर पहा**






**ठिपके जुळवा**



# प्राण्यांची आवड आहे?



छोट्या दोस्तांनो, पाळीव प्राण्यांचे खूप लाड होतात बरं का. त्यांच्यासाठी वेगळी सलून्स असतात. इथे प्राण्यांचे केस, नखं कापली जातात. त्यांना आंघोळ घातली जाते. प्राण्यांना छान सजवलं जातं. ही सगळी कामं पेट ग्रुमर करतात. तुम्हालाही प्राणी आवडत असतील तर पेट ग्रुमिंगचं करीअर निवडायला हरकत नाही. पेट ग्रुमिंगच्या करीअरविषयी...

आपल्यापैकी प्रत्येकाला छान दिसायचं असतं. त्यासाठी आपण पार्लरमध्ये जातो. छान छान कपडे घालतो. मेक अप करतो. पाळीव प्राण्यांचेही असेच लाड होतात. त्यांचं ग्रुमिंग केलं जातं. पेट ग्रुमिंगमध्ये कुत्रा आणि मांजरांना तयार केलं जातं. काहीजण घोडा आणि सश्यांनाही ग्रूम करतात. माणसांप्रमाणे प्राण्यांचीही नीट काळजी घ्यावी लागते. प्राण्यांचे मालकही त्यांची विशेष काळजी घेण्यावर भर देतात. म्हणून पेट ग्रूमर्सच्या मागणीत वाढ होत आहे. पाळलेल्या प्राण्यांचं आरोग्य चांगलं रहावं, तो प्राणी छान दिसावा असं अनेकांना वाटत असतं.

पेट ग्रुमिंगमधलं करीअर वाटतं तितकं सोपं नाही. प्राणी कसे वागतील याचा काहीच नेम नसतो. त्यामुळे त्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. काही प्राणी

**कोण होणार?**

तुम्हाला अजिबात सहकार्य करत नाहीत. दुसऱ्यांना हात लावू देत नाहीत. अशा वेळी त्यांना कसं हाताळायचं हे ठरवावं लागतं. पेट ग्रुमिंगचं करीअर निवडण्यासाठी पाळीव प्राण्यांच्या गरजा जाणून घ्यायला हव्यात.

## ओळखा पाहू

**जिज्ञासा**


१) गॅलेलिओने कशाचा शोध लावला?
२) भूमितीचा जनक कोण?
३) भारताचे लोहपुरूष असं कोणाला म्हटलं जातं?
४) टेलिफोनचा शोध कधी लागला?
५) राष्ट्रपिता कोणाला म्हटलं जातं?
६) भारताचा शोध कोणी लावला?
७) भारतात किती राज्यं आहेत?
८) रामायणाचे लेखक कोण?
९) पहिल्या महायुद्धाची सुरूवात कधी झाली?
१०) बुद्धीबळाच्या पटावर किती चौकोन असतात?

उत्तर : १) गुरू ग्रहाचे चार उपग्रह २) युक्लिड ३) सरदार वल्लभभाई पटेल ४)१८७० ५) महात्मा गांधी ६) वास्को द गामा ७) २८ ८) वाल्मिकी ९) १९१४ १०)६४

**माहीत असावे...**

## जिम्नॅस्टिक्समध्ये रस वाढवा

मित्रांनो, जिम्नॅस्टिक्स हा उत्तम खेळ असून त्याचे विविध प्रकार आहेत. ॲक्रोबिक, रिद्मिक, आर्टिस्टिक असे प्रकार पहाणं रंजक ठरतं. ऑलिम्पिकमध्येही जिम्नॅस्टिक्सचा समावेश असतो.



ऑलिम्पिक ही जगातली सर्वात मोठी क्रीडास्पर्धा आहे. ऑलिम्पिकमध्ये जिम्नॅस्टिक्सच्या फ्लोर एक्सरसाइज, वॉल्ट पोमेल हॉर्स, रिंग्ज, पॅरेलल बार्स, हॉरिझाँटल बार, अनइव्हन बार आणि बॅलन्स बीमसह विविध प्रकारच्या आठ इव्हेंट्स होतात. महिला आणि पुरुष जिम्नॅस्ट्ससाठी वेगवेगळ्या इव्हेंट्सचं आयोजन केलं जातं. बॅलन्स बीम आणि अनइव्हन बार्स या इव्हेंट्स फक्त महिलांसाठीच असतात.

**खादाडी**

## यम्मी चॉकलेट पिझ्झा



छोट्यांनो, तुम्हाला चॉकलेट आणि पिझ्झा दोन्ही आवडत. मग चॉकलेट आणि पिझ्झा या दोन्हींचं कॉम्बिनेशन केलं तर...म्हणजे चॉकलेट पिझ्झा बनवला तर.. यासाठी अर्धा कप चोको चिप्स, आक्रोड, बदाम आणि काजूचे तुकडे अर्धा कप, पाव कप दूध, पिझ्झा बेस, एक चमचा बटर, चमचाभर साखर, सजावटीसाठी अननस किंवा स्ट्रॉबेरीचे काप हे साहित्य घ्या. हा पिझ्झा मायक्रोवेव्हमध्ये बनवायचा आहे. यासाठी मायक्रोवेव्ह १० मिनिटं प्रीहिट करून घ्या. आता एका भांड्यात चॉकलेट, ड्रायफ्रूट्स, बटर आणि दूध एकत्र करून घ्या. यानंतर हे मिश्रण पिझ्झा बेसवर पसरवा. मग पिझ्झा बेस मायक्रोवेव्हमध्ये ठेऊन बेक करून घ्या. पिझ्झा तयार होईल.

**दोस्त हे मस्त**

## रंगीबेरंगी ट्रेगोपॅन

दोस्तांनो, ट्रेगोपॅन हा अनोखा पक्षी आहे. त्याची चोच छोटी आणि पंख गोलाकार असतात. त्यांची शेपटीही बरीच छोटी असते. जगभरात




ट्रेगोपॅनच्या पाच प्रजाती आहेत. यापैकी 'वेस्टर्न ट्रेगोपॅन' हा हिमाचल प्रदेशचा राज्य पक्षी आहे. वेस्टर्न ट्रेगोपॅनला 'वेस्टर्न हॉर्न फिजेन्ट'ही म्हणतात. वेस्टर्न ट्रेगोपॅनची संख्या खूप कमी झाली आहे.

**योगा टाईम**

## करा वृक्षासन

मुलामुलींनो, तुम्ही योगासनांचे लाभ जाणताच. योगामुळे शरीराचं संतुलन राखलं जातं. तसंच एकाग्रताही वाढते.



एकाग्रता वाढवण्यासाठी तुम्ही वृक्षासन करू शकता. हे आसन करण्यासाठी ताठ उभे रहा. आता उजवा पाय दुमडून पाऊल डाव्या मांडीवर ठेवा. दोन्ही हात वर न्या आणि हातांचे पंजे जोडून काही सेकंद ताठ उभे रहा. वृक्षासनामुळे पाय आणि पाठीचा कणा बळकट होतो.

# भारताच्या पहिल्या बुलेटट्रेनची चाचणी सुरु!

## अवघ्या २ तासांत मुंबईहून अहमदाबाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जपान :** भारताला जपानकडून शिंकानसेन मालिकेतील E५ आणि E३ मॉडेलच्या दोन बुलेट ट्रेन भेट म्हणून मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल (MAHSR) प्रकल्पांतर्गत जपानमध्ये प्रथमच शिंकानसेन बुलेट ट्रेनची चाचणी सुरु झाली आहे. भारतीय गरजा लक्षात घेऊन ही चाचणी केली जात आहे. जेव्हा या गाड्या भारतात येतील तेव्हा त्या स्थानिक वातावरणातही चांगली कामगिरी करू शकतील. हा प्रकल्प २०२६ पर्यंत भारतात राबवला जाणार आहे आणि पहिल्या २ गाड्या जपानकडून भारताला भेट म्हणून दिल्या जातील अशी माहिती समोर आली आहे.

या प्रकल्पांतर्गत, भारताला शिंकानसेन मालिकेतील E५ आणि E३ मॉडेलच्या दोन ट्रेन मिळतील. या गाड्या ताशी ३२० किलोमीटर वेगाने धावू शकतात. सध्या, जपानमध्ये या गाड्यांची चाचणी सुरू आहे. ट्रेनची क्षमता, सुरक्षितता, तापमान आणि धूळ प्रतिरोधकता यासारख्या ट्रेनच्या अनेक वैशिष्ट्यांची चाचणी केली जात आहे. २०२६या वर्षाच्या सुरुवातीला जेव्हा या गाड्या भारतात येतील तेव्हा येथील जमीन आणि हवामानानुसार त्यांची चाचणी देखील केली जाईल.



### 'मेक इन इंडिया' चालना

● या बुलेट ट्रेनच्या ट्रायलमधून जो डेटा मिळेल, त्याचा उपयोग भारतातच नव्या पिढीच्या E१० सीरिजमधील बुलेट ट्रेन बनवण्यासाठी केला जाईल. यामुळे "मेक इन इंडिया" उपक्रमांतर्गत टेक्निकल ट्रान्सफर आणि स्वावलंबनाला प्रोत्साहन मिळेल.

### २ तास ७ मिनिटांत पार पडणार प्रवास

● या ५०८ किलोमीटर लांबीच्या कॉरिडॉरमध्ये, मुंबई ते अहमदाबाद हा प्रवास फक्त २ तास ०७ मिनिटांत पूर्ण होईल. या मार्गावर १२ स्थानके असतील, ज्यामध्ये ठाणे, विरार, वापी, सुरत आणि वडोदरा या शहरांचा समावेश आहे. २०१६ मध्ये भारत आणि जपान यांच्यात झालेल्या कराराचा हा प्रकल्प एक भाग आहे, ज्यामध्ये जपान स्वस्त येन कर्जाच्या स्वरूपात ८० टक्के खर्च देत आहे.

### रेल्वेचे चित्र बदलेल

● या प्रकल्पामुळे केवळ जलद प्रवासाचेच साधन मिळणार नाही तर रोजगार, पर्यटन, तांत्रिक विकास आणि व्यापारालाही मोठी चालना मिळणार आहे. एकदा बुलेट ट्रेन सुरू झाली की, भारतातील रेल्वेचे भविष्य पूर्णपणे बदलून जाईल, असे बोलले जात आहे.

---

## ग्रीन अँड नेट झिरो बिल्डिंग संकल्पना स्वीकारा : पंकजा मुंडे



**पुणे :** अल इस्टेट डेव्हलपर्स आणि वास्तुविशारदांनी नवीन प्रकल्पांचे नियोजन करताना 'ग्रीन अँड नेट झिरो बिल्डिंग' संकल्पना स्वीकाराव्यात. कारण पर्यावरणाचा ऱ्हास कमी करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची आहे, असे आवाहन पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांनी केले. तसेच बांधकाम व्यावसाईकांनी त्यांच्या प्रकल्पांमध्ये शाश्वत, पर्यावरणपूरक संकल्पना आणि तंत्रज्ञान एकत्रित करण्याची गरज अधोरेखित केली.

## मुंबई- अहमदाबाद महामार्गावर कार आणि कंटेनरमध्ये भीषण अपघात

**मुंबई :** पालघरमध्ये कार आणि कंटेनरमध्ये भीषण अपघात झाला. या अपघातमध्ये तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर अपघातामध्ये दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर ही घटना घडली. अपघाताची माहिती मिळताच पालघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल केले. जखमींची प्रकृती चिंताजनक आहे. या अपघातानंतर महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई- अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मेंढवन घाटात भीषण अपघात झाला. गुजरातहून मुंबईच्या दिशेने येणार्या भरधाव कारने कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये कारमधल तिघांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये दोन महिला आणि एका पुरूषाचा समावेश आहे. तर जखमींमध्ये एका चिमुकल्या मुलाचा समावेश आहे.

## विशेष अधिवेशनाच्या मागणीवर विरोधक ठाम

**मुंबई :** पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूरवर चर्चेसाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याच्या मागणीवर विरोधक ठाम आहेत. त्या मागणीचे पत्र केंद्र सरकारकडे सादर केले जाणार आहे. उद्धवसेनेचे नेते संजय राऊत यांनी संबंधित माहिती पत्रकारांशी बोलताना दिली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पत्र सादर करण्याची प्रक्रिया होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांना लक्ष्य करत भयंकर हल्ला घडवला. त्या हल्ल्यामुळे सुरक्षाविषयक त्रुटी समोर आली. दहशतवादी हल्ल्याचा वचपा काढण्यासाठी भारतीय सशस्त्र दलांनी ऑपरेशन सिंदूर राबवले. त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये संघर्षाची स्थिती उद्भवली. त्या संघर्षाला विराम देण्यासाठी दोन्ही देशांत समझोता झाला.

त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प करत आहेत. त्या सर्व बाबींवर बोट ठेऊन विरोधक केंद्र सरकारला काही प्रश्न विचारत आहेत. त्यातून विशेष अधिवेशनाचा आग्रह त्यांनी कायम ठेवला आहे. मात्र, सरकारकडून अद्याप विरोधकांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही.

## ईडीच्या अधिकाऱ्याला लाच घेताना अटक

**भुवनेश्वर :** भ्रष्टाचारी आणि घोटाळेबाजांवर कारवाई करणाऱ्या अंमलबजावणी संचालनालयाचा (ED) अधिकारीच सीबीआयच्या जाळ्यात अडकला आहे. सीबीआयने ईडीचे उपसंचालक चिंतन रघुवंशी यांना भुवनेश्वरमध्ये व्यावसायिकाकडून २० लाख रुपयांची लाच स्वीकारताना अटक केली आहे.अधिकाऱ्याने व्यावसायिकाकडून ५ कोटी रुपयांची लाच मागितली होती. मात्र २ कोटी रुपये घेण्याचे निश्चित झाले. सीबीआयने सध्या ईडी अधिकाऱ्याला अटक केली आहे आणि पुढील चौकशी सुरू केली आहे. माहितीनुसार, ईडी अधिकारी रघुवंशी यांनी एक प्रकरण मिटवण्यासाठी एका खाण व्यावसायिकाकडून ५ कोटी रुपयांची मागणी केली होती. जे नंतर २ कोटी रुपयांवर ठरले. पहिला हप्ता म्हणून २० लाख रुपये घेताना रघुवंशी सीबीआयच्या जाळ्यात अडकले. ही कारवाई ओडिशातील भुवनेश्वर येथे करण्यात आली.

## दिल्लीच्या भाजप सरकारचे १०० दिवस पूर्ण



**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या नेतृत्वाखालील दिल्ली सरकारने राष्ट्रीय राजधानीत आपले पहिले १०० दिवसांचे शासन पूर्ण केले आहे. राज्य सरकारने या प्रसंगी एक कार्यपुस्तिका प्रकाशित केली आहे, ज्यामध्ये आयुष्मान भारत योजना, महिला सन्मान योजना आणि यमुना नदी स्वच्छता मोहीम यासारख्या महत्त्वाच्या सार्वजनिक कल्याणकारी उपक्रमांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. "काम करने वाली सरकार-१०० दिन सेवा के" या कार्यपुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री गुप्ता आणि कॅबिनेट मंत्री आशिष सूद व कपिल मिश्रा यांनी केले. यामध्ये आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी क्षेत्रातील सरकारच्या प्रमुख उपक्रमांवर प्रकाश टाकण्यात आला. यामध्ये आयुष्मान भारत योजनेच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पीय वाटप, महिला सन्मान योजनेसाठी ५१,००० कोटी रुपयांची तरतूद, गरीब महिलांसाठी मासिक सहाय्य योजना यांचा समावेश आहे.

---

# धर्माच्या नावावर होणारा दहशतवाद थांबवा

## खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कल्याण :** पहलगाम (जम्मू आणि काश्मीर) येथे जेव्हा हल्ला झाला, तेव्हा दहशतवाद्यांनी लोकांची धर्म विचारून हत्या केली. ते हिंदू आहेत का, मुस्लिम आहेत का, हे तपासून मग त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. या हल्ल्यांचा उद्देश म्हणजे भारतातील सामाजिक सलोखा बिघडवणे. हा दहशतवाद्यांचा तसेच पाकिस्तानचा हेतू स्पष्ट होता. धर्माच्या नावावर होणारा दहशतवाद आता थांबायलाच हवा, असा इशारा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सिएरा लिओन येथून पाकिस्तानला दिला. तर याच पार्श्वभूमीवर आता भारताने 'दहशवादाविरोधात आता शून्य सहिष्णुता" धोरण अवलंबिले आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

पहलगाम (जम्मू आणि काश्मीर) येथील भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारताच्या राजनैतिक प्रयत्नांचा भाग म्हणून खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वातील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने सिएरा लिओन या देशाला २८ ते ३० मे २०२५ दरम्यान भेट दिली. या भेटीमागील उद्दिष्ट जागतिक स्तरावर दहशतवादाच्या गंभीर धोक्याविषयी जनजागृती करणे व आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळवणे हे होते. या शिष्टमंडळाने सिएरा लिओनमधील विविध उच्चपदस्थ व्यक्तींशी विस्तृत चर्चा केली. यात संसदाध्यक्ष, संसद सदस्य व परराष्ट्र विषय समिती, संरक्षण उपमंत्री, राष्ट्रीय सुरक्षा समन्वयक, कार्यवाह परराष्ट्र मंत्री तसेच सिएरा लिओनचे उपराष्ट्रपती यांचा समावेश होता. भारताचा दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुता धोरण या बैठकांमध्ये अधोरेखित करण्यात आले आणि दहशतवादविरोधी जागतिक ऐक्याची आवश्यकता ठळकपणे मांडण्यात आली.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा सिएरा लिओनच्या संसदेने तीव्र शब्दांत निषेध केला आणि हल्ल्यातील मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांसाठी मौन पाळून श्रद्धांजली देखील वाहण्यात आली.



### कारवाईची गरज

● खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सिएरा लिओनमधील विविध परदेशी राजनयिक अधिकाऱ्यांशी संवाद साधत दहशतवादविरोधात आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्णायक कारवाईची गरज अधोरेखित केली. भारताविरुद्ध सीमापार दहशतवादी कारवाया घडवणाऱ्या, पाठिंबा देणाऱ्या व प्रायोजित करणाऱ्यांविरुद्ध कडक पावले उचलण्याचे आवाहन त्यांनी केले.

---

# प्रकाशन सोहळ्यात गडकरींची फटकेबाजी



> मी बोललो ते शब्दांकन शैलेश पांडे यांनी केलं, त्यामुळे मी लेखक नाही, मी संघाचा अधिकृत पदाधिकारी नाही, पण स्वयंसेवक आहे. मी जे अनुभवलं ते लिहलं आहे. अनेक वेळा बोलताना मत मांडत होतो, माझा आयुष्यावर ज्या व्यतिचा प्रभाव झाला, त्या अनुभवातून लिहिण्याचं काम केलं. मी ज्ञानी नाही. मी इंजिनियर कॉलेजचा प्रवेश घेऊ शकलो नाही. बीबीसी एजन्सीने ऑफीसमध्ये बोलावलं, माझा औकातीपेक्षा माझी प्रतिमा उंच आहे."
> **— केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लिहिलेल्या 'संघातील मानवी व्यवस्थापन' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नागपूरमध्ये रंगला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर हे पण उपस्थित होते. पुस्तक प्रकाशन सोहळ्यात गडकरी यांनी अनेक विषयांवर नेहमीच्या खास शैलीत तुफान फटकेबाजी केली. 'मी विचार करत नाही, मी निर्णय घेण्याचा धाडस ठेवतो', असे त्यांनी गमक सांगितले.

या पुस्तक सोहळ्यात गडकरी यांनी अनेक विषयावर बेधडक मतं मांडली. ही गडकरींची खासियत आहे. आपल्या खास वऱ्हाडी शैलीत ते मत मांडायला मागे पुढे पाहत नाहीत. 'पैसे कमावणे गुन्हा नाही. मी सर्व कार्यकर्त्यांना नेहमी सांगतो की, पैसा कमावला पाहिजे. पण राजकारण हा काही पैसा कमावण्याचा धंदा नाही', असे झणझणीत अंजन त्यांनी घातले.

### अनेकांचा जामीन घेतला

● कार्यकर्तांकची स्थिती आहे. याचा अनुभव घेतला स्टुडंट्स युनियन मध्ये काम करताना अनेक अनुभव आले. युवा च्या निवडणुकीत अनेकदा घेऊन पाहिले प्रतिकूल परिस्थितीत कार्यकर्ता म्हणून किती अडचणी येतात. चांगल्या स्थितीत या गोष्टीचे अडचणी येत नाही पण कार्यकर्त्याची सहनशीलता संवेदनशीलता विकासदृष्टी आणि महत्वाची असते, याकडे गडकरी यांनी लक्ष वेधले.

---

# लज्जास्पद ! केरळ कम्युनिटीतर्फे पाकच्या क्रिकेटपटूंचे स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दुबई :** पहलगाममध्ये हिंदूंवर झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर सर्वस्तरातून टीका होत असताना केरळ कम्युनिटीच्या एका व्हिडिओमुळे प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. केरळ कम्युनिटीने दुबईत एका कार्यक्रमात चक्क पाकिस्तानी क्रिकेटपटूंचा सत्कार केल्याचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. भारताविरोधात सतत गरळ ओकणाऱ्या शाहीद आफ्रिदीचे स्वागत केरळच्या एका समुदायने केल्याने प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.

वादग्रस्त क्रिकेटपटू शाहिद आफ्रिदीने वारंवार काश्मीर आणि भारताविरोधात वक्तव्य करण्यासाठी कुप्रसिद्ध आहे. इतकेच नव्हे तर भारतीय लष्कराविरोधातही सातत्याने टीका करतो. भारतीयांमध्ये आफ्रिदीविरोधात प्रचंड संताप आहे. या प्रकरणाबद्दल अद्याप केंद्र सरकारतर्फे अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. दुबईत आयोजित केलेल्या 'ईद मिलन' कार्यक्रमात आफ्रिदी प्रमुख पाहूणा होता. केरळ कम्युनिटीतर्फे त्याचे जोरदार स्वागत करण्यात आले. केरळ समुदायातील उपस्थितांनी त्याच्यासोबत फोटोही काढले.

'असे करताना तुम्हाला जराही शरम वाटली नाही का?', असा जाब भारतीयांनी विचारला आहे. "भारतीय आहात ना! देशाच्या विरोधात बोलणाऱ्यांना का निमंत्रण देता?", असा जाबही विचारला आहे. दरम्यान, आयोजकांनी आपली बाजू स्पष्ट करत अजबच तर्क मांडला आहे. "हा कार्यक्रम राजकीय नव्हता. सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम म्हणून आम्ही याकडे पाहतो.



---

# राष्ट्रीय महामार्गावरील ३ उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील तीन उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत. यामुळे वाहतूक कोंडीने त्रस्त वाहन चालकांना दिलासा मिळाला आहे. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील सातीवली, जव्हार फाटा, नांदगाव आणि तलासरी हद्दीतील चार अपघातप्रवण ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत एक ते दीड वर्षापूर्वी उड्डाणपूलांच्या कामांना सुरुवात करण्यात आली. या चार ही ठिकाणी भरधाव वेगाने ये जा करणाऱ्या वाहनांच्या वेगाचा अंदाज न आल्याने विशेषतः रात्रीच्या अंधारात चारचाकी व दुचाकी वाहनांचा महामार्ग ओलांडताना वारंवार अपघात होऊन त्यामध्ये आत्तापर्यंत अनेक नागरिकांचा बळी गेला आहे. वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर या अपघातप्रवण ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याची अनेक वर्षांपासूनची मागणी स्थानिकांनी रेटून धरली होती. उड्डाणपूल उभारणीस दिरंगाई होत असल्याच्या विरोधात जव्हार फाटा येथे राजकीय पक्ष आणि संतप्त नागरिकांकडून महामार्गावरील वाहतूक रोखण्याचे आंदोलन देखील करण्यात आले होते.

सातीवली, मनोर जवळील जव्हार फाटा आणि नांदगाव, तलासरी या अपघात प्रवण ठिकाणी वाहने आणि नागरिकांना महामार्ग सुरक्षितरित्या ओलांडता यावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उड्डाणपूल निर्मितीसाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे पाठपुरावा सुरू ठेवला होता. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने २०२३ मध्ये उड्डाणपूल निर्मितीस परवानगी देऊन निधी मंजूर केला होता. नियुक्त कंत्राटदाराने २०२४ मध्ये उड्डाणपुलाच्या बांधकामास प्रारंभ केला मात्र त्याचवेळी महामार्गाच्या काँक्रिटीकरणाचे कामाला देखील सुरुवात झाल्याने घोडबंदर ते अच्छाड या १२१ किमीच्या टप्प्यात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन वाहन चालकांना मोठ्या गैरसोईला सामोरे जावे लागत होते. याप्रकरणी तत्कालीन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी निर्धारित वेळेत उड्डाणपूलांची कामे पूर्ण करण्याबाबत निर्देश दिले होते.



### वाहन चालकांना मोठा दिलासा

● चार उड्डाणपूलांपैकी जव्हार फाटा, नांदगाव आणि तलासरी या तीन ही उड्डाणपूलांची कामे जवळपास पूर्ण झाली असून एका रंगरंगोटीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. मात्र उड्डाणपुलाच्या बाजूच्या सेवा रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी आणि पावसामुळे निर्माण झालेला चिखल यामुळे उड्डाण पुलावरून वाहतूक सुरू करण्यात आली असून यामुळे वाहतूक कोंडीतून सुटका होऊन वाहन चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.







# मुंबई क्वालिफायर २ साठी पात्र

## गुजरात टायटन्सवर रोमहर्षक विजय, आज पंजाब किंग्सशी सामना; बोल्टच्या २ विकेट


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चंढीगड :** मुंबई इंडियन्सने इंडियन प्रीमिअर लीग २०२५ च्या क्वालिफायर २ मधील जागा पक्की केली. गुजरात टायटन्सविरुद्धच्या एलिमिनेटर लढतीत मुंबईने रोमहर्षक विजय मिळवला. नाणेफेक जिंकून हार्दिक पांड्याने प्रथम फलंदाजीचा धाडसी निर्णय घेतला आणि रोहित शर्मा, जॉनी बेअरस्टो, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा व हार्दिक यांनी तो योग्य ठरवला. मुंबईच्या २२८ धावांचा पाठलाग करताना गुजरातकडून कडवी टक्कर पाहायला मिळाली. साई सुदर्शन, वॉशिंग्टन सुंदर यांनी मुंबईचे टेंशन वाढवले होते. पण, जसप्रीत बुमराहने ने ही जोडी तोडून मॅच फिरवली. मुंबईला आता क्वालिफायर २ मध्ये पंजाब किंग्सचा सामना करायचा आहे. १ जूनला अहमदाबाद येथे हा सामना होईल.

मुंबईच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातला पहिल्याच षटकात धक्का बसला. कर्णधार शुभमन गिल १ धावेवर ट्रेंट बोल्टच्या गोलंदाजीवर पायचीत झाला. पण, साई सुदर्शन व कुसल मेंडिस यांनी चांगली खेळी केली. या दोघांनी ६४ धावां जोडताना गुजरातचा नेट रन रेट चांगला ठेवला होता. पण, मेंडिसने स्वतःहून त्याची विकेट फेकली. मिचेल सँटनरला मागे होऊन फटका मारण्याच्या प्रयत्नात मेंडिस हिटविकेट झाला. तो २० धावांवर माघारी परतला. गुजरातला ६७ धावांवर दुसरा धक्का बसला.



रोहित शर्मा



सुदर्शन मैदानावर उभा राहिला आणि त्याने सातवी फिफ्टी प्लस धावांची खेळी केली. गुजरातकडून एका पर्वात ७ वेळा फिफ्टी प्लस धावा करणारा तो शुभमन गिलनंतर दुसरा फलंदाज ठरला. सुदर्शनने या पर्वात ७५० धावांचा टप्पा ओलांडला आणि आयपीएलच्या एका पर्वात हा टप्पा ओलांडणारा तो पाचवा फलंदाज ठरला. यापूर्वी विराट कोहली ( २०१६), डेव्हिड वॉर्नर ( २०१६), जॉस बटलर ( २०२२) व शुभमन गिल ( २०२३) यांनी हा टप्पा ओलांडला होता. वयाची पंचवीशी पूर्ण करण्यापूर्वी आयपीएलच्या एका पर्वात ७०० हून अधिक धावा करणारा सुदर्शन हा शुभमननंतर ( ८९० धावा, २०२३) दुसरा फलंदाज ठरला.

सुदर्शनला यावेळी वॉशिंग्टन सुंदरची साथ मिळाली आणि दोन डावखुरे फलंदाज असताना मिचेल सँटनरला गोलंदाजीपासून दूर ठेवावे लागले. सुदर्शन व सुंदर यांनी साडेअकराची सरासरी कायम राखताना GT च्या विजयाच्या आसा जीवंत ठेवल्या होत्या. बोल्टने टाकलेल्या १३व्या षटकात सुंदरने ६,६,४ असे फटके खेचून १८ धावा जोडल्या. ही सेट जोडी तोडण्यासाठी मुंबईने हुकमी एक्का जसप्रीत बुमराहला परत गोलंदाजीला बोलावले. त्याने अप्रतिम यॉर्करवर ४४ चेंडूंत ८४ धावांची भागीदारी तोडली. सुंदर २४ चेंडूंत ४८ धावांवर त्रिफळाचीत झाला. गुजरातला १३.४ षटकांत १५१ धावांवर तिसरा धक्का बसला.

## सेजल विश्वनाथ मोईकर ला रजत पदक




**पुणे :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले आहे. नुकतीच जम्मू काश्मीरच्या श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठ येथे सदर स्पर्धा संपन्न झाली. त्यात विद्यापीठाच्या सेजल विश्वनाथ मोईकर या विद्यार्थिनीने ७६ किलो वजनी गटात विद्यापीठास हे यश मिळवून दिले. ती विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्रांतर्गत असलेल्या तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी महाविद्यालयाची प्रथम वर्ष बी. ए. ची विद्यार्थिनी आहे. तिला विद्यापीठ क्रीडा समन्वयक श्री. सिध्दांत टाक यांचे मार्गदर्शन लाभले. सदर यशाबद्दल कु. सेजल मोईकर या विद्यार्थिनीचे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू प्रा. जोगेन्द्रसिंह बिसेन, कुलसचिव दिलीप भरड, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, सिका संचालक डॉ. मधुकर शेवाळे, पुणे विभागीय केंद्र संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड, विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र संचालक प्रा. दयाराम पवार, जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे व सर्व विद्याशाखा संचालक यांनी अभिनंदन केले आहे.

## दुसरा टी-२० पाकिस्तानने ५७ धावांनी जिंकला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दुसऱ्या टी-२० सामन्यात पाकिस्तानने बांगलादेशचा ५७ धावांनी पराभव केला. या विजयासह पाकिस्तानने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी निर्णायक आघाडी घेतली आहे. संघाने पहिला सामना ३७ धावांनी जिंकला होता. शुक्रवारी लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. २० षटकांत ६ गडी गमावून २०१ धावा केल्या. २०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी बांगलादेश मैदानात उतरला आणि १९ षटकांत १४४ धावांवर सर्वबाद झाला. तिसरा आणि शेवटचा सामना १ जून २०२५ रोजी लाहोरमध्ये खेळला जाईल.

सलामीवीर साहिबजादा फरहानने शानदार कामगिरी करत ७४ धावा केल्या आणि त्याला



सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

फरहान व्यतिरिक्त, पाकिस्तानकडून नवाजनेही अर्धशतक झळकावले साहिबजादा फरहानने ४१ चेंडूत ७४ धावांची खेळी केली. हसन नवाजने नाबाद अर्धशतक (५१ धावा) केले. त्याच वेळी, मोहम्मद हरिसनेही २५ चेंडूत जलद ४१ धावा केल्या. बांगलादेशकडून हसन महमूद आणि तन्झीम हसन साकिब यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या. रिशाद हुसेननेही १ विकेट घेतली.

## दुसऱ्या कमिशनर्स करंडक क्रिकेट स्पर्धेत ग्रामीण चॅलेंजर्स संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एज इव्हेंट्स अँड एंटरटेनमेंट व बीव्हीसीआय यांच्या तर्फे दुसऱ्या कमिशनर्स करंडक क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत नितीन चव्हाण(31धावा व 4-9) याने केलेल्या सुरेख अष्टपैलू खेळीच्या जोरावर ग्रामीण चॅलेंजर्स संघाने गतविजेत्या रेल्वे रॉयल्स संघाचा 15धावांनी पराभव करून विजेतेपद संपादन केले.



पीवायसी हिंदू जिमखाना येथील क्रिकेट मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ग्रामीण चॅलेंजर्स संघाने 10षटकात 6बाद 102धावा केल्या. यात श्रीकांत गोसावी याने 14चेंडूत 2चौकार व 4षटकारासह नाबाद 41धावा, नितीन चव्हाणने 16चेंडूत 3चौकार व 2षटकाराच्या मदतीने 31धावा, बापूराव धडसने 10, विकास कापरेने 10 धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला.

याच्या उत्तरात रेल्वे रॉयल्स संघाचा डाव 9.3षटकात सर्वबाद 87धावावर कोसळला. यात युवराज गोळे 29, दिनेश चव्हाण 14, निलेश साबळे 11 यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. विजयी संघाकडून नितीन चव्हाण(4-9), सलीम शेख(3-19), श्रीकांत शिर्के (1-15) यांनी सुरेख गोलंदाजी करत संघाला 15धावांनी विजय मिळवला.

याआधीच्या पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात नितेश कोंडविलकर(24धावा व 2-14) याने केलेल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर गतविजेत्या रेल्वे रॉयल्स संघाने जीएसटी जायंट्स रिझोल्युशन संघाचा 13 धावांनी पराभव करून अंतिम फेरी गाठली.

दुसऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीत कुणाल निकम (नाबाद 48धावा) याने केलेल्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर ग्रामीण चॅलेंजर्स संघाने कस्टम्स सुपर किंग्ज संघाचा 6गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण विशेष पोलीस महानिरीक्षक(कोल्हापूर परिषद) सुनील फुलारी(आयपीएस), एज इव्हेंट्स अँड एंटरटेनमेंटचे संचालक अनिकेत सोमण, बीव्हीसीआय कार्याध्यक्ष रणजीत मोरे, सचिव सुधीर कुलकर्णी, जगन्नाथ जाधव, दादासाहेब मोरे, माजी खासदार अशोक मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले.

## पुढील महिन्यापासून आयसीसी नवीन नियम लागू करणार

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांचे काही नियम बदलणार आहे. आयसीसीने आपल्या सदस्यांना पाठवलेल्या संदेशात म्हटले आहे की, सुधारित खेळण्याच्या अटी जूनपासून कसोटी सामन्यांसाठी आणि जुलैपासून पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटसाठी लागू होतील. एकदिवसीय क्रिकेटमध्ये एकाच चेंडूचा वापर, सीमारेषेवर झेल आणि कन्कशन रिप्लेसमेंट यासारख्या नियमांमध्ये बदल केले जातील. ऑक्टोबर २०११ पासून एकदिवसीय सामन्यांमध्ये दोन नवीन चेंडूंचा नियम लागू झाला आहे. सध्या, वनडे सामन्यांमध्ये दोन्ही बाजूंनी दोन नवीन चेंडू वापरले जातात. आयसीसीच्या नवीन नियमांनुसार, १ ते ३४ षटकांसाठी दोन नवीन चेंडू असतील. याचा अर्थ दोन्ही चेंडू एका डावातील पहिल्या ३४ षटकांसाठी चालतील. त्यानंतर ३५ व्या षटकापासून, डावाच्या शेवटपर्यंत दोन्ही टोकांपासून फक्त एकच चेंडू वापरला जाईल (जोपर्यंत तो बदलण्याची आवश्यकता नसेल). ३४ षटके पूर्ण झाल्यानंतर आणि ३५ षटके सुरू होण्यापूर्वी, क्षेत्ररक्षण करणारा संघ त्या दोन चेंडूंपैकी एक निवडेल. कन्कशन रिप्लेसमेंट नियमांमध्येही काही बदल केले जातील.

## मकरंद आबा पाटील चषक बुद्धिबळ स्पर्धा -रॅपिड रेटिंग चेस टूर्नामेंट १ जूनला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विश्वगंगा आयोजित या बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन मयूर शुभमंगल कार्यालय,खंडाळा,सातारा, महाराष्ट्र येथे १ जून रोजी होणार आहे. पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या मान्यतेने १ जून रोजी सकाळी या बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ होणार आहे.

या स्पर्धेत जवळपास १५०पेक्षा अधिक खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला आहे.त्यात ८० पेक्षा अधिक फिडे आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडूंचा समावेश आहे.या स्पर्धेला प्रत्येक खेळाडूला



१५ मिनिटांचा कालावधी तर प्रत्येक चाली करता ५ सेकंद अधिक असा वेळ मिळणार आहे आणि या स्पर्धेमध्ये ९ फेऱ्या ह्या स्विस लीग साखळी पद्धतीने खेळविण्यात येणार आहेत.

स्पर्धा चेस असोसिएशन सातारा यांच्या मान्यतेने घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत एकूण ९६ बक्षीस रोख रक्कम दिली जाणार असून पहिले पाच बोर्ड डिजिटल लाईव्ह शो मध्ये स्पर्धा पहाण्यास मिळणार आहे. स्पर्धा खंडाळा बस स्टॉप पासून जवळ असून स्पर्धेचे ठिकाण हे पुणे व सातारा यांच्या मधे आहे.

प्रमुख खेळाडूंचा सहभाग- इंटरनॅशनल मास्टर - कशिश जैन, फिडे मास्टर- प्रियांशू पाटील या खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला आहे. अथर्व गोडबोले प्रमुख पंच म्हणून काम पाहणार आहेत.

या स्पर्धेत एकूण २००००० (२ लाख )रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत. या स्पर्धेत ७,९,११,१३,१५ वर्षांखालील गटात मुले व मुली यांना बक्षिसे दिली जाणार आहेत. तसेच महिला, ज्येष्ठ,दिव्याग्ग,उत्कृष्ट महाराष्ट्र,उत्कृष्ट पुणे व विविध रेटिंग गटात एकूण १०३ बक्षिसे दिली जाणार आहेत. स्पर्धा संपल्यावर त्या दिवशी सायंकाळी पारितोषिक वितरण समारंभ संपन्न होणार आहे.

प्रवेश व अधिक माहितीसाठी शार्दूल तपासे (9960530207) यांच्याशी संपर्क साधावा. शार्दूल तपासे हे अनुभवी ज्येष्ठ खेळाडू, आंतरराष्ट्रीय पंच, प्रशिक्षक व मार्गदर्शक आहेत.

## करुण नायर पहिल्या दिवशी १८६ धावांवर नाबाद

**नवी दिल्ली :** इंग्लंड लायन्सविरुद्धच्या पहिल्या अन-ऑफिशिअल कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी करुण नायर १८६ धावांवर नाबाद राहिला. त्याच्यासोबत ध्रुव जुरेल ८२ धावांवर खेळत आहे. भारत अ संघाकडून सरफराज खान शतक हुकला.

कँटरबरीमध्ये, करुण आणि सरफराज यांच्यातील १८१ धावांच्या शानदार भागीदारीमुळे इंडिया अ संघाला सुरुवातीच्या विकेट गमावल्यानंतर सावरण्यास मदत झाली. यानंतर, फलंदाजीला आलेल्या ध्रुव जुरेलसोबत नायरने नाबाद १७७ धावा जोडल्या. पहिल्या दिवसाच्या खेळाच्या शेवटी, संघाची धावसंख्या ३ गडी गमावून ४०९ धावा होती. इंग्लंड लायन्सकडून जोश हलने २ आणि एडी जॅकने १ विकेट घेतली.

इंग्लंड लायन्सचा कर्णधार जेम्स र्यूने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. इंडिया अ संघाने फक्त १२ धावांवर आपला पहिला बळी गमावला. कर्णधार अभिमन्यू ईश्वरन ८ धावांवर एलबीडब्ल्यू झाला. यानंतर, यशस्वी जैस्वाल २४ धावा काढून जॅकच्या चेंडूवर झेलबाद झाला. करुण आणि सरफराज यांनी डाव सांभाळला आणि तिसऱ्या विकेटसाठी १८१ धावांची भागीदारी केली. जोश हलने सरफराजला बाद करून ही भागीदारी मोडली. सरफराजने ११९ चेंडूत १३ चौकारांच्या मदतीने ९२ धावा केल्या.

## जेष्ठ संचालक देवकर यांचा सन्मान संपन्न



**पुणे :** कोकणस्थ परिवार, पुणेचे जेष्ठ संचालक सिताराम दामोदर देवकर यांच्या पंच्याहत्तरव्या वाढदिवसानिमित्त मंडणगड रत्नागिरी येथे क्रिडा संघटक सुनील नेवरेकर यांच्या हस्ते खास सत्कार करण्यात आला. सिताराम दामोदर देवकर यांनी संस्थेचे माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रमामध्ये सहभाग घेवून विविध सामाजिक कार्य केले आहे. तसेच त्यांचे क्रीडा क्षेत्रातही भरीव योगदान आहे. रिमा गुढेकर यांनी स्वागत केले. दिपाली पिळणकर यांनी प्रास्ताविक केले. केतकी देवकर यांनी आभार मानले. सुखदा सिताराम देवकर यांचा खास सत्कार सोनिया नेवरेकर यांच्या हस्ते करण्यात आला. सुप्रिया दरिपकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## आदिनाथ नवले व नीता नवले दांपत्याची एवरेस्ट वर यशस्वी चढाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** धामणी, ता. आंबेगाव येथील आदिनाथ रघुनाथ नवले व नीता आदिनाथ नवले या दांपत्याने १४ दिवसांचा माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेक यशस्वीपणे नुकतीच पूर्ण केला. याबद्दल परिसरात त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

आदिनाथ नवले हे गुलटेकडी मार्केट येथे भाजीपाल्याचे आडतदार म्हणून व्यवसाय करत असताना त्यांनी गड, किल्ले सर करण्याची आवड जोपासली आहे. आदिनाथ नवले यांनी दोन वेळा तर नीता नवले एक वेळा लेह लदाख मोहीम यशस्वी केली आहे.



आदिनाथ नवले व नीता नवले या दांपत्याने माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्पची ट्रेकिंगला जाण्याचा निर्णय घेतला त्यासाठी त्यांनी तीन महिने सराव केला. तीन महिन्यात २० वेळा सिंहगड किल्ल्याचे ट्रेकिंग केले.

माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्पची उंची सुमारे ५,३६४ मीटर (१७,५९८ फूट) आहे. आदिनाथ रघुनाथ नवले व नीता नवले यांनी नुकतीच माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्पच्या मोहिम यशस्वीरीत्या चढाई करून पूर्ण केली. या नवले दांपत्याचे परिसरात कौतुक व अभिनंदन होत आहे.

## आठवी 'अपोलो हॉटफुट करंडक' युवा साखळी फुटबॉल स्पर्धा

# फोर लायन्स् फुटबॉल ॲकॅडमी विनर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आठव्या 'अपोलो हॉटफुट करंडक' युवा साखळी फुटबॉल स्पर्धेत फोर लायन्स् फुटबॉल ॲकॅडमी अ संघ आणि स्टेपओव्हर फुटबॉल ॲकॅडमी या संघांनी आपापल्या गटाचे विजेतेपद संपादन केले.

बावधन येथील हॉटफुट ॲकॅडमीच्या मैदानावर ९ वर्षांखालील गटामध्ये झालेल्या अंतिम गटसाखळी सामन्यामध्ये फोर लायन्स् फुटबॉल ॲकॅडमी अ संघाने लौकिक फुटबॉल ॲकॅडमीचा ८-० असा सहज पराभव केला.




सामन्यात विहान अरोरा आणि थरक बालाजी यांनी प्रत्येकी दोन गोल तर, निकुंज जोशी, हेयांश शर्मा, अनिश दोशी आणि विश्रुथ देशपांडे यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. दुसऱ्या सामन्यात कॉशन्ट स्पोटर्स पुणे अ संघाने उत्कर्ष क्रिडा मंच संघाचा ३-० असा सहज पराभव केला. सामन्यामध्ये कविश नाईक, सनिल सिंग आणि ओवेन डिसुझा यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. या गटात फोर लायन्स् अ संघाने १५ विजयांसह ४५ गुणांसह अव्वल स्थान मिळवले. कॉशन्ट स्पोटर्स पुणे अ संघाने १४ विजयांसह ४२ गुणांसह व्दितीय स्थान मिळवले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण पुणे हॉटफुटचे मुख्य (ऑपरेशन) इवॅन डिसुझा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे संयोजक केतन सरोदे, सहभागी संघांचे प्रशिक्षक, खेळाडू आणि पालक उपस्थित होते. विजेत्या आणि उपविजेत्या संघांना करंडक आणि पदक देण्यात आले.

#रा